गोड गोष्टी : भाग चौथा

# फुलांचा प्रयोग
# नदी शेवटीं सागराला मिळेल

"करी मनोरंजन जो मुलांचें
जडेल नातें प्रभुशीं तयाचें."

लेखक
साने गुरुजी, एम्. ए., अमळनेर

प्रथमावृत्ति : १९४[illegible]

केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई

मूल्य दहा आणे

प्रकाशक
राव भिकाजी ढवळे,
र्थ-सदन, गिरगांव, मुंबई

सर्वाधिकार
प्रकाशकाधीन

मुद्रक
द्वारकानाथ भगवंत कर्णिक
न्यू टाइम्स प्रिंटरी, लि., गिरगांव, मुंबई

# दोन शब्द

गोड गोष्टींची ही चौथी भेट. या पुस्तकांत दोन गोष्टी आहेत.

पहिली गोष्ट प्रख्यात फ्रेंच कादंबरीकार अलेक्झांडर डयूमा याच्या Black Tulips या कादंबरीवरून लिहिली आहे. फार सुंदर आहे ती कादंबरी. डयूमानें कितीतरी लिहिलें आहे. डयूमानें लिहिलें आहे असें म्हणतांच लोक वाटेल तें घेत. पुष्कळ लोक डयूमाच्या नांवाखालीं स्वतःचें लिखाण दडपून देत. डयूमानें खरें कोणतें लिहिलें व डयूमाच्या नांवावर कोणतें लिहिलें गेलें हा एक प्रश्नच असे. डयूमाच्या Three Musketeers या कादंबरीचें "तीन शिलेदार" हें मराठी भाषांतर प्रसिद्ध आहे.

Tulip–टयूलिप् हें फूल आपल्याकडे नाहीं. निदान मला माहीत नाहीं. मी गोष्टीसाठीं कृष्णकमळ घेतलें आहे. त्यासाठीं वाचकांनीं रागावूं नये. दुसरें कोणतेंहि फूल तेथें त्यांनीं घातलें तरी चालेल. गोष्टीची गोडी त्यानें कमी होणार नाहीं. धुळें जेलमध्यें चक्की दळून झाली म्हणजे ही गोष्ट मी सांगत बसें. या गोष्टींतील तुरुंगाचीं वर्णनें ऐकून, जेलरचीं वर्णनें ऐकून सत्याग्रही व जवळचे इतर कैदीहि हसत. ही गोष्ट सर्वांना आवडे. ही गोष्ट जशी मी सांगत असें तशी लिहून काढली आहे.

या पुस्तकांतील दुसरी गोष्ट विश्वविख्यात जर्मन कवि गटे याच्या फौस्ट या महाकाव्यांतील सूत्र घेऊन लिहिली आहे. गटेचें फौस्ट काव्य अमर आहे. तें काव्य सर्व आयुष्यभर तो लिहीत होता. त्याच्या जीवनाचें सार या काव्यांत आहे. डॉ. फॉस्टस किंवा फौस्ट ही व्यक्ति युरोपांतील दंतकथांत अग्रगण्य आहे. फौस्ट सैतानाजवळ सुखासाठीं करार करतो अशी ही लोककथा आहे. शेक्सपियरच्या आधींचा प्रतिभावान् नाटककार मार्लो यानें डॉ. फॉस्टस ही शोकान्त नाटिका लिहिली होती. त्या नाटिकेंतील कांहीं प्रवेश तर अतुलनीय आहेत. फॉस्टस कायमचा नरकांत पडायचा असतो. त्या वेळेचें त्याचें तें आत्मगत भाषण अपूर्व असें आहे.

गटेच्या पूर्वींच्या फौस्ट संबंधींच्या सर्व कथांतून, फौस्ट सैतानाजवळ बारा वर्षांचा करार करतो, ठराविक मुदतीचा करार करतो असें आहे. सैतानानें त्या मुदतींत सर्व प्रकारचीं सुखें पुरवायचीं आणि मुदत संपतांच त्यानें कायमचें

सैतानाचें गुलाम व्हावयाचें. परंतु अशा कथांत फौस्टच्या उद्धाराची आशाच नाहींशी होते. सुखासाठीं हपापलेला फौस्ट चिरंतन नरकांत खितपत पडतो.

युरोपखंडांतील धर्मकल्पनांत एकोणिसाव्या शतकांत फरक झाला. मनुष्य कायमचा नरकांत राहणार ही कल्पना लोकांना असह्य वाटूं लागली. परमेश्वर का असा कठोर असेल ? मनुष्य का कायमचा पतित राहणार ? टॉलस्टॉय या थोर तत्त्वज्ञाला एका रशियन शेतकऱ्यानें एकदा विचारलें, "महाराज, देव खरोखर पापी लोकांना नरकाच्या आगींत टाकीत असेल का ?" टॉलस्टॉयनें विचारलें, "तुम्ही तुमच्या मुलाला आगींत टाकाल का ?" तो शेतकरी म्हणाला, "असें काय विचारतां ? कोणता बाप असें करील ? कोणता बाप अशी शिक्षा करील ?" टॉलस्टॉय म्हणाला, "देव तुझ्यापेक्षां का कमी दयाळू आहे ?"

गटेच्या काळांत, धर्मांत उदारमतवाद शिरला. म्हणून गटेनें फौस्ट संबंधींच्या कल्पनेंत फरक केला. फौस्ट सैतानाजवळ ठराविक मुदतीचा करार नाहीं करीत. "हा क्षण किती सुंदर, हा क्षण अमर होवो." असे शब्द तोंडांतून बाहेर पडले तर तो सैतानाचा असें ठरतें. परंतु हा करार होतांनाच हा करार कधींहि पूर्ण होणार नाहीं हें लक्षांत येतें. कारण अवीट असें सुख सैतान कसें देऊं शकणार ? सैतान सुखें देणार तीं क्षणिक असणार. जो क्षण आपण आपल्या जीवनांत अमर होण्याची इच्छा करूं तो दैवी क्षणच असणार. म्हणजे शेवटीं मनुष्य दिव्यत्वाकडे जाईल, जें सत् आहे, शिव आहे त्याच्याकडेच जाईल असें गटेनें या फौस्टच्या द्वारा दाखविलें आहे.

तसेंच शेवटीं समाधान समाजाच्या सेवेंत आहे. तुम्ही कितीहि ज्ञान मिळवा, इतर कांहीं करा, तुम्हांला त्यानें समाधान मिळणार नाहीं. समाधान दुसऱ्यासाठीं झिजण्यांत आहे. दुसऱ्यांचें जीवन सुखी करण्यांत आहे. असेंही या काव्यांत गटेनें दाखविलें आहे. फौस्ट सर्वज्ञ होऊं पाहतो. परंतु शेवटीं पुस्तकें तो भिरकावतो. मग भोगांच्या पाठीमागें लागतो. त्यांनाहि तो कंटाळतो. सेवेच्या विचारांत शेवटीं त्याचा आनंद होतो. सेवा करण्याचा विचार मनांत येतांच, हा विचार, हा क्षण अमर होवो असें तो म्हणतो.

मनुष्यानें शक्तीबाहेरचें ध्येय ठेवूं नये. आपल्या शक्ति ओळखून तदनुसार ध्येय ठरवावें व तें ध्येयहि शेवटीं आजुबाजूचा संसार अधिक सुखी करण्याचें असावें. अमर्याद ध्येय हातीं कधीं येत नाहीं. मग निराशा पदरीं येते आणि

निराश मनुष्य शेवटीं बेदरकार होतो. तो वाटेल तें करतों. तो पापें करील, कांहींहि करील, निराशा म्हणजे सर्वनाश. फौस्ट सर्व विश्वाचें कोडें उलगडावें असें ध्येय ठेवितो. तें सिद्धीस कसें जाणार ? मग निराश होतो. निराश होऊन मग केवळ सुखभोगांकडे तो वळतो. त्याला ना पुण्य ना पाप. परंतु शेवटीं तो पुन्हा सावरतो. भोगांना फेकून समाजाची सेवा करावी असें तो योजतो. त्या विचारानें त्याला अमर आनंद होतो.

गटेचें असें हें फौस्ट आहे. त्यांतील "तुरुंगांतील प्रसंग" तर अमर आहे. फौस्ट हें गटेचें एक प्रकारें आत्मचरित्र आहे. तोहि सर्व शास्त्रांत प्रवीण होऊं इच्छितो. तो कवि, नाटककार, कादंबरीकार तर असतोच. तो संगीतज्ञ असतो, चित्रकारहि असतो. तो शास्त्रज्ञहि असतो. मरतांना More Light, More Light आणखी प्रकाश, आणखी प्रकाश असें करीत तो मेला. परंतु ज्ञान अनंत आहे. तें केव्हां मिळणार ? थोडी लोकांची प्रत्यक्ष सेवा कर. तुझ्या ज्ञानार्जनाच्या आनंदांत मस्त न राहतां, शेजारची हायहाय थोडी कमी कर, असें का शेवटीं गटे या महाकाव्याच्या द्वारा शिकवूं इच्छितो ?

नदी शेवटीं वाकडीतिकडी जाऊन सागराला मिळते. त्याप्रमाणें मनुष्य वेडावाकडा वागला तरी शेवटीं मांगल्याकडे, सत्यंशिवंसुंदराकडे जाईल असें गटेनें या महाकाव्यांत दाखविल्यावरून मी या गोष्टीला "नदी शेवटीं सागराला मिळेल" असें नांव दिलें आहे.

गटेचें फौस्ट मला फार आवडतें. १९२४-२५ मध्यें मराठींत त्याचें पद्यमय रूपान्तर मी करूं पहात होतों. परंतु तो प्रयत्न अर्धवट राहिला. पुढें या महाकाव्यावर विविधज्ञानविस्तारांत मी एक लेख लिहिला होता. जळगांवला प्रकाशमंडळाच्या व्याख्यानमालेंत या विषयावरच मी बोललों होतों. गटेच्या फौस्टमधील गोष्ट मी अनेकांना सांगितली आहे. तुरुंगांत अनेकदा सत्याग्रहींना सांगितली आहे. तुरुंगाबाहेर मुलांना, विद्यार्थ्यांना सांगितली आहे. ती जशी मी सांगत असें तशीच लिहून काढली आहे.

महाराष्ट्रांतले वाचक हें चौथें पुस्तक गोड करून घेवोत. पांचवें पुस्तक लौकरच देईन.

साने गुरुजी

ता. १५।१२।४०

# अनुक्रमणिका

## फुलांचा प्रयोग


| | | |
|---|---|---|
| १ | दोघांचा बळी ... ... | ९ |
| २ | फुला ... ... ... | १४ |
| ३ | फुलाला फांशीची शिक्षा ... | १९ |
| ४ | राजा आला, फुला वांचला ... | ३० |
| ५ | समुद्रकांठच्या तुरुंगांत ... | ३६ |
| ६ | तुरुंगांतील प्रयोग ... ... | ४१ |
| ७ | फुलाला दोन बक्षीसें ... | ५४ |
| ८ | घरीं ... ... ... | ६२ |


## नदी शेवटीं सागराला मिळेल


| | | |
|---|---|---|
| १ | देवाचा दरबार ... ... | ६७ |
| २ | सर्वज्ञ माधव ... ... | ७१ |
| ३ | असमाधान ... ... | ७३ |
| ४ | सैतानाशीं करार ... ... | ७७ |
| ५ | प्रेमाचा पेला ... ... | ८१ |
| ६ | मधुरीची भेट ... ... | ८४ |
| ७ | दुःखी मधुरी ... ... | ९५ |
| ८ | ती काळरात्र ... ... | १०१ |
| ९ | राजाच्या दरबारांत ... ... | १०८ |
| १० | पुन्हा घरीं ... ... | ११३ |
| ११ | स्वर्गांत ... ... ... | ११७ |

# फुलांचा प्रयोग

प्रकरण पहिलें

# दोघांचा बळी

त्या देशांत नुकतीच राज्यक्रान्ति झाली होती. नवीन राजा गादीवर आला होता. तो राजा तरुण होता, उदार होता. आपला देश भरभराटावा, सुखी व्हावा असें त्याला वाटत होतें. इतर देशांचे कारभार कसे आहेत, त्या त्या देशांतून काय काय विशेष गोष्टी आहेत, तें सारें पहावें म्हणून तो तरुण राजा प्रवासासाठीं निघून गेला. त्यानें राज्याची सर्व जबाबदारी दोन प्रधानांवर सोंपविली होती.

राज्यक्रान्तीच्या वेळेस या दोन प्रधानांना लोक देवाप्रमाणें मानीत. त्यांच्या नांवाचा जयजयकार केला जाई. किती त्यागी, किती त्यांची देशभक्ति, असें सारे म्हणत. परंतु पूर्वींप्रमाणें लोकांची श्रद्धा त्यांच्यावर राहिली नाहीं. समाजांत कांहीं मत्सरी लोक असतातच. अशा मत्सरी लोकांनीं त्या दोन प्रधानांच्या विरुद्ध सारखी मोहीम सुरू केली. हे प्रधान स्वार्थी आहेत, मानासाठीं हपापलेले आहेत, राजाला यांनींच प्रवासासाठीं पाठविलें, यांना सर्व सत्ता स्वतःच्या हातीं घ्यायची आहे, कसली देशभक्ति नि कसलें काय, अशा प्रकारचा विषारी प्रचार त्यांनीं सुरू केला. सभांतून, वर्तमानपत्रांतून, खाजगी बैठकींतून सर्वत्र एकच सूर ऐकूं येऊं लागला.

लोक चंचल असतात. ते आज एखाद्याची पूजा करितील, उद्यां त्याचीच कुतरओढ करितील. ते आज जयजयकार करितील, उद्यां शिव्याशाप देतील. आज उंचावर चढवतील, उद्यां खालीं ओढतील. आज फुलांचे हार घालतील, उद्यां दगड मारतील. दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये. लोकांना जसें वळवावें तसे ते वळतात. अग्नीनें सुंदर स्वयंपाक करतां येतो, आगहि लावतां येते. लोकांना शांत ठेवतां येतें,

त्यांना प्रक्षुब्धहि करतां येतें. पाणी शांत असतें, परंतु जोराचा वारा सुटला तर तेंच पाणी प्रचंड लाटांचें रूप धारण करतें. मोठमोठ्या बोटीहि मग त्या लाटांसमोर टिकूं शकत नाहींत. त्याप्रमाणें शांत राहणारी जनता, कोणी एखाद्या गोष्टीचा तुफानी प्रचार केला तर खवळते. ती जनता मग आवरतां येत नाहीं.

राजधानींतील लोक त्या दोन प्रधानांविरुद्ध फारच बिथरले. एके दिवशीं सायंकाळीं विराट् सभा झाली. द्वेषाची आग पाखडणारीं भाषणें झालीं. प्रधानांच्या घरांकडे त्यांनीं मोर्चा वळविला. "मारून टाका हे प्रधान; स्वार्थी बेटे; देशभक्त म्हणून मिरवितात; तुकडे तुकडे करा. आग लावा त्यांच्या बंगल्यांना." असें ओरडत प्रक्षुब्ध जनता निघाली.

एक प्रधान घरांत सांपडला. दुसरा कोठें आहे? परंतु आहे त्याची तरी उडवा चटणी. जो प्रधान सांपडला त्याला लोकांनीं फरफरा ओढीत आणलें. कोणी दगड मारले, कोणी ढिपळें मारलीं. कोणी हात तोडला, कोणी पाय उडवला. हाल हाल करून त्या प्रधानाला मारण्यांत आलें. त्याचें डोकें भाल्यावर रोंवून तें मिरवण्यांत आलें. "देशद्रोह्यांना असें शासन हवें. स्वार्थी लोकांना हें बक्षीस मिळतें." असें गर्जत लोक गेले.

परंतु तो दुसरा प्रधान कोठें आहे? राजधानींतील कांहीं विचारी माणसांनीं एक पत्रक काढलें. "एका प्रधानाचा लोकांनीं सोक्षमोक्ष लाविला. आतां दुसऱ्याचा सूड घेण्यास ते अधीर झाले आहेत. परंतु हा खरा मार्ग नव्हे. प्रधानांची न्यायासनासमोर चौकशी होऊं दे. जर ते दोषी ठरले, त्यांच्यावर कांहीं आरोप सिद्ध झाले, तर त्यांना होऊं दे शिक्षा. हा सरळ मार्ग होता. आतां दुसऱ्या प्रधानास तरी न्यायासनासमोर उभें करा."

"होय, हें बरोबर आहे. या दुसऱ्याची चौकशीच करूं या. सारीं कृष्ण कृत्यें बाहेर येऊं देत. त्यांचे इतर साथीदार कोण आहेत हेंहि कळेल. त्यांचाहि नायनाट करतां येईल." असें लोक म्हणूं लागले.

हे दुसरे प्रधान कोठें पळून जाऊं नयेत म्हणून त्यांना तुरुंगांत ठेवण्यांत यावें व न्यायाधीशांनीं त्यांची चौकशी लौकर करावी अशाहि मागण्या लोकांनीं सभेंतून केल्या.

त्या दुसऱ्या प्रधानास तुरुंगांत ठेवण्यांत आलें. स्वदेशांतील ही सारी घडामोड राजाला कळविण्यांत आली. केव्हां येणार राजा? राजा येण्याच्या आंतच पुन्हा जनता खवळणार नाहीं ना? खवळली तर या प्रधानास कसें वांचवितां येणार ?

तो दुर्दैवी प्रधान तुरुंगाच्या कोठडींत होता. इतक्यांत कोणी तरी तेथें आलें. कोण होतें तें? समजायला मार्ग नव्हता. त्या व्यक्तीच्या तोंडावरून बुरखा होता. त्या अज्ञात व्यक्तीनें त्या प्रधानाच्या हातांत एक चिठ्ठी दिली. काय होतें त्या चिठ्ठींत?

"आज रात्रीं आठ वाजतां तुरुंगाच्या दाराबाहेर घोड्याची गाडी असेल. पडदे असलेली गाडी आहे. तींत तुम्हीं बसा व शहराच्या दक्षिण दरवाजाकडे जा. तुम्ही तेथें पोचतांच दरवाजा उघडला जाईल. आपण त्याच गाडींतून देशाबाहेर निघून जा."

तो प्रधान विचार करूं लागला. घोड्याच्या गाडींतून जाणें धोक्याचें होतें. कोणीं गाडी थांबविली तर? कोणाला संशय आला तर? दक्षिणे-कडचा दरवाजा उघडण्यांत आला नाहीं तर? परंतु प्राण वांचविण्याचा हाच एक मार्ग होता. आलेली संधि घ्यावी. पुढचें कोणाला कळणार?

तो प्रधान रात्र केव्हां होते व आठ केव्हां वाजतात याची वाट पहात होता. शेवटीं एकदाचे आठ वाजले. कोणीतरी कोठडीजवळ आलें. प्रधानाला त्या अज्ञात व्यक्तीनें तुरुंगाच्या बाहेर नेलें. तेथें पडदे सोडलेली गाडी होती. प्रधान तींत बसला. गाडी भरधाव निघाली. रात्रीची आठ साडेआठाची वेळ. रस्ते गजबजलेले होते. परंतु त्या गर्दींतून ही गाडी वेगानें जात होती. गाडी दक्षिणेकडच्या दरवाजाकडे वळली. तिकडे

गर्दी कमी होती. रहदारी कमी होती. गाडी दरवाजाजवळ येऊन थांबली. परंतु दरवाजा बंद. तेथील पहारेकरी दरवाजा उघडीना.

" अरे दरवाजा लौकर उघड. " गाडीवान म्हणाला.

" तसा हुकूम नाहीं. " पहारेकरी म्हणाला.

" हुकुम नाहीं ? " गाडींतून प्रधानानें विचारलें.

" नाहीं. कोण आहे गाडींत ? " पहारेकऱ्यानें प्रश्न केला.

" त्याची तुला उठाठेव नको. आधीं दरवाजा उघड. प्रत्येक क्षण मोलाचा जात आहे. देशाचें काम आहे. " गाडीवान म्हणाला.

" कांहींतरी फितुरी दिसते. कोण आहे गाडींत ? मी दरवाजा उघडणार नाहीं. " पहारेकरी जोरानें म्हणाला.

आतां काय करणार ? गाडीवानानें गाडी वळवली. पुन्हा वेगानें हांकली. परंतु " दगा, फितुरी, पकडा, अडवा गाडी " असें तो पहारेकरी ओरडून म्हणाला. रस्त्यांतील लोकांनीं ते शब्द ऐकले. एका क्षणांत ते शब्द शहरभर पसरले. जनता खवळली. लाखों लोकांचे थवे जमा झाले. गाडी गर्दीतून वेगानें जाईना. लोकांनीं घोडे धरले. गाडी थांबली.

" कोण आहे गाडींत ? " लोक ओरडले.

" अहो विचारतां काय ? काढा ते पडदे " कोणी म्हणाले. गाडीचे पडदे ओढण्यांत आले. तों आंत तो दुर्दैवी प्रधान !

" अरे देशद्रोही प्रधान ! पळून जात होता. ओढा त्याला. ठेचा. हाणा, मारा. तुकडे करा. पळून जात होता. पापाला पळून जातां येत नाहीं. भरली त्याची घटका, भरला पापांचा पेला. मोठे देशभक्त ! खरा असता तर पळूं बघता ना. ओढा त्याला, खेंचा. "

त्या प्रधानाला हाल हाल करून मारण्यांत आलें. त्याच्या शरीराचा लहानसा तुकडाहि कोठें सांपडला नाहीं. तुकड्याचे तुकडे, तुकड्याचे तुकडे केले गेले. प्रत्येकाला सूड घेण्याची इच्छा होती. लोकांची माणुसकी

मेली होती. क्रोधानें, सूडबुद्धीनें माणसाचा पशु होतो. पशूहि बरा. कारण त्याला फार बुद्धि नसते. परंतु बुद्धिमान मनुष्य पशु झाला तर फारच भयंकर ती गोष्ट. दुनियेला तो शाप असतो.

तो प्रधान, तो गाडीवान, ते घोडे सर्वांचा फन्ना उडाला. त्या गाडीला आग लावण्यांत आली. सूड घेतल्याच्या राक्षसी आनंदानें लोक नाचूं लागले, गर्जूं लागले.

" दोन्ही कांटे निघाले. "

" परंतु त्यांचे साथीदार आतां शोधले पाहिजेत. "

" शहरांतूनच नव्हे तर खेड्यांतूनहि पाहिले पाहिजेत. "

" बीमोड केला पाहिजे. "

" सर्वांचा समाचार घेतला पाहिजे. "

" तरच नवीन राजा सुखी होईल. नव्या राजाचा जयजयकार असो ! "

★

प्रकरण दुसरें

# फुला

त्याचें नांव होतें फुला. फुलांचें त्याला वेड. त्याचें वय फार नव्हतें. पंचवीस तीस वर्षांचें असेल. फुलानें लग्न केलें नव्हतें. त्यानें आपलें लग्न फुलझाडांशीं लाविलें होतें. तो शिकला होता. शास्त्रांचा त्यानें अभ्यास केला होता. विशेषत: वनस्पतिशास्त्राचा त्यानें अभ्यास केला होता. त्यांतल्या त्यांत पुन्हा फुलांच्या सृष्टीचा अभ्यास म्हणजे त्याचा आनंद.

तो शिकत असतांना त्याचे अनेक मित्र होते. फुलाला फुलांचें वेड असे व मुलांना फुलाचें वेड असे. फुलाचा चेहरा फुलाप्रमाणेंच टवटवीत व सुंदर होता. फुलांची सारी कोमलता व मधुरता जणुं त्याच्या तोंडावर फुलली होती. त्याचे डोळे कमळाप्रमाणें होते. कपाळ रुंद होतें. नाक सरळ पण जरा वाकलेलें असें होतें. तो उंच होता, परंतु स्थूल नव्हता. त्याची उंची त्याला खुलून दिसे.

"फुला, तूं क्रान्तींत भाग घेणार कीं नाहीं?" त्याचे मित्र त्याला विचारीत.

"हो, घेणार आहें." तो हसत म्हणे.

"क्रान्तींत भाग घेणारा हसत नाहीं?" कोणी म्हणे.

"क्रान्तिकारक का रडतो?" फुला पुन्हा हसून विचारी.

"क्रान्तिकारक रडत नाहीं. तो रडवणाऱ्यांना रडवतो. तो निश्चयी असतो, गंभीर असतो. त्याच्या जीवनांत एक प्रकारची प्रखरता असते. गुलगुलित व लुसलुशित असें त्याच्या जीवनांत नसतें. तुझ्या ठिकाणीं

तर हें कांहींच दिसत नाहीं. तूं हसतोस, आनंदांत असतोस." एका विद्यार्थ्यानें सांगितलें.

"परंतु मी हसणाऱ्या सृष्टींतच क्रान्ति करणार आहें. समाजांतील गरिबांच्या मुलांचीं तोंडें टवटवीत करण्याची क्रान्ति तुम्ही करा. तुम्ही गरिबांचे संसार सुखाचे करा. धुळींत पडलेल्यांचा उद्धार करा. शेतकऱ्या-कामकऱ्याची मान उंच करा. श्रमणाऱ्याची प्रतिष्ठा वाढवा. तें काम माझें नाहीं. मी फुलांच्या सृष्टींत क्रान्ति करणार आहें. एकेका फुलावर दहा दहा रंग फुलवणार आहें. या झाडाचें त्यावर कलम, त्याचें ह्यावर कलम. रानांतील फुलें आणून त्यांचा मी विकास करीन. निरनिराळे शोध लावीन. गंधाची व रंगाची जी ही पुष्पसृष्टि, तिच्यांत मी वावरेन. तुम्ही मानव जात सुखी करा. त्या सुखी मानव जातीच्या भोवतीं मी फुलबागा वाढवीन. घाणेरीचीं फुलें मोगऱ्याचीं करीन. टाकाऊ फुलांत गंध आणीन. सुंदर नसणाऱ्या फुलांना सुंदर करीन. हें माझें काम. यासाठीं माझे हात, यासाठीं माझे डोळे, यासाठीं माझा अभ्यास, यासाठीं माझें ज्ञान, यासाठीं माझें घरदार, माझी सारी संपत्ति. माझ्या डोळ्यांसमोर जागेपणीं व झोपेंतहि फुलेंच फुलें हसत असतात. मग मी हसूं नको तर काय करूं ?" फुला आपलें हृदय उघडें करून सांगे.

असे ते शिकण्याचे दिवस गेले. फुला आपलें शिक्षण संपवून स्वतःच्या गांवीं राहूं लागला. त्याला एक आत्या होती. आणखी कोणी नव्हतें. ती आत्या फुलावर जीव कीं प्राण प्रेम करी. ती आतां म्हातारी झाली होती.

"फुला, आतां लग्न कर. माझ्या डोळ्यांनीं तुझी बायको बघूं दे." एके दिवशीं आत्या म्हणाली.

"मला नाहीं लग्न करायचें. माझें लग्न फुलांशीं." तो म्हणाला.

"बगीच्यांत फुलें हवींत, घरांत मुलें हवींत." आत्या हसून म्हणाली.

"कांहींतरीच तुझें. तूं दुसरें कांहीं बोलत जा. लग्नाचें नको बोलूं. नाहींतर मी तुझ्याशीं बोलणार नाहीं बघ." फुला फुरंगटून म्हणाला.

"बरें हो. नाहीं काढणार पुन्हा लग्नाची गोष्ट. तुला ज्यांत सुख त्यांतच मला. तुझ्यासाठीं तर मी जगल्यें आहे." आत्या म्हणाली.

फुलाचें घर तीनमजली होतें. त्यानें घराच्या गच्चीवर एक काचेची खोली बांधली होती. त्या काचेच्या घरांत तो फुलांचे प्रयोग करी. त्या काचांवर निरनिराळ्या रंगांचे पडदे सोडी. निरनिराळ्या रंगांच्या प्रकाशांत फुलझाडें वाढवी, नवीन रोपें तयार करी. तेथें किती तरी कुंड्या होत्या. कांहीं कुंड्यांतून फुलें फुललीं होतीं. कांहींतून नुसतीं रोपें होतीं. कांहींतून बीं पेरलेलें होतें.

घराभोवतीं केवढी थोरली मोठी फुलबाग होती. शेंकडों प्रकारांचीं फुलें तेथें फुललेलीं असत. अमुक एक प्रकार त्या बागेंत नाहीं असें होत नसे. फुलाच्या हाताखालीं एक दोन माळी होते. ते त्या बागेंत नेहमीं काम करीत. फुला सूचना द्यायचा, नवीन गोष्टी सांगायचा. फुलाचा वेळ फुलांच्या संगतींत केव्हांच निघून जाई. सकाळीं सूर्य वर येई. सूर्याचे किरण फुलांवर नाचूं लागत. परंतु सूर्याचे उबदार किरण येण्यापूर्वींच फुलाचीं प्रेमळ अशीं तीं लांब सुंदर बोटें फुलांना कुरवाळीत असत. सूर्याच्या किरणांनीं तीं फुलें फुलत का फुलाच्या प्रेमामुळें फुलत ?

सायंकाळीं सूर्यनारायणाचे सोनेरी किरण फुलांशीं शेवटची खेळीमेळी करून मोठ्या कष्टानें शेवटीं जात. परंतु फुला अंधार पडला तरी तेथेंच असे. चांदण्यांत तर फुला बागेंतच बसे. कधीं कधीं रात्रीं सर्पहि त्याला भेटत. फुलांच्या वासानें नागोबा येई. परंतु फुला म्हणायचा, "सर्पसुद्धा फुलांसाठीं वेडे होऊन रात्रीं हळूच येतात. मनुष्यानें का सर्पापेक्षां कमी रसिक व्हावें ? सर्पानें सौंदर्यपूजक, सुगंधपूजक व्हावें आणि माणसानें का घाणीची पूजा करावी ?"

फुला सध्या एका नवीन प्रयोगांत मग्न होता. एका श्रीमंत रसिकानें कृष्णकमळीच्या फुलावर सोनेरी छटा उठवून दाखवणाऱ्याला एक लाख

रुपयांचें बक्षीस जाहीर केलें होतें. एका ठरलेल्या तारखेला सर्वांनीं आपापले प्रयोग आणावे; ज्याचा प्रयोग जास्तींत जास्त यशस्वी झालेला असें ठरेल त्याला बक्षीस देण्यांत येईल; बक्षीससंमारंभ राजाच्या हातानें होईल; अशा तऱ्हेची ही वार्ता सर्वत्र गेली होती.

फुला तो प्रयोग करूं पहात होता. त्याला बक्षिसाची इच्छा नव्हती. एक लाख रुपयांसाठीं तो हपापला नव्हता. फुलांवर प्रयोग करण्यांत तर त्याचा आनंद होता. नवीन प्रयोग करायला मिळणार म्हणून तो आनंदला होता. पुष्पसृष्टीचीं रहस्यें शोधणें हेंच त्याचें जीवितकार्य होतें.

फुलाच्या घराशेजारीं एक गृहस्थ होता. त्याचें नांव गब्रू. त्या गब्रूलाहि फुलांचा नाद होता. परंतु फुलाजवळ ज्याप्रमाणें ज्ञान होतें तसें त्याच्या जवळ नव्हतें. तो जाहीर झालेला प्रयोग आपणहि करावा असें त्याच्या-मनांत आलें. परंतु कसा करावा प्रयोग तें त्याला सुचेना. त्याला एक लाख रुपयांचें तें बक्षीस रात्रंदिवस दिसत होतें. शेवटीं फुलाचा प्रयोग यशस्वी झाला तर तो आपण चोरावा असें त्यानें मनांत ठरविलें. फुला आपल्या काचेच्या घरांत प्रयोग करीत बसे. गब्रू आपल्या घरांतून तें सारें पहात असे. हे नवीन प्रयोग काचेच्या घरांत चालले आहेत, एक दिवस त्या काचेच्या घरांत शिरावें व लांबवावा तेथील प्रयोग. फुलाच्या घराजवळ एक मोठें झाड होतें. त्या झाडाच्या फांदीवरून गच्चींत उतरतां आलें असतें व त्या काचेच्या प्रयोगालयांत जातां आलें असतें.

एके दिवशीं रात्रीं गब्रूनें झाडावरून चढण्याचें ठरविलें. बाहेर अंधार होता. गब्रू हळूच फुलाच्या बागेंत आला. हळुहळू त्या घराकडे तो जाऊं लागला. इतक्यांत दोन मांजरें गुरगुरत बागेंत आलीं. तीं भांडूं लागलीं. फुलानें तें मांजरांचें भांडण ऐकलें. तीं मांजरें बागेंत भांडतील व त्यांच्या भांडणांत फुलें कुस्करलीं जातील, लहान लहान झाडांचें नुकसान होईल, म्हणून हातांत काठी व दिवा घेऊन फुला बाहेर आला. शुक् शुक्

करीत बागेंत आला. गब्रू घाबरला. तो भराभर पावलें टाकीत पळून गेला. कोण गेलें पळत, रानमांजर कीं काय? फुला सर्वत्र हिंडून पुन्हा घरांत आला. तो निजला. परंतु गब्रूला झोंप नव्हती. पळवीन, एक दिवस तुझा प्रयोग पळवीन, एक लाख रुपये मी मिळवीन असें मनांत म्हणत तो अंथरुणांत तडफडत होता.

★

प्रकरण तिसरें

# फुलाला फांशीची शिक्षा

एके दिवशीं फुला नित्याप्रमाणें आपल्या प्रयोगालयांत काम करीत होता. इतक्यांत गांवांत टापटाप असे घोड्यांचे आवाज घुमूं लागले. एक, दोन, तीन—किती हे घोडेस्वार ! खंद्या घोड्यांवर शिपाई बसलेले होते. त्यांच्याजवळ शस्त्रास्त्रें होतीं. ते धिप्पाड होते. क्रूर दिसत होते. गांवांतील लोक घाबरले. घराच्या दारांतून ते डोकावून बघत होते. कां आले हे घोडेस्वार ? काय पाहिजे त्यांना ?

घोडेस्वारांनीं फुलाच्या घराला गराडा दिला. कांहीं बाहेर उभे राहिले. कांहीं घोड्यांवरून उतरून घरांत घुसले. घरांत आत्याबाई काम करीत होती. ते शिपाई धाडधाड जिना चढून वर जाऊं लागले.

" अरे, काय पाहिजे तुम्हांला ? मला सांगा. त्याच्या प्रयोगांत नका त्रास देऊं. तो रागावेल हो. अरे वर कोठें चाललेत ? असे ताडताड काय जातां ? " ती म्हातारी आत्या बोलूं लागली.

" ए बुढ्ढये, गप्प बस त्या कोपऱ्यांत. त्या कोपऱ्यांतून हललीस तर बघ. वटवट बंद कर. " एक घोडेस्वार म्हणाला.

ते घोडेस्वार वर गेले. ते काचेच्या घरांत गेले. त्यांच्या बुटांच्या जोरदार पावलानें त्या काचा हदरल्या, थरथरल्या. फुला प्रयोगांत तन्मय झाला होता. एकदम सभोवतीं त्याला छाया दिसल्या. त्यानें वर पाहिलें, तों क्रूर शिपायी उभे.

" काय पाहिजे तुम्हांला ? " त्यानें शांतपणें विचारिलें.

" मोठा साळसूद. त्या देशद्रोही प्रधानांचे कागदपत्र तुझ्याजवळ आहेत कीं नाहीं ? बऱ्या बोलानें सांग. ते कागदपत्र दे. ऊठ. असा

बघतोस काय बावळटाप्रमाणें ! अशा बतावणीनें वांचणार नाहींस. ऊठ." तो मुख्य म्हणाला.

"कोण देशद्रोही प्रधान ?" फुलानें प्रश्न केला.

"ज्यांच्यावर विश्वास टाकून राजा प्रवासास गेला ते. ते प्रधानहि दुनियेंतून नष्ट झाले. जनतेनें न्याय दिला. आतां त्या प्रधानांच्या साथीदारांची वेळ आली आहे. तूं फुलें फुलवणारा असलास तरी कांटा आहेस. कांटे नष्ट केले पाहिजेत. नाहींतर केव्हां बोंचतील याचा नेम नाहीं. ऊठ, ते कागद आधीं दे." फुलाचा हात ओढून तो मुख्य म्हणाला.

"कागदपत्र ?"

"हो. कागदपत्र."

"माझ्याजवळ कसलीं आहेत कागदपत्रें ? माझ्या घरांत फुलांचीं पुस्तकें आहेत. फुलांचीं मासिकें आहेत. तपासा सारें घर. फुलांचें राजकारण मला माहीत. दुसरें राजकारण मला माहित नाहीं."

"खालीं चल. सारें उघडून दाखव."

सारी मंडळी खालीं गेली. फुलानें त्यांच्यासमोर किल्ल्या टाकल्या. शिपाई सारें धांडोळूं लागले. टेबलांचे खण तपासूं लागले. टेबलांच्या खणांत निरनिराळ्या प्रकारचीं बिलें होतीं. परंतु एक खण जोरानें ओढला गेला. तो सारा बाहेर आला. त्या खणांत पुढें बियांच्या पुड्या होत्या. परंतु पाठीमागें एक पुडकें होतें. कागदपत्रांचें पुडकें !

"हे बघ कागदपत्र ! पुढें बियांच्या पुड्या ठेवून पाठीमागें दडवून ठेवले होतेस. परंतु सत्य बाहेर येतें. पकडा या हरामखोराला. बांधा मुसक्या, बांधा घोड्यावर व घेऊन चला." तो प्रमुख गर्जला.

"हे कागद मी विसरूनच गेलों होतों. त्या माझ्या मित्रांनीं हे दिले होते. हे कागद जाळून टाक म्हणून त्यांनीं सांगितलें होतें. परंतु मी विसरलों. फुलांच्या नादांत राहिलों." फुला म्हणाला.

" आपल्याच तोंडानें सांगतो आहे सारें. मूर्ख आहे बेटा. बघतां काय, बांधा त्याला. " तो शिपायांना म्हणाला.

" जरा थांबा. मी वरून येतों. मग मला पकडा. माझे मित्र दुनियेंतून गेले असतील तर मी तरी कशाला जगूं ? " फुला म्हणाला.

" जा, वरून ये. " प्रमुख म्हणाला.

फुला वर गेला. त्या नवीन प्रयोगाचीं तीन कलमें त्यानें आपल्या लांब कोटाच्या खिशांत घातलीं. एका कुंडींतील थोडें अंकुरलेलें रोपटें त्यानें कागदांत गुंडाळून घेतलें. तो आपला ठेवा, तो प्रयोग घेऊन फुला खालीं आला. शिपायांनीं त्याच्या दंडाला दोऱ्या बांधल्या. ते सारे घोडेस्वार खालीं आले.

" अरे त्याला कोठें नेतां ? मारूं नका त्याला. फुलासारखा गोड आहे तो. म्हातारीचा आधार आहे तो. अरे नका नेऊं. " म्हातारी आत्याबाई ओरडत रडत बाहेर आली.

" गप्प बस थेरड्ये, का जीभ छाटूं ! " एक उग्र घोडेस्वार म्हणाला.

" आत्याबाई, घरांत जा. देव सारें चांगलें करील. माझीं फुलें फुलव. बागेंतील फुलांना सांभाळ. त्या फुलांत मी आहें. त्या फुलांमध्यें मला बघ. " फुला आत्याला म्हणाला.

फुलाला घोड्यावर बांधण्यांत आलें. ते घोडेस्वार टापटाप आवाज करीत निघून गेले. भ्यायलेला गांव आतां बाहेर आला. त्या म्हातारीकडे गांवांतील सारे लोक आले. बायका तिचें सांत्वन करीत होत्या. सर्वांना हळहळ वाटली. फक्त एकाला आनंद झाला होता. गब्रूला बरें वाटलें. आतां त्या काचेच्या घरांत जाईन व ते प्रयोग चोरीन असें त्यानें मनांत म्हटलें.

त्या दिवशीं रात्र झाली. गब्रू उठला. त्या झाडावर चढला. त्या फांदीवरून तो फुलाच्या घराच्या गच्चीवर उतरला. तें काचेचें घर उघडें

होतें. त्यानें मेणबत्ती पेटवली. परंतु तेथें ते नवीन प्रयोग त्याला आढळले नाहींत. कोठें गेले ते प्रयोग? त्यानें का बरोबर नेले? मरतांना का ते प्रयोग जवळ ठेवणार?



मरतांना का ते प्रयोग जवळ ठेवणार?

गब्रूचा तडफडाट झाला. त्यानें संतापानें दांत ओठ खाल्ले. निराशेनें त्यानें हात चोळले. तो पुन्हा घरीं आला. परंतु त्याला झोंप येईना. उजाडलें नाहीं तों गब्रू राजधानीचा रस्ता चालूं लागला. फुलाच्या पाठोपाठ तो निघाला.

फुलाचा खटला सुरू झाला. न्यायमंदिरासमोर तुफान गर्दी झाली होती. "देशद्रोह्याला फांशीची शिक्षा द्या." अशा आरोळ्या लोक मारीत होते. स्वतः न्यायाधीश थरथरत होता. फांशीची शिक्षा तो न

देता तर लोक त्याच्याही जिवावर उठले असते. तो फुलाला सौम्य शिक्षा देता तर लोक रुद्रावतार धारण करते. न्यायाधीशानें शेवटीं फांशीची शिक्षा फर्मावली. फुला शांत होता. लोकांनीं टाळ्या पिटल्या.

संगिनींच्या पहाऱ्यांत फुलाला तुरुंगांत नेण्यांत आलें. फांशी-कोठ्यांत त्याला ठेवण्यांत आलें. तेथें निजण्यासाठीं पेंढा होता. पाणी पिण्याला मडकें होतें. फुला शांतपणें त्या पेंढ्यावर पडला व झोंपी गेला. जवळ सर्प आला तरी फुलें भीत नाहींत. जवळ मरण आलें तरी फुला शांत होता.

फांशीची तारीख प्रसिद्ध झाली. उद्यांचा तो दिवस. फुलें फुलवणाऱ्या दिलदार फुलाचे प्राण उद्यां जाणार होते. सृष्टींतील सारीं फुलें दुःखी दिसत होतीं. आत्याबाई बगीच्यांत होती. परंतु सारीं फुलें सुकलीं असें तिला वाटलें.

"कां रे फुलांनो ? मान कां खालीं घालतां ? फुलाच्या जिवाला का धोका आहे ? परंतु देव सारें बरें करील असें नाहीं का तो म्हणाला ?" असें ती म्हातारी फुलांना म्हणत होती.

फुलाच्या खोलीच्या खिडकीसमोर वधस्तंभ उभारण्यांत येत होता. ज्या खांबावर फांशी देणार तो खांब उभारण्यांत येत होता. सुतारांची ठाकठोक ऐकूं येत होती. त्या खांबाकडे फुला शांतपणें बघत होता. फुलाला समोर सारखें मरण दिसावें म्हणून दुष्टांचा तो प्रयत्न होता. परंतु पवित्र आत्म्याला मरणाची का भीति असते ?

त्या तुरुंगाच्या अधिकाऱ्याचें नांव ढब्बूसाहेब असें होतें. त्याचा स्वभाव तामसी होता. त्याच्या शरीराचा तोल जसा त्याला सांभाळतां येत नसे, त्याप्रमाणें मनाचाहि तोल त्याला सांभाळतां येत नसे. मोठी करडी असे त्याची शिस्त. कैद्यांकडे तो नेहमीं साशंकतेनें बघत असे. कैद्यांशीं गोड बोलणें म्हणजे गुन्हा असें त्याचें मत होतें.

ढब्बूसाहेबांना एक मुलगी होती. त्या मुलीचें नांव कळी. कळीची आई लहानपणींच वारली. आईवेगळ्या मुलीवर पित्याचें फार प्रेम.

ढब्बूसाहेब रागीट होते. परंतु मुलीसमोर त्यांचा राग पळे. त्यांचा निश्चय कळीसमोर रहात नसे. कळी त्यांना हसवी.

कळी आतां मोठी झाली होती. चौदा पंधरा वर्षांची ती असेल. ती सुंदर होती. तिचे केस फारच सुंदर होते. तुरुंगांतील बगीच्यामधील फुलें ती केसांत घाली. आकाशांत तारे शोभावे तशीं तीं फुलें तिच्या काळ्याभोर केसांत शोभत आणि कळीचें हसणें किती गोड होतें. त्या गोड हॅसण्यानें तिनें साऱ्या जगाला जिंकून घेतलें असतें.

" कळ्ये, तूं अजून कळी आहेस. तरी तुझें हसणें इतकें गोड. मग फुललीस म्हणजे तुझें हसणें किती गोड असेल ! " पिता म्हणाला.

" बाबा, मला कळीच राहूं दे. " ती म्हणाली.

" कळीचे रंग फुलल्यावर दिसतात. कळीचा गंध फुलल्यावर दरवळतो. तुझे रंग, तुझा गंध नकोत का प्रकट व्हायला ? " पित्यानें प्रेमानें विचारलें.

" कळीचे रंग खुलले, गंध दरवळला म्हणजे लोक ती खुडून नेतात. कळीनें फुलणें म्हणजे मरणें. जें फुलतें तें सुकतें, गळतें. कळी असणें म्हणजे अमर असणें. फुलणें म्हणजे नष्ट होणें. बाबा, मला कळीच राहूं दे. " ती म्हणाली.

" तुला फुलवणारा भेटला म्हणजे एकदम फुलशील. आपण कळीच रहावें याची तुला मग आठवणहि राहणार नाहीं. तुझे रंग पसरतील, तुझा गंध घमघमाट करील." तो म्हणाला.

त्या दिवशीं रात्रीं ढब्बूसाहेब जरा बाहेर गेले होते. कळी एकटीच घरीं होती. फांशी जाणारा एक मनुष्य तुरुंगांत आहे ही गोष्ट तिला कळली होती. फांशी जाणाऱ्याला ती पाहूं इच्छीत होती. मरणाऱ्या-जवळ दोन गोड शब्द बोलावे असें तिच्या मनांत आलें. त्याला दोन फुलें नेऊन द्यावीं असें तिला वाटलें. ती उठली. दोन सुंदर फुलें घेऊन

निघाली. तिला कोण अडवणार ? तुरुंगाच्या अधिकाऱ्याची ती मुलगी, एकुलती एक लाडकी मुलगी.

शिपायाबरोबर त्या फांशीकोठ्याजवळ ती आली. आंतील कैदी आनंदी होता.

" यांची खोली उघडा जरा. " कळी शिपायाला म्हणाली.

" साहेब रागावतील." तो म्हणाला.

" त्यांचा राग मी शांत करीन." ती म्हणाली.

शिपायानें तें दार उघडलें. ती फांशी जाणाऱ्याकडे पहात राहिली. तिला कांहीं बोलवेना. तिचे डोळे भरून आले. तिचें हृदय भरून आलें.

" कशासाठीं तुम्हीं आल्यात ?" फुलानें विचारलें.

" तुम्हांला पाहण्यासाठीं."

" माणसाला काय पहायचें ? "

" तुम्ही उद्यां जग सोडून जाणार. तुमच्याजवळ दोन गोड शब्द बोलावे म्हणून मी आल्ये आहें."

" जे जगतात त्यांच्याजवळ गोड बोला. मरणाऱ्याजवळ गोड बोलण्यांत काय अर्थ ? तो तर मरणार आहे. जगणाऱ्यांना आनंद द्या. "

" तुम्हांला मरणाचें भय नाहीं वाटत ? तुमच्या खिडकीसमोर मुद्दाम तो वधस्तंभ उभारला आहे. तुम्हांला सारखा दिसावा म्हणून. तुम्हांला वाईट नाहीं वाटत ? तुम्ही तर त्या खिडकींतून हसत पहात होतेत. "

" वाईट करणाराला मरणाचें भय. मीं कधींहि वाईट गोष्ट केली नाहीं. मीं फुलें फुलविलीं. कळ्या फुलविल्या. त्यांचे रंग वाढवले, गंध वाढवले. मला कसलें भय ? आतां देवाच्या नंदनवनांत काम करीन. पृथ्वीवरचा हा फुलमाळी देवाला आवडला असेल. म्हणून तो नेत असेल. "

" माझें नांव तुम्हांला माहीत आहे ? "

" नाहीं. "

" माझें नांव कळी. "

" किती गोड नांव ! "

" परंतु कोण मला फुलवणार ? "

" भेटेल योग्य असा माळी. "

" योग्य माळी भेटला. परंतु तो तर चालला ! "

" देवाची दुनिया ओस नाहीं. "

" मरणाला मिठी मारण्याचें धैर्य तुम्हांला कोणीं दिलें ? असें मरायला तुम्हांला कोणीं शिकविलें ? "

" या लहानशा पुस्तकानें. "

" काय त्याचें नांव ? "

" श्रीमद्भगवद्गीता. "

" हें पुस्तक मरायला शिकवितें ? "

" जगायलाहि शिकवितें. कर्तव्यकर्म क[illegible] सुखानें कसें मरावें तेंहि यांत सांगितलेलें आहे. जगणें मरणें म्हणजे झोंका. [illegible]नत आहे ती. तुम्ही मोठ्या झाल्यात म्हणजे हें पुस्तक वाचा. "

" परंतु कोण शिकवील वाचायला ? "

" तुम्हांला वाचायला येत नाहीं ? "

" नाहीं. "

" कां बरें ? "

" बाबा म्हणतात, शिकल्यानें मुली बिघडतात. "

" खोटी कल्पना. ज्ञान म्हणजे परमेश्वर. ज्ञानानें मनुष्य खरा मनुष्य होतो. ज्ञानानें नम्रता येते, निर्भयताहि येते. ज्ञानानें अनेक प्रश्न सुटतात, अनेक गोष्टी कळतात. वाचन हें ज्ञानार्जनाचें एक साधन आहे, तें तुम्ही मिळवा. "

D. R. NAGARKAR, B. A.,
Home Library.
Sec.........No.........
378 Shanwar, Poona 2.



" घ्या हें पुस्तक. मरणाराची जगणाराला भेट. "

" मला देतां हें पुस्तक ! मरणालाहि आनंदानें मिठी मारावयास शिकविणारें पुस्तक देतां मला ? "

" घ्या हें पुस्तक. मरणाराची जगणाऱ्याला भेट."

" हीं घ्या दोन फुलें. हसत मरणाऱ्याची मला पूजा करूं दे. "

इतक्यांत ढब्बूसाहेब तेथें आले. ते क्रोधानें लाल झाले होते. ते थरथरत होते. फांशी जाणाऱ्या माणसाची खोली उघडी होती. भयंकर अपराध. तो कैदी पळून गेला तर ? नोकरी जायची. जन्माचें वाटोळें व्हायचें. कदाचित् शिक्षाहि व्हायची. आपणच कैद्याला फरारी होण्यास साह्य केलें असा आरोप यायचा. स्वतःच फांशी जायची पाळी यायची.

" कळ्ये, तूं येथें कशाला आलीस ? कैदी पळाला तर ? "

" बाबा, हा पळून जाणारा कैदी नाहीं. मरणाला न डरणारा हा महात्मा आहे."

" काय रे, मरण समोर आहे तरी मुलीजवळ गप्पा मारतोस ? तुला लाज नाहीं वाटत ? देवाचें नांव घेण्याऐवजीं मुलीजवळ बोलत बसतोस ? हरामखोर. निर्लज्ज आहे. पक्का बेरड आहे. मरतां मरतांहि फुलपाखरासारखा हसतो खेळतो आहे. बदमाश ! " असें म्हणून फांशी जाणाऱ्या त्या फुलाला मारण्यासाठीं हात उगारून ढब्बूसाहेब धावले. परंतु तेथें भिंतींत एक लांब खिळा होता. तो खिळा ढब्बूसाहेबांच्या डोक्याला एकदम लागला. ते खालीं पडले. भयंकर जखम झाली. भळभळां रक्त वहात होतें. शिपाई धावला. कळी घाबरली. फांशी जाणाऱ्या कैद्यानें आपला रुमाल फाडला व पट्टी बांधली. आपल्या मडक्यांतील पाणी त्यांच्या डोक्यावर तो ओतीत होता. साहेबांनीं डोळे उघडले.

" फांशी जाणाऱ्याचा मला स्पर्श ? दूर हो ! " पुन्हा साहेब ओरडले.

" बाबा, त्यांनीं तुमची जखम बांधली. डोक्यावर थंड पाण्याची धार धरिली. तुम्ही त्यांना मारायला धावलेत, परंतु त्यांनीं तुम्हांला प्रेम दिलें. अशांना आणखी शिव्या का द्यायच्या ? चला बाबा, मी हात धरून तुम्हांला नेते, उठा. " कळी म्हणाली.

कैद्याकडे बघत व पित्याला धरून कळी निघून गेली. फुला तिच्याकडे बघत होता. ती दिसेनाशी झाली. फुलानें आजपर्यंत लाखों कळ्या फुलविल्या होत्या. त्यांच्यावर त्यानें प्रेमाचे प्रयोग केले होते. त्या कळ्यांचे रंग त्यानें अधिक खुलविले होते, त्यांच्या गंधांत भर घातली होती. कळ्यांचे आकार त्यानें बदलले, त्यांच्या पाकळ्या मोठ्या केल्या. परंतु अशी कळी त्याला कधीं भेटली नव्हती. अशी कळी त्यानें कधीं फुलविली नव्हती.

ही कळी अजून फुलली नव्हती. या कळीच्या जीवनांत किती तरी रंग ओततां आले असते, गंध भरतां आले असते. या कळीला जर शिक्षण दिलें तर ? या कळीनें सुंदर विचार ऐकले तर ? या कळीला निर्मल व प्रेमळ सहवास घडला तर ? मी जगलों असतों तर या मानवी कळीवर प्रयोग केले असते. तुरुंगांत राहून प्रयोग केले असते.

★

प्रकरण चौथें

# राजा आला, फुला वांचला

फुलाचा तो शेजारी गब्रू राजधानींत आला होता. फुलाला फांशीची शिक्षा झाल्याचें त्याला कळलें. फुलाच्या अंगरख्याच्या खिशांत तीं कलमें असतील, ते प्रयोग असतील; परंतु कसा मिळवायचा तो अंगरखा? फुलाला त्याच्या कपड्यांतच फांशी देतील का? सरकार स्वतःचे कपडे कशाला खर्च करील? फुलाच्या प्रेताची व्यवस्था कोण करणार? ते मांगच बहुधा तें काम करतील. त्या मांगांकडे जावें. फुलाचे कपडे त्यांनीं द्यावे असें ठरवावें.

गब्रूच्या मनांत असे विचार आले. फांशी देणाऱ्या मांगाच्या घरीं तो गेला. मांगाच्या मांडीवर लहान मूल होतें. मांग त्या मुलाला खेळवीत होता.

"तुम्हीच ना त्या कैद्याला उद्यां फांशी देणार?" गब्रूनें विचारिलें.

"हो. काय काम आहे?"

"तुम्हांला एक विचारायचें आहे."

"तुम्ही का फांशी जाणाऱ्याचे नातलग?"

"हो."

"मग?"

"त्यांना फांशी दिल्यावर तें प्रेत माझ्या ताब्यांत द्या. प्रेत न देतां आलें तर निदान त्याच्या अंगावरील कपडे तरी द्या. तेवढी आठवण राहील. ते कपडे आम्ही घरांत ठेवूं, तेच पाहूं. नाहीं म्हणूं नका."

"प्रेत नाहीं देतां येणार. कपड्यांचें पाहीन. परंतु तुम्ही मला काय द्याल?"

" मी काय देणार ? "

" कांहीं तरी दिलें पाहिजे. माझ्या या मुलाबाळांना नको का सुख ?"

" तुम्ही फांशी देतां, तरी मुलांना खेळवतां. तुम्हीं कठोर नाहीं झालेत ? "

" वाघीण का पिलांना चाटीत नाहीं ? आणि फांशी देणें आमचा धंदा आहे. आम्ही क्रूर नाहीं. पटकन कसें फांशी द्यावें तें आम्हांला समजतें. फांशीची शिक्षा झाल्यावर कोणीतरी फांशी देणारा हवा ना ? हालहाल होऊं न देतां पटकन फांस बसेल असें करणारा नको का कोणी ? फांशी जाणारा पटकन् मरेल याची मी काळजी घेतों. परंतु फांशी दिल्याबद्दल मला काय मिळतें ? तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना प्रत्येक फांशीच्या शिक्षेस हजर राहण्याबद्दल वीस वीस रुपये मिळतात, तर आम्हांला प्रत्यक्ष फांस लावणाऱ्यास दोन दोनच रुपये ! असो. काय देणार बोला. "

" दहा रुपये देईन. "

" निघून जा. काम होणार नाहीं. "

" पन्नास देईन. "

" छट्. "

" शंभर घ्या. "

" पांचशें देतां ? "

" पांचशें ? "

" हो. "

" तीनशें देतों. आतां अधिक मागूं नका. "

" परंतु पैसे आतां मोजा. "

" अत्तां ? "

" हो. "

" मी रात्रीं आणून देतों. "

एक लाख रुपये पुढें मिळतील या आनंदांत गब्रू होता. त्यानें शहरांतील एका सधन आप्ताकडून कर्ज काढलें. रक्कम घेऊन तो रात्रीं मांगाकडे गेला. मांगानें पैसे मोजून घेतले.

" मात्र फसवूं नका. " गब्रू म्हणाला.

" मांग फसवीत नसतो. "

" सकाळीं तेथें असेन. "

" ठीक. "

गब्रू गेला. केव्हां उजाडतें असें त्याला झालें. आज रात्र का मोठी झाली? आज सूर्य का कोठें पळाला? अजून कोंबडा कां आरवत नाहीं? पाखरें कां किलबिल करीत नाहींत? कधीं संपणार रात्र? शेवटीं एकदाचें उजाडलें. आज उजाडत फुलाला फांशी द्यावयाचें होतें. लोकांच्या झुंडी बाहेर पडल्या. फांशी जाणाऱ्याचे हाल पाहण्यासाठीं थवे जात होते. " देशद्रोह्याला शिक्षा, द्या लौकर फांशी. " अशा गर्जना करीत लोक येत होते.

फुला शांतपणें प्रार्थना करीत होता. त्याच्या तोंडावर मंगल प्रसन्नता होती. त्याच्या कोठडीसमोर कळी येऊन उभी होती. परंतु त्याचें लक्ष नव्हतें. एकदम बाहेर जयघोष झाले. गर्जना झाल्या. फुलानें खिडकींतून पाहिलें. तो हसला. त्यानें दाराकडे पाहिलें तों कळी रडत होती.

" रडूं नका. " तो म्हणाला.

" माझ्या बाबांना क्षमा करा. " ती म्हणाली.

" माझ्या मनांत कोणाविषयींहि राग नाहीं. "

" आतां तुम्हांला नेतील. "

" घाबरूं नका. वाईट वाटून घेऊं नका."

" किती तुम्ही थोर ? पृथ्वीवरचे तुम्ही देव."

इतक्यांत ढब्बूसाहेब तेथें आले. सशस्त्र शिपाई आले. कोठडीचें दार उघडण्यांत आलें. दोऱ्या बांधून फुलाला त्यांनीं नेलें. कळी रडूं लागली. ती आपल्या खोलींत गेली. ती देवाची प्रार्थना करीत होती. बाहेर लाखों लोक फांशीसाठीं अधीर होते. आणि गब्रू वधस्तंभाच्या जवळ गर्दींत उभा होता.

जिकडे तिकडे कडेकोट बंदोबस्त होता. लोक आतां अधीर झाले होते. इतक्यांत फांशी जाणारा जीव त्यांच्या दृष्टीस पडला. लोकांनीं टाळ्या वाजविल्या.

" फांशीं जायचें आहे तरी हा दुःखी नाहीं."

" बेरड आहे हा बेरड."

" पक्का निगरगट्ट."

असें लोक म्हणत होते. फुलाला वधस्तंभाजवळ उभें करण्यांत आलें. अधिकारी उभे होते. मांग दोरी हातांत घेऊन तयार होता. शेवटची खूण होण्याचा अवकाश. वधस्तंभावर सूर्याचे किरण पडले होते. सर्वत्रच आतां प्रकाश पडला. सकाळचा कोवळा सोनेरी प्रकाश !

परंतु हें काय ? हा कसला गलबला ? " हटो, हटो, राजा आ गया, हटो ; ठेरो, राजा आ गया, ठेरो." असे शब्द कानांवर आले. घोडेस्वार दौडत येत होते. त्यांनीं आपले घोडे गर्दींत लोटले. घोड्यांच्या टापांखालीं कोणी तुडवले गेले. " हटो, ठेरो, राजा आ गया." सर्वत्र एकच घोष, एकच आरोळी. ते घोडेस्वार वधस्तंभाजवळ गेले. " राजा येत आहे, थांबा." असा त्यांनीं निरोप दिला. सर्व लोकांचे डोळे वधस्तंभाकडून आतां राजाकडे वळले. कोठें आहे राजा, नवीन उदार राजा ? तो पहा आला. राजा आला. शुभ्र घोड्यावर बसून वायुवेगानें राजा

येत होता. " राजा चिरायु होवो ! क्रांति चिरायु होवो ! " अशा गर्जना झाल्या.

वधस्तंभाजवळ जाऊन राजा उभा राहिला. राजाला पाहतांच सर्वांचीं हृदयें उचंबळलीं. सूडबुद्धि मावळली. हृदयें बदललीं. डोळे निराळे झाले. राजा बोलूं लागला. सर्वत्र शांतता होती.

" माझ्या प्रिय प्रजाजनांनो, मी वेळेवर आलों. तुमच्या हातून पाप होऊं नये म्हणून देवानें मला वेळेवर आणलें. प्रजेच्या पापाची जबाबदारी राजाच्या शिरावर असते. माझे दोन प्रधान गेले. त्यांची चौकशी केली गेली असती तर ते निर्दोष ठरते. माझे जणुं दोन डोळे गेले, दोन हात गेले. कोणी तरी कांहीं बातमी उठवतो. तुम्ही ती खरी मानतां. असे चंचल व अधीर नका होऊं. सत्यासत्याची निवड करायला शिका. विचारी प्रजेचा, संयमी प्रजेचा मला राजा होऊं दे. आपल्या देशाची जगांत अपकीर्ति व्हावी असें तुम्हांला वाटतें का ? या देशांतील लोक वाटेल तेव्हां खवळतात, एखाद्याला विनाचौकशी हालहाल करून ठार करतात. या देशांत न्यायनीति नाहीं. असें का जगानें म्हणावें ? आपल्या देशाला कमीपणा येईल असें कोणीहि कधींहि वर्तन करतां कामा नये. देशाचा मान वाढवा, कीर्ति वाढवा, गौरव वाढवा. तुमच्या देशाचें उदाहरण इतरांना होऊं दे. तुमच्या देशाकडे सारी दुनिया कौतुकानें बोट दाखवील असे वागा.

या अपराध्याला येथें उभें करण्यांत आलें आहे. पहा तो कसा शांतपणें उभा आहे ! पाप असें उभें राहूं शकत नाहीं. हा मनुष्य अपराधी आहे का महात्मा आहे ? आपण चौकशी करूं. जे कागदपत्र याच्या घरीं सांपडले ते मी वाचीत आहें. इतरहि सारा पुरावा मी बघत आहें. जर हा मनुष्य अपराधी ठरला तर त्याचें आपण शासन करूं. सूड म्हणून नाहीं. न्यायासाठीं म्हणून. सूडबुद्धि माणसाला शोभत नाहीं. आपण माणुसकी वाढवूं या. फांशीची शिक्षा रद्द करण्यांत येत

आहे. आरोपीला तुरुंगांत घेऊन जा. पुढें चौकशी करूं. आपण न्यायानें वागूं या. मनुष्यधर्माला जागरूक राहूं या. परमेश्वर सर्वांना सद्बुद्धि देवो."

राजाच्या भाषणाचा विलक्षण परिणाम झाला. "किती न्यायी राजा, खरा राजा, राजा चिरायु होवो! आपण माणसें होऊं या. खरेंच सूड वाईट. देशाची कीर्ति वाढवूं या. उगीच मारले ते प्रधान. परंतु आतां राजा आला. आतां सारें ठीक होईल. तो मार्ग दाखवील. किती थोर मनाचा राजा. राजाचा जयजयकार असो!" असें लोक म्हणूं लागले.

फुलाला पुन्हा तुरुंगांत नेण्यांत आलें. लोक राजाची स्तुति करीत घरोघर गेले. मांग घरीं गेला. तो गब्रू मात्र त्या वधस्तंभाजवळ मेल्याप्रमाणें बसला होता.

★

प्रकरण पांचवें

# समुद्रकांठच्या तुरुंगांत

**फुलाला** राजधानींतील तुरुंगांत ठेवणें धोक्याचें होतें. केव्हां लोक बिथरतील त्याचा नेम काय ? राजानें समुद्रकांठच्या एका दूरच्या तुरुंगांत फुलाची रवानगी केली. फुलाची एकान्त खोली होती. त्या खोलीला एकच खिडकी होती. फुला उडी मारी व त्या खिडकींतून उचंबळणारा समुद्र बघे. समुद्राच्या लाटांवरचा फेंस बघे. पाण्याच्या बागेंतील फेंसाचीं फुलें. खोलीच्या गजांच्या दारांतून तुरुंगांतील बाग दिसे. बागेंतील फुलें पाहून त्याला आनंद होई. आपल्याला बागेंत पाठवतील का कामाला, येतील का फुलांना हात लावतां, येतील का प्रयोग करतां, असें त्याच्या मनांत येई.

परंतु त्याला खोलींतून बाहेर काढण्यांत येत नसे. खोलींतच त्याचें स्नान, खोलींतच शौचमुखमार्जन. तेथेंच भोजन, तेथेंच शयन. तेथेंच चिंतन, तेथेंच मनन. ती खोली म्हणजेच सारें कांहीं.

त्याला दोन मडकीं देण्यांत आलीं. फुलानें एका मडक्याची कुंडी केली. खिशांतील एक कलम त्यानें त्या कुंडींत लावलें. एका शिपाया-जवळून त्यानें माती घेतली होती. त्या मडक्यांत माती भरून त्यांत तो प्रयोग सुरू झाला. निळ्या फुलावर सोनेरी छटा उठवण्याचा प्रयोग. मडक्यांतील वेल वाढूं लागला. कोंवळीं पानें फुटलीं. तीं पानें पाहून फुलाला आनंद होई. त्या पानांकडे तो दिवसभर बघत बसे.

समुद्रकांठच्या खिडकींतून एके दिवशीं एक पक्षी खोलींत आला. कोठून आला तो पक्षी ? निळा निळा पक्षी. त्या खोलींत येऊन तो पक्षी गाणें गाई. कांहीं वेळ त्या खिडकींत बसून निळ्या समुद्राकडे पुन्हा उडून जाई. तो पक्षी आपल्या आत्याकडून का आला होता ?

आत्याचा निरोप घेऊन तो येतो कीं काय ? असा विचार फुलाच्या मनांत आला. आत्याची आठवण येऊन फुला सद्गदित झाला. तो पक्षी आला कीं फुला त्याच्याकडे प्रेमानें बघे. त्या पक्ष्यासाठीं आपल्या भाकरींतील तुकडा तो ठेवी. पक्षी येतांच तो तुकडा फेकी, पक्षी खालीं येई व चोंचीनें तो तुकडा घेऊन पुन्हा तो खिडकींत बसे. पुढें पुढें तर फुलाच्या हातांतूनच तो पक्षी तुकडा घेई. पक्षी फुलाचा मित्र बनला.

एके दिवशीं जोडपें तेथें आलें. नर व मादी दोघें आलीं. फुलानें दोघांना दोन तुकडे दिले. त्या जोडप्यानें खोलीची पाहणी केली. एके ठिकाणीं घरटें बांधायचें त्यांनीं ठरविलें. दोघें गवत पाला, काड्या चिंध्या, आणूं लागलीं. घरट्याचें काम सुरू झालें. नर व मादी दोघें खपत. मधूनमधून गोड गोड गाणीं गात. एकमेकांच्या चोंचींत चोंच घालीत. फुलाच्या डोक्यावरून भुरभुर करीत खोलींत फेऱ्या घालीत. पक्ष्यांचें घरटें तयार झालें. मादीनें त्यांत अंडीं घातलीं. मादी घरट्यांत बसून राही. अंड्यांना ऊब देई.

फुला समुद्रकांठच्या तुरुंगांत गेल्यापासून कळी दुःखी झाली. कळीला वाटत होतें, कीं आतां कैदी आपल्या तुरुंगांत राहील. रोज त्याला भेटतां येईल. त्याच्याजवळ बोलतां येईल. लिहावाचायला शिकतां येईल. परंतु तिची निराशा झाली. तिला वाईट वाटलें. तिचा आनंद अस्तास गेला. ती ना खाई ना पिई. ती एकटी बसे, उदासीन दिसे. ती न हसे न खेळे. ती फिक्कट दिसूं लागली. ती अशक्त झाली. शेवटीं ती अंथरुणाला खिळली.

" कळ्ये, तुला काय होतें ? " पित्यानें विचारलें.

" मला सांगतां येत नाहीं. कांहींतरी होत आहे खरें. मला कांहीं सुचत नाहीं. कांहीं रुचत नाहीं, मला कंटाळा आला आहे."

" कोठें जायचें बाळ ? ".

" बाबा, समुद्रकांठीं घ्या ना बदली करून ? किती दिवसांत मी समुद्र पाहिला नाहीं. अगदीं लहानपणीं पाहिला होता. समुद्राच्या लाटांत पुन्हा एकदा डुंबूं दे, खेळूं दे. वाळूंत किल्ले बांधूं दे. बाबा, नदीला समुद्राकडे जावेंसें वाटतें. तसें मला झालें आहे. उचंबळणारा समुद्र पाहून तुमच्या कळीचें मन उचंबळेल. मी सुंदर सुंदर शिंपल्या गोळा करीन, सुंदर खडे गोळा करीन. घ्या ना बदली करून ? "

" अर्ज करून बघतों. परंतु तूं खात जा, पीत जा. कळ्ये, तूं दुःखी असलीस म्हणजे मला मग कांहीं सुचत नाहीं. तूं आनंदी रहा. "

" मी का मुद्दाम दुःखी असत्यें बाबा ? खोटें खोटें हसूं किती वेळ टिकणार ? खोटें हसणें, खोटें रडणें म्हणजे अळवावरचें पाणी."

ढब्बूसाहेबानें कोठें तरी समुद्रकांठच्या तुरुंगावर बदली व्हावी, मुलगी आजारी आहे, तिला तेथें बरें वाटेल, असें लिहून अर्ज केला. अज राजाकडे गेला. राजानें विचार केला. फुला प्रथम याच अधिकाऱ्याच्या ताब्यांत होता. फुला ज्या तुरुंगांत आहे, त्याच तुरुंगावर याची बदली केली तर बरें होईल असें राजाला वाटलें. शेवटीं ढब्बूची बदली झाली. त्या समुद्रकांठच्या तुरुंगाचा अधिकारी म्हणून तो गेला. कळीहि अर्थात् तेथें गेली.

ढब्बूसाहेब तुरुंगाची पाहणी करीत होते. पाहतां पाहतां फुलाच्या कोठडीजवळ ते आले. तेथें फुला होता. तो उभा होता. बागेंतील फुलांकडे बघत होता.

" काय ठीक आहे ना ? फांशींतून वांचलेत. आतां नीट वागा. तुरुंगाची शिस्त पाळा. मी मोठा कडवा आहें. शिस्त पाळणाऱ्याला मी चांगला आहें. शिस्तभंग करणाऱ्याला मी वाईट आहें. " ढब्बूसाहेब म्हणाले.

ढब्बूसाहेब निघून गेले. फुला पहात होता. त्याला आनंद झाला होता. कळीहि आली असेल, ती येईल, ती भेटेल, ती बोलेल. फुलानें

खोलींत उड्या मारल्या. खिडकींतून भरती आलेला समुद्र त्यानें पाहिला. त्याच्याहि हृदयांत सुखकारक कल्पनांच्या लाटा उसळत होत्या. आनंदाला भरती आली होती.

दुपारची एक दोन वाजायची वेळ होती. ढब्बूसाहेबांची ती वामकुक्षीची वेळ. पिता निजला आहे असें पाहून कळी उठली. ती एकदम फुलासमोर येऊन उभी राहिली. दोघें हसलीं, आनंदलीं. तिनें गजांतून आपले हात आंत घातले. त्यानें ते धरले. तो तिच्या हातावर बोटानें लिहूं लागला. काय लिहीत होता?

"समजलें का काय लिहिलें तें?" त्यानें विचारलें.

"हो." ती म्हणाली.

"काय लिहिलें तें सांग."

"माझें तुझ्यावर प्रेम आहे असें ना लिहिलेंत?"

"नाहीं कांहीं."

"मग काय लिहिलेंत?"

"तुला अद्याप वाचतां येत नाहीं. तूं वेडी आहेस."

"मी तुमच्या डोळ्यांवरून वाचलें. तुमच्या स्पर्शावरून वाचलें. तुमचीं बोटें थरथरत होतीं, त्यांवरून वाचलें. अक्षरें मला वाचतां येत नाहींत. परंतु डोळे वाचतां येतात. मी तुम्हांला आवडत नाहीं?"

"आवडतेस."

"आतां मला वेडी नका ठेवूं. मला शाहणी करा. मी पाटी घेऊन येत जाईन. मला धडा देत जा. मी भराभर शिकेन. म्हणजे तुम्हांला अधिक आवडेन. खरें ना?"

असें म्हणून कळी निघून गेली. दुसऱ्या दिवसापासून ती तुरुंगांतील शाळा सुरू झाली. कळीचें जीवन फुलूं लागलें. फुला खतपाणी घालूं लागला. कळी पाटी आणी. फुला गजांतून ती घेई. तिच्यावर तो अक्षरें

लिही. तो तिला उजळणी सांगे, तीं अक्षरें वाचायला सांगे. मग कळी खालीं जाई. ती खोलींत बसे व अक्षरें गिरवी. धडा पाठ करून ठेवी.

" तुमचें नांव कसें लिहायचें तें मला शिकवा आज." ती म्हणाली.

" आधीं स्वत:चें नांव लिहायला शीक."

" माझ्या वस्तूंवर मी तुमचें नांव लिहिणार आहें. माझ्या रुमालावर, माझ्या उशीवर, माझ्या आंगातल्यावर."

" मग त्या वस्तु माझ्या होतील."

" मी तुमची आहें. म्हणून माझ्या वस्तुहि तुमच्या नाहींत का? हसतां काय? शिकवा ना तुमचें नांव. काय आहे तुमचें नांव?"

" कळी फुलली म्हणजे काय होतें?"

" फूल."

" त्या फुलाला हांक कशी मारशील?"

" फुला, अरे फुला, अशी."

" हेंच माझें नांव. दोनदा घेतलेंस माझें नांव."

" फुला का तुमचें नांव? किती छान नांव. साऱ्या जगाला 'फुला' असें सांगतां वाटतें? सर्वांना फुलवणारे, फुला असें सांगणारे. या कळीला फुलवणारे. 'फु' कसा लिहायचा? सांगा ना."

त्यानें पाटीवर स्वतःचें नांव लिहून दिलें. फुला, फुला असें घोकीत कळी निघून गेली.

★

प्रकरण सहावें

# तुरुंगांतील प्रयोग

त्या दिवशीं उजाडत ढब्बूसाहेब फुलाच्या कोठडीजवळ एकदम आले. शिपायानें कोठडी उघडली. साहेब आंत शिरले. ते खोलींत पाहूं लागले. तेथें मडक्यांत तो वेल वाढत होता. संशयी साहेब त्या वेलाकडे टक लावून पाहूं लागले.

"हा कसला वेल ? हा वेल वाढवून खिडकींतून खालीं सोडायचा असेल. त्या दोराच्या साहाय्यानें पळून जायचें असेल. होय ना ? मोठे बिलंदर बोवा तुम्ही क्रान्तिकारक. कोठें काय कराल त्याचा नेम नाहीं. कोठून आणलेंस हें मडकें ? कोठून आणलीस माती ?"

"मडकें मला मिळालें होतें. माती मी मागितली. हा साधा फुलवेल आहे. यानें मी कसा पळणार ? खिडकीला भले भक्कम गज आहेत. साहेब, कांहींच्या कांहीं शंका घेऊं नका. तुरुंगांतील एवढा तरी माझा आनंद नाहींसा नका करूं. हा वेल वाढविणें, त्याचीं पानें पाहणें यांत माझा वेळ जातो."

"तुरुंग का सुखासाठीं असतात, आनंद देण्यासाठीं असतात ? तुम्हांला त्रास व्हावा, कंटाळा यावा यासाठीं तुरुंग असतात. तें कांहीं नाहीं. शिपाई, फोडा तें मडकें, तोडा तो वेल. खबरदार कोणी माती वगैरे पुन्हा द्याल तर. हे क्रान्तिकारक मोठे पाताळयंत्री असतात. मोठे कारस्थानी. बघतां काय ? फोडा तें मडकें."

"नका फोडूं. माझा सारा आनंद, माझा प्रयोग, नका नष्ट करूं."

"प्रयोग ? अरे लबाडा. पळण्याचा प्रयोग, होय ना ? फोडा, तुकडे करा त्या मडक्याचे. त्या वेलाचेहि तुकडे करा."

शिपायांनीं तें मडकें फोडलें. तो वेल कुस्करून फेकून देण्यांत आला. फुला कष्टानें तें सारें पहात होता. साहेब अजून खोलींत पहात होते. त्यांचें लक्ष एकदम वर गेलें. तों तेथें पाखरांचें घरटें.

"पाखरांचें घरटें येथें कशाला ? तुम्ही पक्षी पाळाल व त्यांच्याबरोबर निरोप पाठवाल. त्यांच्या गळ्यांत चिठ्ठया बांधाल व धाडाल. हें नाहीं उपयोगी. शिपाई, पाडा तें घरटें. पाडा."

"त्यांत मादीनें अंडीं घातलीं आहेत. ती येईल व टाहो फोडील. नका पाडूं तें घरटें. अंड्यांतून चिंव चिंव करीत पिलें बाहेर येतील. नका फोडूं तीं अंडीं. नका मारूं उद्यांचे आनंदी जीव."

"शिपाई, बघतां काय ? ओढा काठीनें तें घरटें."

तें घरटें पाडण्यांत आलें. तीं सुंदर अंडीं खालीं पडून फुटलीं. फुलाला पाहवेना. त्यानें डोळे मिटून घेतले.

"पुन्हा तुझ्या या खोलींत पक्षी दिसला, किंवा घरटें दिसलें तर अंधारकोठडींत तुला ठेवीन. याद राख." असें म्हणून ढब्बूसाहेब निघून गेले.

फुला खोलींत उदासीन होऊन बसला होता. त्याचा प्रयोग नष्ट झाला होता. पाखरांचें घरटें नष्ट झालें होतें. तीं अंडीं नष्ट झालीं होतीं. तें जोडपें येईल, ते निळे निळे पक्षी येतील, घरटें नाहीं असें पाहून त्यांना काय वाटेल ? त्यांचीं अंडीं नाहींत, मी मात्र जिवंत आहें, हें पाहून त्यांना काय वाटेल ? नर मादी येथें असतीं तर त्यांनीं अंडीं वांचविण्यासाठीं स्वतःचे प्राणहि दिले असते. चोंचींनीं त्यांनीं लढाई केली असती. परंतु मी ? मी फक्त डोळे मिटून घतले. त्या पाखरांना मी काय सांगूं ? तीं पाखरें मला काय म्हणतील ?

आणि इतक्यांत ती मादी खिडकींत आली, तों घरटें नाहीं. ती चीं चीं करूं लागली. खोलीभर तिनें फेऱ्या घातल्या. चीं चीं. परंतु कोण उत्तर देणार ? समुद्राकडे तोंड करून ती चीं चीं ओरडूं लागली.



" शिपाई, बघतां काय ? ओढा काठीनें तें घरटें. "

ती का नराला हांक मारीत होती? तो पहा नर आला. निळा निळा नर. किती सुंदर. दोघांनीं टाहो फोडला. क्षणांत खोलीकडे तोंडें करून ओरडत, क्षणांत समुद्राकडे तोंडें करून ओरडत. फुलाच्या डोक्यावरून त्यांनीं घिरट्या घातल्या. परंतु त्याला त्यांनीं चोंच मारिली नाहीं. आपल्याला प्रेमानें भाकरी देणारा असें करणार नाहीं, असा त्यांना विश्वास होता.

चीं चीं करीत नर व मादी बसलीं होतीं. समुद्र गर्जना करीत होता. "शेवटीं मरण, मरण, सर्वांना मरण." असें का त्या लाटा किनाऱ्यावर आदळून सांगत होत्या? ओहोटी भरती, जगणें मरणें असाच हा संसार आहे असें का समुद्र सांगत होता? मरायचें असेल म्हणून का जन्मलों नाहीं तों मरावें? जीवनाचा अनुभव घेऊन मग मरण आलें तर त्याचें दुःख नाहीं. परंतु असें अकालीं मरण, अंड्यांतच मरण, हें मरण दुःखदायी आहे.

फुलाची भाकरी आली. तीं पाखरें तेथेंच होतीं. त्यानें त्यांना आधीं तुकडा दिला. परंतु तीं घेत ना. त्यांनीं तोंडें फिरवलीं. चीं चीं करीत तें जोडपें उडून गेलें. फुलालाहि त्या दिवशीं जेवण गेलें नाहीं. तो तसाच न खातां पाणी पिऊन खोलींत खालीं मान घालून बसला होता.

दुपारची वेळ झाली. हातांत पाटी घेऊन कळी आली. हळूहळू फुलें पाहणारी कळी आली. ते पहा तिच्या तोंडावर शत रंग पसरत आहेत. परंतु रंग आले व गेले. फुलाची खालीं झालेली मान पाहून कळी दुःखी झाली.

"काय झालें आज?" तिनें विचारलें.

"माझा वेल कुस्करण्यांत आला. खोलींतील पक्ष्यांचें घरटें पाडण्यांत आलें. अंडीं फुटलीं. पाखरें चीं चीं करीत बसलीं. तुकडा न घेतां निघून गेलीं. कळे, कसा मी हसूं? या लहानशा खोलींतील एवढासाहि आनंद देवाला बघवला नाहीं का?"

"ज्या पुस्तकानें तुम्हांला मरणासहि हसत हसत मिठी मारायला शिकविलें, त्या पुस्तकानें निराशेंत, दुःखांत शांति ठेवायला नाहीं का शिकविलें? रडूं नका. तुमचा अपराध नाहीं. पाखरें पुन्हा आलीं तर पुन्हा त्यांना प्रेम द्या."

"पुन्हा कशाला प्रेम देऊं? पुन्हा येथें तीं घरटें बांधतील, अंडीं घालतील. पुन्हा घर पाडण्यांत येईल, अंडीं फोडण्यांत येतील. नको. त्या पांखरांना आतां मी प्रेम देणार नाहीं. तीं आलीं तर त्यांना घालवीन. मलाच येथें एकट्याला मरूं दे. त्यांच्या अंड्यांना कां मरण?"

"तुम्ही मला सांगाल का वेल कसा लावायचा? कंद कोणता घ्यायचा? काय प्रयोग करायचे? तुमच्या सांगण्याप्रमाणें मी सारें करीन. त्या बगीच्यांत लावीन. येथून तुम्हांला बघतां येईल अशा ठिकाणीं लावीन. सांगतां मला काम? तुमचें जीवनांतील काम मला सांगा. तुमच्या प्रयोगांत मला रमूं दे. तुमचा प्रयोग यशस्वी होऊं दे."

"कर माझें काम. माझ्या प्रयोगांत भाग घे. हा घे तुकडा. हा तुकडा लाव. नीट खोल खणून लाव. मी सांगेन त्याप्रमाणें खत घाल, पाणी घाल." तो म्हणाला.

"तुमचें तें पुस्तक मी वाचायला शिकल्यें. मला समजतें त्यांतलें."

"तुझे विचार वाढलेले होते. कल्पनाशक्ति वाढलेली होती. फक्त अक्षरांच्या खुणा समजायचा अवकाश होता. वाच. इतरहि पुस्तकें वाच."

"मला चांगल्या पुस्तकांचीं नांवें सांगा. तीं पुस्तकें मी मागून घेईन. देतां पाटीवर लिहून?"

"हो. देतों."

त्यानें पाटीवर चांगल्या पुस्तकांची यादी दिली. कळी निघाली. त्या फुलाच्या प्रयोगाचा तो तुकडा घेऊन निघाली. तिसरे प्रहरीं ती बगीच्यांत गेली. तिनें खालून वर पाहिलें. फुला कोठडीच्या गजांजवळ उभा होता. तिनें खणलें. त्यांत तो तुकडा तिनें लावला. तिनें वर पाहिलें. दोघांची

दृष्टि मिळाली. ती दृष्टि नव्हती. अनंत अशा मनांतील सृष्टीचा जणुं तो दरवाजा होता. त्या दृष्टींतून मनांतील सृष्टि दिसे.

कळी रोज त्या लावलेल्या वेलाची बातमी सांगे. नंतर तेथें वाची. कांहीं वेळ गप्पागोष्टींत जाई. दोघें एकमेकांचे हात क्षणभर हातांत घेत.

" हे गज कधीं दूर होतील ? हीं बंधनें कधीं तुटतील ? " ती म्हणे.

" एक दिवस तुटतील. तीं तुटोत वा न तुटोत. आपलीं मनें अभंग जोडलीं गेलीं आहेत. खरें ना ? "

" हो. "

एके दिवशीं ढब्बूसाहेबांना भेटायला एक प्रवासी आला. त्याचा श्रीमंती पोषाख होता. बोटांतून आंगठ्या होत्या. मनगटावर सोन्याचें घड्याळ होतें.

" आपण कोण कुठले ? " ढब्बूसाहेबांनीं विचारलें.

" मी मुशाफर आहें. मी एकटा आहें. घरीं पांच लाखांची जहागीर आहे. मी जगांत कोठें काय चांगलें आहे तें पहात हिंडत आहें. हा समुद्रकिनारा फार सुंदर आहे असें ऐकिलें म्हणून येथें आलों. "

" आपण लग्न वगैरे नाहीं केलें ? "

" अजून नाहीं. "

" करायचें नाहीं का ? "

" तसें ठरलेलें कांहीं नाहीं. "

" सृष्टींतील सुंदर वस्तु बघतां बघतां अनुरूप पत्नीहि मिळायची ! "

" योगायोगाच्या त्या गोष्टी असतात. "

" तुम्ही कोठें उतरलां आहांत ? "

" एका खाणावळींत. "

" आमच्याकडे या ना उतरायला. समुद्रावर फिरा. तुरुंगांतील बागेंत हिंडा. तुमच्यासारख्या सौंदर्यशोधकाची व्यवस्था लावणें म्हणजे पुण्य आहे. "

"येईन तुमच्याकडे राहायला. तसें मला परकें असें कोठेंच वाटत नाहीं. मी घरांतून बाहेर पडलों तो जगाचा मित्र होण्यासाठीं."

"तुम्ही एकदम माझ्या विनंतीस मान दिलात याबद्दल मी आभारी आहें. शिपाई तुमचें सामान आणतील. चला घरीं."

पाहुणा घरच्यासारखा झाला. तो शिपायांना चिरीमिरी देई. सारे त्याच्यावर खूष असत. त्याला तुरुंगांत सर्वत्र हिंडण्याफिरण्याची मुभा होती. एके दिवशीं तो पाहुणा बगीच्यांत हिंडतां हिंडतां कळीनें लावलेल्या झाडाजवळ उभा राहिला. तीं पानें त्यानें ओळखलीं. हाच तो प्रयोग असें त्यानें जाणलें.

पाहुणा त्या पानांकडे बघत होता व त्या पाहुण्याकडे गजांतून फुला पहात होता. इतक्यांत कळी तेथें आली.

"काय पाहतां इतकें टवकारून ?" तिनें विचारलें.

"कळ्ये, हा मनुष्य कोण ?"

"तो घरचा पाहुणा झाला आहे. म्हणतो, कीं मी मोठा श्रीमंत जहागीरदार आहें. बाबांना त्यानें भूल घातली आहे. साऱ्या शिपायांजवळ गोड बोलतो. त्याला वाटेल तेथें वाटेल तेव्हां फिरण्याची सदर परवानगी आहे."

"कळ्ये, तो गृहस्थ आपल्याच झाडाशीं बराच वेळ उभा आहे. मला भीति वाटते. या माणसाचा संशय येतो. कदाचित् त्या फुलझाडाला उपटून तो नेईल किंवा त्याचा नाश करील. तूं असें कर, उद्यां हळूच तें झाड खणून काढ. मुळांना धक्का नको लावूं. नंतर तूं तें झाड स्वतःच्या खोलींत एका मोठ्या कुंडींत लाव. खोलीला कुलुप लावून ठेव."

"बरें. तुम्ही सांगतां तसें मी उद्यां करीन."

दुसऱ्या दिवशीं उजाडत कळी बागेंत गेली. हलक्या हातांनीं ती खणीत होती. परंतु चुकून घाव मुळांवर पडला. तीं कोवळीं मुळें तुटलीं.

झाड मेलें. तें कसें जगणार ? ती रडूं लागली. तिनें वर पाहिलें. ते डोळे तिच्याकडे बघत होते. रडूं नको, अशी त्यानें खूण केली.

तो मुशाफर हिंडत तेथें आला, तों तें झाड नाहीं. आपल्यावर कोणाची तरी पाळत आहे अशी त्याला शंका आली. त्यानें वर पाहिलें, तों गजांतून फुला क्रोधानें त्याच्याकडे बघत होता. फुलाला पाहतांच पाहुणा काळवंडला. तो एकदम बगीच्यांतून निघून गेला.

कळीच्या हालचालींवर तो पाहुणा पाळत ठेवूं लागला. दुपारीं कळी फुलाच्या खोलीकडे चालली. पाठोपाठ हळूच तो पाहुणा गेला. तो जिन्यांत लपून त्यांचें म्हणणें ऐकत होता.

" मुळें तुटलीं. मला किती वाईट वाटलें–" कळी सांगत होती.

" जाऊं दे. आतां शेवटचा प्रयोग करूं. हा तिसरा तुकडा घे. हा शेवटचा तुकडा. तुझ्या खोलींतच एका मोठ्या कुंडींत हा लाव. खिडक्यांना मी सांगेन त्या रंगाचे पडदे लाव. तसा तसा प्रकाश झाडाला मिळूं दे. झाड कसें कसें वाढतें, कधीं खत घातलें, प्रकाशकिरण कसे कसे दिले, तें सारें रोजनिशींत लिहीत जा. मी तुरुंगांत असलों तरी ज्ञान जगाला कळूं दे. ती रोजनिशी तूं मग प्रसिद्ध कर. अर्थात् जर प्रयोग यशस्वी झाला तर. निळ्या रंगावर सोनेरी छटा उमटल्या तर. आणि कळ्ये, खोली कधीं उघडी टाकूं नकोस. कुलुप लावून



तो जिन्यांत लपून त्यांचें म्हणणें ऐकत होता.

बाहेर जात जा. प्रयोग कसकसा होत आहे तें मला सांगत जा. समजलीस ना ? ''

" हो. तुमच्यासाठीं सारें करीन. तुमचा आनंद तो माझा."

ती निघाली. तो पाहुणा पटकन् निघून गेला. कळीनें सांगितल्या-प्रमाणें सारें केलें. तिनें कुंडींत तो तुकडा लाविला. एका मोठ्या घडवंचीवर ती कुंडी तिनें ठेविली. खिडक्यांना तांबडे, हिरवे, निळे, असे पडदे करण्यांत आले. निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या रंगाचा प्रकाश खोलींत पडे. खोलीला तिनें एक भक्कम कुलुप केलें. बाहेर जातांना तें ती लावी.

त्या पाहुण्यानें त्यांचें सारें बोलणें ऐकलें होतें. त्यानें एके दिवशीं त्या कुलपाच्या तोंडाचा मेणावर ठसा घेतला. त्या तोंडाच्या आकाराची किल्ली त्यानें घडवून घेतली. ती किल्ली त्या कुलपाला लागेल कीं नाहीं तें त्यानें पाहिलें. किल्ली लागली. कुलुप उघडलें. आंतील कुंडी पाहुण्यानें पाहिली. "फुलूं दे तें फूल. तें पळवल्याशिवाय मी राहणार नाहीं. तें लाखाचें बक्षीस मी उपटीन. हा गब्रू मग गबर होईल. माझी कीर्ति जगभर जाईल. हा बसेल येथें तुरुंगांत रडत." असें पाहुणा म्हणाला. तो पाहुणा म्हणजे का तो गब्रू ? हो. अजून नाहीं का तुमच्या ध्यानांत आलें ?


' खोली कधीं उघडी टाकूं नकोस. '

कळी रोज त्या फुलझाडाची सारी हकीगत सांगे. आज नवीन पान फुटलें, आज नवीन धुमारा आला, सारें सांगे. ती हकीकत ऐकून

फुलाला अतोनात आनंद होई. एके दिवशीं कळी म्हणाली, " एक लहानशी कळी आली आहे. "

" कळी आली ? छान छान. कळीच्या हाताचा गुण. कळीनें कळी आणली. आतां ती फुलेल. तिच्या पाकळ्यांवर सोनेरी छटा दिसतील. प्रयोग यशस्वी होईल. " फुला नाचत म्हणाला.

त्या दिवशीं कळी मोठ्या उत्सुकतेनें भेटण्यास आली होती. झाडावरची कळी अर्धवट फुलली होती. सोनेरी छटा दिसत होत्या. केव्हां एकदा ही बातमी देऊं असें तिला झालें होतें.

" कळ्ये, तुझें तोंड आज फुललें आहे. " फुला म्हणाला.

" कारण कुंडींतील कळी फुलणार आहे. आज रात्रीं ती फुलेल. पूर्णपणें फुलेल. आतां अर्धवट फुलली आहे. सोनेरी रंग दिसत आहेत. निळ्या ढगांवर सोनेरी किरण तशी ती कळी दिसत आहे. "

" छान छान. माझा प्रयोग यशस्वी झाला. कळ्ये, किती तूं चांगली; किती हुशार. आतां असें कर. ती कुंडी घोड्यांच्या गाडींत घाल व घेऊन जा. त्या प्रदर्शनाच्या ठिकाणीं ने. ती तारीख जवळच आहे; हें फूल फुललें तरी दोन महिने कोमेजणार नाहीं. तूं आपली रोजनिशी बरोबर ने. शास्त्रज्ञ विचारतील. त्यांच्या हातांत रोजनिशी दे. "

" परंतु बाबा कसे जाऊं देतील ? "

" त्यांना विचारूंच नकोस. माझ्याकडे येत होतीस ती का त्यांना विचारून ? तूं पाप थोडेंच करीत आहेस ? "

" बरें मी जाईन. "

" परंतु कुंडी नेण्यापूर्वी मला दाखवशील का ? "

" दाखवीन. शिपाई माझें ऐकतील. रात्रीं बारानंतर घेऊन येईन. देईन कोणाच्या डोक्यावर. रात्रीं आणीन हां. जातें मी. "

तो पाहुणा सारें ऐकत होता. " आज रात्रीं फुलणार का, ठीक. " असें म्हणत तो पटकन निघून गेला.

मध्यरात्र झाली. गस्तवाले गस्त घालीत होते. बारांचे ठोके पडले. "आल बेल बराबर है." अशा आरोळ्या तुरुंगाच्या सर्व भागांतून झाल्या. ढब्बूसाहेब झोंपले होते. परंतु कळी उठली. तिनें दोन शिपाई व दोन वॉर्डर बरोबर घेतले. तिनें खोली उघडली. त्या दोन वॉर्डरांनीं ती कुंडी धरिली. शिपायांच्या हातांत कंदील होते. फुला दारांत उभा होता. ती कुंडी गजांबाहेर ठेवण्यांत आली. सुंदर फूल फुललें होतें. कृष्णवर्ण पाकळ्यांवर सोनेरी छटा. फुला पहात राहिला. त्यानें बाहेर हात लांबविले. त्या फुलाला त्याचीं बोटें लागलीं. तें फूल नाचूं लागलें. तें वारा आला म्हणून नाचलें का त्या बोटांतील भावनामय स्पर्शानें नाचलें?"

"पुरे आतां." शिपाई म्हणाले.

"बरें." फुला म्हणाला.

वॉर्डरांनीं कुंडी नेली. शिपाई गेले. कळीहि निघून गेली. ती झोंपली. पहांटे उठून ती जाणार होती. चार घोड्यांची गाडी तिनें ठरविली होती.

परंतु तो पाहुणा आधीं उठला. त्यानें ती किल्ली कुलपाला लाविली. त्यानें द्रव्यानें वश केलेल्या शिपायांकडून ती कुंडी बाहेर नेवविली. तेथें त्यानेंहि गाडी तयार ठेविली होती. कुंडी गाडींत ठेवण्यांत आली. गाडी भरधाव निघाली. दूर गेली.

पहांट झाली. कळी उठली, ती खोलींत गेली. तों कुंडी नाहीं! ती खांबासारखी उभी राहिली. घेरी येईल असें तिला वाटलें. तिच्या डोळ्यांसमोर एकदम तो पाहुणा आला. तिनें पाहुण्याचा तपास केला. परंतु तपास लागेना. त्या पाहुण्यानेंच कुंडी लांबविली यांत संशय नाहीं, असें तिला वाटलें. ती भीतभीत फुलाकडे गेली. तिनें फुलाला हांक मारिली. तिनें त्याला सारी हकीगत सांगितली.

"आतां ताबडतोब जा. तुझी रोजनिशी घेऊन जा. तुझें म्हणणें तेथें सांग. हें फूल मीं फुलविलें असें स्पष्टपणें बोल. जा. थांबूं नकोस. सत्याला यश येईल." तो म्हणाला.

ती गेली. तिची ती ठरलेली गाडी बाहेर उभी होती. तींत बसून ती गेली. पाहुण्याच्या पाठोपाठ तीहि निघाली.

सकाळीं ढब्बूसाहेब उठले. परंतु कळी कुठें दिसेना. तिचें अंथरूण रिकामें होतें. कोठें आहे कळी ? त्यानें सर्वत्र पाहिलें, सर्वत्र शोधलें. परंतु कळीचा पत्ता नाहीं. आणि ते श्रीमंत पाहुणे ? त्यांचाहि पत्ता नाहीं. तो श्रीमंत पाहुणा आपला पुढें मागें जावई व्हावा असें ढब्बूसाहेबांस वाटत होतें. म्हणून त्यांनीं त्याला घरीं ठेवून घेतलें, त्याचा मानसन्मान ठेवला. परंतु तो पाहुणा का कळीला घेऊन पळून गेला ? पित्याला न सांगतां ? लफंगा पाहुणा. परंतु त्यानें कळीला पळविलें का कळी त्याच्याबरोबर आपण होऊन गेली ? ती अलीकडे शिकत होती. लिहीत असे, वाचीत असे. त्या कैद्याकडे म्हणे शिकायला जाई. त्या कैद्यानें तर नाहीं कांहीं कारस्थान केलें ? हे क्रांतिकारक मोठे पातळयंत्री. कोणाला फितवतील, आपल्या जाळ्यांत घेतील त्याचा नेम नाहीं.

ढब्बूची एकुलती एक मुलगी. ती घरांतून गेली हें पाहून तो निराश झाला. तो संतापला, चिडला. धावत धावत त्या फुलाच्या कोठडीकडे तो गेला. शिपाई बरोबर होता. खोली खोलण्यांत आली. संतापलेला ढब्बूसाहेब फुलाला शिव्या देऊं लागला. "बदमाश, कोठें गेली माझी मुलगी ? बोल. हरामखोर. काय केलास जादुटोणा ? बोल." साहेब फुलाला मारूं लागला. फुलाहि संतापला. त्याच्या मनांतील सारें सांठलेलें जागें झालें. तो एकदम ढब्बूवर घसरला. त्यानें ढब्बूस खालीं पाडलें. फुला त्याच्या छातीवर बसला. हत्तीवर सिंहाचा छावा तसें तें दृश्य दिसत होतें. फुला त्या ढब्बूच्या थोबाडींत दोहोंकडून देत होता.

शिपायानें शिटी वाजविली. जिकडेतिकडे शिव्या झाल्या. धोक्याची घंटा घणघण घणघण वाजूं लागली. सारे शिपाई व वॉर्डर दंडुके घेऊन धावत आले. फुलाला ओढण्यांत आलें. साहेब उठले. ते थरथरत होते. शिपायांनीं फुलाला दंडे मारले.

"हरामखोर, अधिकाऱ्यावर हात टाकतोस? थांब. याला जडांतील जड अशी दंडाबिडी घाला. मागें मरणांतून वांचलास. आतां वांचणार नाहींस. अधिकाऱ्यावर हात टाकणाऱ्यास तोफेच्या तोंडीं देण्यांत येतें. तयार रहा मरणाला. आजच्या आज वर कळवतों. घाला, बेड्या घाला हरामखोराला." असें म्हणत ढब्बूसाहेब खालीं गेले.

फुलाला दंडाबिडी घालण्यांत आली. मला का तोफेच्या तोंडीं देणार? देऊं देत. माझा प्रयोग यशस्वी झाला आहे. आतां मरण आलें तरी काय हरकत? परंतु मरणापूर्वी कळी भेटेल का? माझी कळी मला दिसेल का? फुलणारी कळी. किती गोड, किती शहाणी!

★

प्रकरण सातवें

# फुलाला दोन बक्षीसें

तो पाहुणा फुलाची कुंडी घेऊन प्रदर्शनाच्या गांवीं गेला. तेथें नाना देशांतून फुलें आलीं होतीं. शास्त्रज्ञ आले होते. परंतु संपूर्णपणें कोणाचाच प्रयोग यशस्वी झाला नव्हता. कोणाच्या एकाच पाकळीवर सोनेरी छटा उठली होती. कोणाची पुसट होती. परंतु या पाहुण्यानें जें फूल आणिलें तें संपूर्णपणें कसोटीला उतरत होतें. सारे शास्त्रज्ञ पहात राहिले.

" आपलें नांव काय ? " त्या पाहुण्यास विचारण्यांत आलें.

" गब्रू." पाहुणा म्हणाला.

" आपलें नांव आजपर्यंत ऐकलें नव्हतें. आपले संशोधनात्मक लेख कधीं प्रसिद्ध नाहीं वाटतें झाले ? कोठें राहतां आपण, कोठें आहे प्रयोग-शाळा ? " अनेक प्रश्न गब्रूला विचारण्यांत आले.

" गाजावाजा मला आवडत नाहीं. मी लहानसा माळी. माझी प्रयोग-शाळा वगैरे नाहीं. मी नाना गोष्टी करीत असतों. मला प्रयोगांची हौस आहे. वाटलें कीं आपणहि करावा प्रयोग. करीत होतों. यश आलें. तसें शास्त्रीय ज्ञान मजजवळ नाहीं. उपपत्ति सांगतां येणार नाहीं. कसें कसें फूल वाढलें तें टिपलेलें नाहीं. आम्हीं साधीं माणसें. " गब्रू म्हणाला.

प्रदर्शनासाठीं राजा आला होता. उद्यां बक्षीससमारंभ होता. भव्य मंडप घालण्यांत आला होता. ध्वजापताकांनीं, लतापल्लवांनीं, फुलांच्या रंगीबेरंगी, सुगंधी अशा हारांनीं, तोरणांनीं तो मंडप सुशोभित करण्यांत आला होता. अनेक शास्त्रज्ञ राजाच्या भेटी-गांठी घेत होते. गब्रूची राजाशीं भेट करण्यांत आली.

" आपण कोठें असतां ? " राजानें विचारलें.

" एका खेडेगांवांत. "

" तुम्हीं प्रयोगांत यश मिळवलेंत, आश्चर्य आहे. "

" देवाची कृपा. "

" तुम्ही नीट शास्त्रीय ज्ञान मिळविलेंत तर आणखी चमत्कार कराल. आपल्या देशाचें नांव वाढवाल. तुम्ही शास्त्रज्ञ म्हणजेच देशाचीं भूषणें. आपलें मी अभिनंदन करतों. आपल्या या देशाला तुम्ही मान मिळवून दिलात. धन्य आहांत तुम्ही. "

गब्रू निघून गेला. परंतु आतां कळीची गाडी आली. ती शास्त्रज्ञांना भेटली. हें फूल मीं फुलवलें आहे, या लफंग्यानें तें पळवून आणलें आहे, असें तिनें सांगितलें. परंतु तिच्या म्हणण्याकडे कोणी लक्ष देईना. मला राजाची भेट घ्यायची आहे, राजाची माझी गांठ घाला, असें ज्याला त्याला ती विनवूं लागली.

शेवटीं राजाच्या कानांवर वार्ता गेली. एक मुलगी आपणांस भेटूं इच्छिते असें त्याला कळलें. त्यानें त्या मुलीला बोलाविलें. ती मुलगी आली. नम्रपणें ती उभी राहिली. नंतर राजाला तिनें प्रणाम केला.

" मुली, काय आहे तुझें म्हणणें ? " राजानें प्रश्न केला.

" महाराज, तें फूल मीं फुलविलें आहे. " ती म्हणाली.

" मोठेमोठे शास्त्रज्ञ थकले. तूं कसें फुलवणार तें फूल ? "

" ही पहा माझी रोजनिशी. हिच्यांत झाड कधीं लावलें, कोणतें खत घातलें, कोणत्या रंगाचे किरण दिले तें सारें मीं लिहून ठेवलें आहे."

राजानें ती रोजनिशी वाचली. त्यानें त्या मुलीकडे पाहिलें.

" तुझें नांव काय ? "

" कळी. "

" तुझा बाप काय करतो ? "

" ते तुरुंगाचे अधिकारी आहेत. "

" कोणत्या तुरुंगावर ? "

" समुद्रकांठच्या."

" ज्यांची मुलगी आजारी होती व ज्यांनीं समुद्रकांठीं बदली मागितली होती, त्यांचीच का तूं मुलगी ?"

" होय महाराज."

" त्या तुरुंगांत कोण आहे ?"

" ते एक राजकीय कैदी आहेत. त्यांना फुलांचें वेड. ते शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या सांगण्यावरून हा प्रयोग मीं केला. तें सारें श्रेय त्यांचें आहे. मी निमित्तमात्र."

" राजधानीच्या तुरुंगांतून तो कैदी अन्यत्र पाठवतांच तूं आजारी पडलीस. होय ना ?

" होय."

" काय होत होतें तुला बेटा ?"

" तसें कांहीं नाहीं. मी काय सांगूं महाराज ?"

" प्रेमाच्या पिशाच्चाची बाधा तर नव्हती ?"

" आपण सर्वज्ञ आहांत."

" बरें जा. उद्यां प्रदर्शन-मंडपांत माझ्या शेजारीं बैस आणि हे कपडे उद्यां काढ. नवीन सुंदर पोषाख तुला देण्यांत येईल तो घाल आणि दोन सुंदर दागिने देईन ते अंगावर घाल. समजलीस ना ? जा बेटा. काळजी नको करूं."

कळीची कळी फुलली. ती निघून गेली. दुसरा दिवस उजाडला. हजारों लोक येत होते. खेड्यापाड्यांतून शहराशहरांतून स्त्रीपुरुषांच्या झुंडी येत होत्या. तिसरे प्रहरीं बक्षीससमारंभ होणार होता. मंडप कधींच भरून गेला. सुंदर व्यासपीठ केलेलें होतें. तेथें छताखालीं ती कुंडी ठेवण्यांत आली होती. अनुपम सौंदर्यानें युक्त असें तें फूल तेथें डोलत होतें. राजासाठीं चांदीसोन्याचें सिंहासन होतें. त्याच्या दोन बाजूंस अनेक सुंदर आसनें मांडण्यांत आलीं होतीं.

राजानें कांहीं शिपायांस बोलावलें. " जा, ताबडतोब त्या समुद्र-कांठच्या तुरुंगांतील त्या राजकीय कैद्यास घेऊन या. चांगले घोडे गाडीला जुंपा. सायंकाळपर्यंत येथें आलें पाहिजे. " शिपाई ' आज्ञा ' असें म्हणून गेले. वेगवान घोड्यांची गाडी घेऊन ते गेले. तुरुंगासमोर गाडी थांबली. राजाचा निरोप ढब्बूसाहेबांस सांगण्यांत आला. शृंखला घातलेला फुला कैदी घोड्याच्या गाडींत बसविण्यांत आला. त्याच्या बाजूस सशस्त्र शिपाई बसले आणि गाडी वेगानें निघाली. आपल्याला तोफेच्या तोंडीं देण्यासाठीं नेण्यांत येत असावें असें फुलाला वाटलें.

" कोठें नेतां मला ? " त्यानें विचारलें.

" चूप. बोलना नही, पूछना नही. " शिपाई म्हणाला.

तिकडे समारंभ सुरू झाला. प्रार्थनागीत झालें. राजा बोलायला उभा राहिला. टाळ्यांचा कडकडाट झाला. जणुं आकाश खालीं पडतें कीं काय असें वाटलें. राजानें हात वर करतांच सारें शांत झालें.

" जमलेल्या नाना देशांतील थोर शास्त्रज्ञांनो व सर्व स्त्रीपुरुषांनो, आजचा दिवस आनंदाचा आहे. शास्त्रांचा गौरव करण्याचा आजचा दिवस आहे. शास्त्रानें संहारहि करतां येतो व जीवनांत आनंद व सौंदर्य यांचीहि निर्मिति करतां येते. शास्त्रांचा उपयोग संसार आनंदमय करण्यासाठीं करणें ही खरी शास्त्रपूजा. शास्त्रानें मारक शस्त्रें निर्मू नयेत. शास्त्रानें मनुष्याला माकड बनवूं नये. मनुष्याला वृकव्याघ्राहून क्रूर करूं नये. शास्त्रानें माणुसकी वाढो, आनंद वाढो. आज आपण बक्षीस देणार आहों. परंतु कोणाला ? बॉंबचा शोध लावणाऱ्याला नाहीं. तोफेचा गोळा शंभर मैल जाण्याचा प्रयोग करणाऱ्याला नाहीं. तर सृष्टींतील सौंदर्य व आनंद वाढवणाऱ्याला. शास्त्रानें सुबत्ता निर्मितां येईल. फुलें फळें वाढवतां येतील. फुलांचा प्रयोग करणाऱ्याला आज बक्षीस द्यावयाचें आहे. कृष्णकमळावर, निळ्या सावळ्या कृष्णकमळावर सोनेरी छटा उमटवणाऱ्याला हें बक्षीस द्यावयाचें होतें. अनेक देशांतील

फुलवेड्या शास्त्रज्ञांनीं प्रयोग केले. आपल्या प्रयोगांचीं फळें त्यांनीं येथें आणिलीं आहेत. सर्वांनाच सारख्या प्रमाणांत सिद्धि मिळाली नाहीं. परंतु एक प्रयोग यशस्वी झाला. तो प्रयोग येथें ठेवण्यांत आला आहे. पहा हें फूल. किती सुंदर दिसतें आहे! पहा या सोनेरी छटा. कृष्ण रंगावर सोनेरी वेलबुट्टी. अभिनव प्रयोग......"

राजाचें असें भाषण चालू होतें. इतक्यांत ती गाडी आली. सर्व लोकांचें लक्ष तिकडे गेलें. राजानें दूतांना तिकडे पाठविलें. "शृंखला काढून कैद्याला येथें आणा." अशी त्यानें सूचना दिली. दूत वेगानें गेले. फुलाच्या पायांतील शृंखला काढण्यांत आल्या, त्याला पाय हलके वाटूं लागले. नीट चालवेना. शिपाई हात धरून त्याला नेत होते. किती तरी दिवसांनीं बाहेरची मोकळी हवा अंगाला लागली. विशाल क्षितिज दिसलें. वरचें अनंत आकाश दिसलें. हजारों स्त्रीपुरुषांची सृष्टि दिसली.


त्या कैद्याला राजाजवळ नेण्यांत आलें. कैदी फिका पडला होता. परंतु त्याच्या डोळ्यांत ध्येयनिष्ठेचें पाणी होतें. राजानें त्याला सन्मानपूर्वक जवळच्या आसनावर बसविलें. त्या कैद्याला पाहतांच तो पाहुणा काळवंडला. गब्रू घाबरला. त्याची मान खालीं झाली. त्याला आपण पडणार असें वाटलें.

राजा बोलूं लागला. लोक ऐकूं लागले.

"हा जो यशस्वी प्रयोग येथें आहे, तो कोणीं केला? हे येथें एक गृहस्थ आहेत. त्यांचें नांव गब्रू. त्यांनीं आपली मान विनयानें खालीं घातली आहे. हे गब्रू म्हणतात कीं, "हा प्रयोग मीं केला." त्यांना जर शास्त्रीय माहिती विचारली तर ते म्हणतात, 'मीं प्रयोग केला आहे; माहिती मागून देईन.' ही माझ्या डाव्या बाजूस सुंदर मुलगी बसली आहे; ती म्हणते, 'हा प्रयोग मीं केला.' प्रयोग कसा कसा केला त्याची माहिती तिनें टिपून ठेविली आहे. ही पहा तिची रोजनिशी.

हिच्यांत सारें आहे. परंतु या मुलीला कोठून आलें हें ज्ञान ? तें ज्ञान तिला आतां आणलेल्या या थोर पुरुषानें दिलें. हा पुरुष तुम्ही ओळखलात का ? ज्याला तुम्ही फांशीं देणार होतेत तोच हा महात्मा. तुरुंगांतहि ध्येयपूजा त्यानें सोडिली नाहीं. याच्यासंबंधाचे सारे कागदपत्र मीं वाचले. हा थोर पुरुष निर्दोष आहे आणि ज्या दोन प्रधानांचा प्रजेनें खवळून वध केला ते प्रधानहि निर्दोष आहेत. जे कागदपत्र ह्या कैद्याच्या घरीं सांपडले त्यांत काय होतें ? देशासाठीं त्या प्रधानांनीं काय काय केलें, किती त्याग केला, किती आपत्ति सोसल्या, त्याचा पुरावा होता. परंतु ‘ ते कागद जाळून टाक. आमचा त्याग जगाला कळायला कशाला हवा ? अज्ञात असूं दे आमचा त्याग. ’ अशी चिठी त्या प्रधानांनीं आपल्या या मित्राला पाठविली होती. परंतु या मित्रानें ते कागद जाळले नाहींत. असो. ते थोर प्रधान तर गेले. परंतु या पुष्पसृष्टींत चमत्कार करणारा त्यांचा मित्र सुदैवानें वांचला. त्यानें हें फूल फुलविलें. त्यानें या मुलीकडून हा प्रयोग करविला. ही मुलगी तुरुंगाच्या अधिकाऱ्याची. या थोर पुरुषानें तिला लिहावाचायला शिकविलें. फुलें फुलवणाऱ्या या माळ्यानें या मुलीची जीवनकळीहि फुलविली. या एक लाख रुपयांच्या बक्षिसाच्या लोभानें पलीकडे ते काळवंडलेले गृहस्थ आहेत त्यांनीं पाप केलें. त्यांनीं ही कुंडी लांबविली. या मुलीच्या बापाचा त्यानें विश्वासघात केला. ज्या शृंखला या थोर पुरुषाच्या पायांत होत्या, त्याच या लफंग्याच्या पायांत घालून त्याला योग्य ती शिक्षा केली जाईल.

परंतु आधीं हा गोड समारंभ संपवूं या. एक लाख रुपयांचें बक्षीस या शास्त्रज्ञाला मी देतों. असेंच देशाचें नांव ते वाढवोत. ध्येयाची ते अशीच पूजा करोत. कष्ट पडोत, आपत्ति येवोत, मरण समोर असो. तरी ध्येयाला कसें कवटाळावें तें त्यांनीं दाखविलें आहे. ते शास्त्रज्ञ आहेत. ते महात्मा आहेत. अशीं माणसें म्हणजे पृथ्वीचें वैभव. जीवनाची थोरवी असे महात्मे जगाला दाखवितात.



ज्या शृंखला या थोर पुरुषाच्या पायांत होत्या, त्याच या लफंग्याच्या पायांत घालून त्याला योग्य ती शिक्षा केली जाईल.

एक लाख रुपयांच्या बक्षिसाबरोबर दुसरेंहि एक बक्षीस मी यांना देत आहें. ही मुलगी यांना मी देत आहें. तुम्हां सर्वांसमक्ष यांचें लग्न मी लावतों. तुमचे आशीर्वाद यांना द्या."

राजानें कळीचे हात फुलाच्या हातांत दिले. दोघांनीं राजाला वंदन केलें. दोघांनीं त्या विराट् जनतेला प्रणाम केला. सर्वांनीं जयजयकार केला. टाळ्यांचा गजर झाला. वाद्यें वाजूं लागलीं. बँड सुरू झाला. बंदुकींच्या फैरी झाडण्यांत आल्या. फुलांची वृष्टि झाली. आनंदी आनंद झाला. समारंभ संपला. कळी व फुला राजाबरोबर गेलीं. राजानें त्यांना मेजवानी दिली. सारे शास्त्रज्ञ हजर होते. राजानें वधूवरांस मूल्यवान् वस्त्रें व अलंकार यांची भेट दिली. शास्त्रज्ञांचा निरोप घेऊन, राजाचा निरोप घेऊन कळी व फुला निघून गेलीं. त्या दोघांचा आनंद अवर्णनीय होता. त्या आनंदाचें कोण वर्णन करील?

★

प्रकरण आठवें

# घरीं

वृद्ध आत्या घरीं होती. एक दिवस सारें चांगलें होईल या आशेनें ती जगत होती. फुलाच्या बागेची ती काळजी घेत होती आणि एके दिवशीं फुला घरीं आला. एकटा नाहीं आला तर त्याच्या बरोबर कोणी तरी होतें.

" आत्या, ओळखलेंस का मला ? " फुला पायां पडून म्हणाला.

" अरे, तुला का मी ओळखणार नाहीं ? आलास ? मी म्हणतच होतें कीं येशील. किती रे वाळलास ? तुरुंगांतून जिवंत आलास हीच देवाची कृपा आणि ही कोण ? "

" तुला सून आणली आहे. राजानें माझें लग्न लावलें. चांगली आहे कीं नाहीं सून ? म्हणत असस कीं लग्न कर. झालें ना आतां तुझ्या मनासारखें ? " फुलानें प्रेमानें विचारलें.

कळी आत्याबाईच्या पायां पडली. " जन्मसावित्री हो " असा म्हातारीनें आशीर्वाद दिला. तिनें त्या दोघांच्या डोक्यावरून प्रेमळ हात फिरविला. तिला खूप आनंद झाला.

नंतर एके दिवशीं कळी व फुला कळीच्या वडिलांकडे गेलीं. उभयतां पायां पडलीं. फुला म्हणाला, " मला क्षमा करा. " म्हातारा गहिंवरला. त्यानें दोघांना पोटाशीं धरिलें.

" मी आतां नोकरी पुरे करतों. तुमच्याकडे येऊन राहतों. येऊं ना कळ्ये ? मी एकटा कसा राहूं इकडे ! " पिता म्हणाला.

" तुम्हांला न्यायलाच आम्ही आलों आहोंत. आतां विश्रांति घ्या. आमचा संसार पहा. तुमचा आशीर्वाद द्या. " दोघें म्हणालीं.



" तुला सून आणली आहे. चांगली आहे कीं नाहीं सून ? "

" तो लफंग्या बसला आहे तुरुंगांत. त्याला मी जावई करणार होतों. देवानें वांचविलें. कळीचें नशीब थोर ! " म्हातारा म्हणाला.

तीं सारीं फुलाच्या घरीं आलीं. फुला व कळी फुलें फुलवूं लागलीं. त्यांचा जोडा फार शोभे. गांवांतील म्हातारीं माणसें त्यांचें कौतुक करीत. फुलाच्या बागेचें ढब्बूसाहेब रक्षण करी. लहान मुलें मुली फुलें तोडायला येत. त्यांना तो दटावी. परंतु शेवटीं फुलें देई. ढब्बूसाहेब मुलांना गोष्टीहि सांगे. मुलें त्याला भीत, परंतु त्याच्यावर प्रेमहि करीत.

कळी व फुला यांचा संसार सुखाचा झाला. त्यांना जसें सुख मिळालें तसें तुम्हां सर्वांस मिळो !

संपली ही कथा.<br>
हरो सर्वांची व्यथा.<br>
संपली फुलांची गोष्ट.<br>
होवोत वाचणारे संतुष्ट.

★

NAGARKAR, ADVOCATE
HOME
LIBRARY
378 Shanwar,
Poona 2

# न दी शे व टीं
# सागराला मिळेल

বাংলা
৫৩৭০৬

प्रकरण पहिलें

# देवाचा दरबार

**परमेश्वर** आपल्या दिव्य सिंहासनावर बसला होता. देवदूत स्तुतिस्तोत्रें गात होते. इंद्र, चंद्र, सूर्य, वायु सारे हात जोडून उभे होते. " देवा, तुझा महिमा किती वर्णावा? हें अनंत विश्व तूं निर्माण केलेंस. इंद्राला पाऊस पाडायाला लावलेंस; सूर्याला तापावयास सांगितलेंस; तुझ्या आज्ञेनें वायु वाहतो, अग्नि जळतो, समुद्र उचंबळतो; तुझ्या आज्ञेनें पर्वत उभे आहेत, नद्या धावत आहेत, फुलें फुलत आहेत, वृक्ष डोलत आहेत; किती विविध ही सृष्टि; किती सुंदर; किती मोठी; आणि सर्वांत कौतुक करण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे मनुष्य प्राणी. देवा परमेश्वरा, तुझें सारें बुद्धिवैभव मनुष्य निर्मिण्यांत ओतलें आहेस. एवढासा साडेतीन हात देहांत राहणारा हा मनुष्य, परंतु सर्व विश्वाचें तो आकलन करूं शकेल, सर्व सृष्टीवर सत्ता गाजवूं शकेल. तो पृथ्वीवर राहून ताऱ्यांचा इतिहास लिहील. तो पृथ्वीवर राहून पाताळांतील घडामोडी वर्णील. मानवाला अशक्य असें कांहीं नाहीं."

परमेश्वराची अशी स्तुति चालली होती. इतक्यांत तेथें सैतान आला. सारे कुजबुजूं लागले. दुधांत जणुं मिठाचा खडा पडला. सुखांत विष कालवलें गेलें. सर्वांच्या प्रसन्न चेहऱ्यांवर वक्रता दिसूं लागली. सैतान संतापानें व उपहासानें बोलूं लागला, " पुरे करा हीं स्तुतिस्तोत्रें. स्तुति करण्यासारखें काय आहे? परमेश्वराचें अनंत विश्व दूर राहो. आपण पृथ्वीपुरतेंच पाहूं या. काय आहे त्या पृथ्वीवर? त्या पृथ्वीवर सदैव मारणमरण सुरू आहे. 'बळी तो कान पिळी' हा प्रकार सुरू आहे. कोल्हा कोंबडीला खाईल, लांडगा कोल्ह्याला खाईल; वाघ, सिंह, सर्वांना खातील. चिमणी किडे खाईल, ससाणा चिमणीला खाईल. तेथें भूकंप होतात

व एकदम सारें गडप होतें. ज्वालामुखींचे स्फोट होतात व आगीचा वर्षाव होऊन लाखों जीव त्यांत मरतात. त्या पृथ्वीवर नाना रोग, नाना सांथी. तेथें प्लेग आहे, कॉलरा आहे; मानमोडी आहे, विषमज्वर आहे; देवी आहेत, गोंवर आहे; घटसर्प आहे, काळपुळी आहे; कोणी आंधळे आहेत, कोणी पांगळे आहेत; कोणी मुके आहेत, कोणी बहिरे आहेत. आणि त्या मनुष्य प्राण्याची कशाला स्तुति करतां? काय आहे त्या मानवांत? मनुष्यप्राणी आज हजारों वर्षें झालीं तरी आपसांत झगडत आहे. मनुष्य मनुष्याला छळीत आहे, पिळीत आहे, गिळीत आहे. एकमेकांना मारूं पाहतात, एकमेकांना गुलाम करूं इच्छितात. मारण्याचीं भयंकर साधनें शोधीत असतात. कोणी घंटा वाजविण्याचा हट्ट धरतात, कोणी ती न वाजविण्याचा हट्ट धरतात. घंटेसाठीं भांडणाऱ्यांचें का कौतुक? कोणी तोंडानें शांतिमंत्र म्हणतात आणि खुशाल रक्तपात करतात. शांतिधर्माचे, प्रेमधर्माचे उपाध्यायच युद्धांना उत्तेजन देतात. मारामारीस आशीर्वाद देतात. हा मनुष्य प्राणी वरून हसतो व मनांत रडतो. गोड बोलतो, पोटांत द्वेषाचें विष असतें. मनुष्याजवळ सत्य नाहीं, न्याय नाहीं. आपल्या मनाला जें वाटेल तें तो करतो आणि त्याचें समर्थन करण्यासाठीं फक्त बुद्धि वापरतो. मनुष्य प्राणी म्हणजे मूर्तिमंत पाप. किती स्वार्थी, किती दांभिक; किती अहंकारी, किती धूर्त; मनुष्य प्राणी म्हणजे दुनियेला शाप. तो सर्वांचा संहार करील. स्वतःच्या जातीचाहि करील. तो पक्ष्यांना गमतीसाठीं मारील व मग त्यांच्यांत पेंढा भरून ते दिवाणखान्यांत ठेवील. तो हरणें मारील व मग त्यांचीं शिंगें शोभेसाठीं आणील. तो पक्ष्यांचीं पिसें जिवंत असतां उपटील व त्या पिसांनीं नटेल. या मनुष्याकडे पाहूं नये असें मला वाटतें. मनुष्य म्हणजे वासनाविकारांचा गोळा."

देवदूत सैतानाला थांबवूं पहात होते. परंतु परमेश्वर म्हणाला, "त्याला बोलूं दे. सर्वांना मोकळेपणानें बोलण्याचें येथें स्वातंत्र्य आहे.

आणखी बोलावयाचें आहे का ? मी शांतपणें सारें ऐकत आहें. सैतान, बोल, सारें मनांतील बोल. ”

सैतान म्हणाला, “ किती बोललों तरी सूर एकच. तुझी सृष्टि वाईट आहे. ती पृथ्वी भेसूर आहे. मनुष्यप्राणी म्हणजे शापरूप आहे. ”

परमेश्वर म्हणाला, “ सैताना, मी तुला एकच सांगतों. शेवटीं सारें गोड होईल. आंबट कैरी पिकते. लहान नदी मोठी होते. नदी वेडीवांकडी जाते. कधीं उथळ, कधीं गंभीर. परंतु शेवटीं सागराला मिळते. तसाच हा मनुष्यप्राणी. तो वेडावाकडा जाईल. कधीं माकडासारखा वागेल. कधीं वृकव्याघ्रांहून क्रूर होईल. परंतु शेवटीं मांगल्याच्या सागराकडे येईल. या चिखलांतून तो शेवटीं डोकें वर करील व स्वतःचें जीवन कमळा-प्रमाणें पावित्र्यानें व माधुर्यानें भरील. मला ही आशा आहे. मला ही निश्चित खात्री आहे. तूं पहा एखादा प्रयोग करून. ते पहा सारे मानव येथून दिसत आहेत. तुला जो पसंत पडेल त्याच्यावर प्रयोग कर. त्याला पापाकडे नेण्याचा हट्ट धर. परंतु शेवटीं तो सत्पंथाकडेच वळेल. तुझ्या पापाचा शेवटीं त्याला कंटाळा येईल. चिखलांतच बेडकाप्रमाणें उड्या मारण्याचें तो बंद करील व गरुडाप्रमाणें उच्च जीवनांत भरारी मारील. करून पहा प्रयोग. बघ मानवाचा कायमचा अधःपात होतो का. जितकें त्याला खालीं नेतां येईल तेवढें नेण्यासाठीं पराकाष्ठा कर. परंतु मनुष्य शेवटीं वर येईल. ”

सैतान पृथ्वीवरच्या मानवांकडे पाहूं लागला. हातीं धरावा असा एकहि मनुष्य त्याला दिसेना. सारे दुबळे व भेकड. व्यक्तित्व कोणाजवळही नाहीं. अशा बावळटांवर प्रयोग करण्यांत काय अर्थ ? परंतु त्याला इतक्यांत एक मनुष्य दिसला. तो मनुष्य मोठा मनस्वी होता. तो कोणाचा गुलाम नव्हता. मनांत येईल तें न भितां करणारा होता. बेडर होता तो. सैतानाला तो मनुष्य मानवला. या माणसाजवळ करावा खेळ, याच्यावर

DONATED IN ME

करावा प्रयोग असें त्याला वाटलें. बलवंताला बलवंताशीं खेळायला आवडतें. सैतान परमेश्वराला म्हणाला, " तो पहा एक मनुष्य. त्याच्यावर मी प्रयोग करतों. जर मी हरलों तर तसें येऊन सांगेन. सैतानहि सत्याला मान देतो. "

परमेश्वर म्हणाला, " ठीक. जा. प्रयोग कर. ने मानवाला खालीं खालीं. परंतु शेवटीं तो चांगल्याकडेच वळेल. मला मुळींच शंका नाहीं. "

★

प्रकरण दुसरें

# सर्वज्ञ माधव

तो गांव फार मोठा नव्हता, फार लहानहि नव्हता. समुद्रकांठीं होता तो गांव. परंतु गांवाची हवा बिघडली होती. जिकडे तिकडे दलदली झाल्या होत्या. त्यामुळें बेसुमार डांस झाले होते. गांवांत हिंवतापाच्या सांथीचा कहर होता. घरोघर अंथरुणें पसरलेलीं होतीं. माणसांचे सांपळे झाले होते. परंतु कोण नष्ट करणार या दलदली? श्रीमंत लोक शहरांत राहूं लागले. त्यांना या लोकांची करुणा येईना. लोकांचें जीवन सुखी करणें म्हणजे धर्म असें कोणास वाटेना. एका श्रीमंतानें त्या गांवांत आणखी एक मोठें मंदिर बांधायचें ठरविलें. लाख दोन लाख रुपये खर्च होणार होते. त्या श्रीमंताला एक विचारी तरुण म्हणाला, "मंदिर कशाला आणखी बांधतां? मंदिरांतील देव दूर राहतो व शेवटीं तीं विलासमंदिरें होतात. आपल्या गांवांत आरोग्य नाहीं. गटारें बांधायला हवींत. दलदली बुजवायला हव्यात. त्यासाठीं करा ना हे दोन लाख रुपये खर्च. लोक निरोगी होतील. हें शरीर म्हणजे आत्मारामाचें मंदिरच. हीं देवाचीं मंदिरें आज रोगांनीं खिळखिळीं झालीं आहेत. तीं चांगलीं होतील. हा खरा धर्म आहे." परंतु तो श्रीमंत त्या तरुणावर एकदम ओरडला, "मंदिरांपेक्षां का गटारें थोर? नास्तिक आहांत तुम्ही. निघा येथून."

"एक दिवस उजाडेल व माझा विचार जगाला पटेल." असें म्हणत तो तरुण निघून गेला.

असें तें रोगपीडित गांव होतें. त्या गांवांत एक भला मोठा वाडा होता. त्या वाड्यांत एके काळीं शंभर माणसें वावरत होतीं. परंतु आज तेथें दोनच डुकल्या होत्या. एक मालकाची व दुसरी भय्याची. त्या वाड्याची नीट झाडलोटसुद्धा करणें कठीण होतें. मालक नेहमीं दिवाणखान्यांत बसलेला असे. तो फारसा कधीं बाहेर पडत नसे.

दिवाणखान्याच्या खिडक्या नेहमीं बंद असत. दारें बंद असत. दिवसाहि तेथें दिवे असत. त्या मालकाचें नांव माधव.

माधव मोठा विचित्र मनुष्य होता. त्याचें वय पंचवीस तीस असेल. लोक त्याला सर्वज्ञ माधव असें म्हणत. लोक त्याला भीत, त्याला आदरीत. कधीं साठीं सामासीं जर तो बाहेर पडला तर त्याच्या पायां पडण्यासाठीं झुंडीच्या झुंडी जमत. तो मग वैतागानें पळत सुटे. लोकांना शिव्या देई. माधवानें लग्न वगैरे केलें नाहीं. विद्येशीं त्यानें लग्न लाविलें होतें. सर्व प्रकारचें ज्ञान आपल्याला हवें असें त्याला वाटे. सर्व शास्त्रांचा त्यानें अभ्यास केला होता. त्याच्या दिवाणखान्यांत सर्व ज्ञान–विद्यांचीं पुस्तकें आहेत. तेथें पृथ्वीचा नकाशा आहे, ताऱ्यांचेहि नकाशे आहेत. तेथें प्रयोगालयांतील उपकरणें आहेत. तेथें सारें आहे.

माधवानें तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला होता, कायद्यांचा अभ्यास केला होता; त्यानें सृष्टिशास्त्र व रसायनशास्त्र यांचा अभ्यास केला होता. भूगर्भ-शास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, ज्योतिषशास्त्र, सर्वांचा अभ्यास केला होता. भूगोल व खगोल दोन्हींचा त्यानें अभ्यास केला होता. एवेंढच नव्हे तर भूतविद्या, प्रेतविद्या, पिशाच्चविद्या, यांचाहि त्याचा गाढा व्यासंग होता. मंत्रतंत्रांत तो प्रवीण होता. आयुर्वेद व आधुनिक औषधिविज्ञान यांतहि तो पारंगत होता. त्याला अमुक एक माहीत नाहीं, अमुक एक येत नाहीं असें नव्हतें. वाङ्मय, कला, शास्त्रें सर्वांत त्याची बुद्धि चाले.

माधव रात्रंदिवस वाचीत बसे. रात्रंदिवस अनंत ज्ञानाची उपासना. बाहेर लक्ष जाईल म्हणून तो खिडक्या दारें उघडीत नसे. त्याच्या अंगाला वारा कधीं लागला नाहीं, सूर्यकिरणांनीं स्पर्श केला नाहीं. किती तरी दिवसांत त्यानें फुलें पाहिलीं नाहींत. पांखरें पाहिलीं नाहींत; तारे पाहिले नाहींत, नद्या पाहिल्या नाहींत. पुस्तकांतील फुलें, फुलपांखरें तो पाही. नकाशांत तो तारे पाही; नकाशांत नद्या पाही. सारें ब्रह्मांड त्या दिवाणखान्यांतील पुस्तकांत व नकाशांत होतें.

★

प्रकरण तिसरें

# असमाधान

**परंतु** सर्वज्ञ माधव आज असमाधानी होता. इतके वर्षांत असें असमाधान त्याला कधीं वाटलें नव्हतें. तो नेहमीं पुस्तकांत रंगलेला असावयाचा. परंतु आज पुस्तकें निःसार वाटत होतीं. जीं पुस्तकें वाचतां वाचतां इतकीं वर्षें तो घामाघूम झाला, त्या पुस्तकांत काडीमात्र राम नाहीं असें आज त्याला वाटलें. तो शून्य दृष्टीनें दिवाणखान्यांतील त्या ज्ञानभांडाराकडे बघत होता.

शेवटीं तो उठला. तो खिडकीजवळ गेला. खिडकी उघडावी असें त्याला वाटलें. परंतु ती खिडकी उघडेना. बिजागरें गंजून गेलीं होतीं. बोल्ट गंजला होता. शेवटीं सर्व शक्ति एकवटून त्यानें बोल्ट ओढला. खिडकी उघडली. बाहेरच्या शुभ्र चांदण्याचा प्रकाश एकदम दिवाणखान्यांत भरला. सूर्याच्या किरणांना, चंद्रकिरणांना आजपर्यंत तो दिवाणखाना बंद होता. चंद्राच्या प्रकाशाला त्यांत शिरावयास आज आनंद होत होता. आज पौर्णिमा होती. पूर्णचंद्र अनंत अशा काळ्या सांवळ्या आकाशांत शोभत होता. मध्यरात्र झाली होती. सर्वत्र सामसूम होतें. मध्येंच एखादें कुत्रें भुंके, वटवाघळ फडफड करी. माधव त्या चंद्रप्रकाशाकडे पहात राहिला. कितीतरी वर्षांत चांदणें त्यानें पाहिलें नव्हतें. सर्व पृथ्वी दुधांत न्हाल्यासारखी दिसत होती.

माधव उभा होता. अनिमिष नेत्रांनीं तो चंद्रप्रकाश तो पीत होता. तेथें खिडकींत त्याची तंद्री लागली. तो विचारमग्न झाला. तो मनांत म्हणाला, " मी इतकीं वर्षें सर्व विद्यांचा अभ्यास करीत आहें. परंतु मला काय मिळालें ? विश्वाचें रहस्य उलगडलें का ? चंद्र, सूर्य, तारे यांचा थोडा अभ्यास केला ? परंतु या सर्वांचें आदिकारण काय ? सारीं

कोडीं सुटलीं का ? मी निःशंक झालों का ? काय मिळविलें मी ? विश्वाचें कोडेंहि मला सुटलें नाहीं व सुखांचा उपभोगहि मी घेतला नाहीं. माझें जीवन रिकामें आहे, शून्य आहे. उगीच इतकीं वर्षें येथें अंधारांत घालविलीं. फुलें हुंगिलीं नाहींत, पाण्यांत डुंबलों नाहीं; टेकडीवर चढलों नाहीं, चांदण्यांत फिरलों नाहीं; नीट खाल्लें नाहीं, नीट प्यायलों नाहीं; ना ज्ञान, ना सुख; ना मनाचें समाधान, ना देहाचें. फुकट. फुकट गेला सारा जन्म. फुकट गेलीं सारीं वर्षें.

किती तरी वेळ अशा विचारांत तो उभा होता. तिकडे कोंबडा आरवला. पहांट झाली. कोणी तरी खालीं येऊन हाका मारीत होतें. कोण होतें ? माधवाकडे अभ्यासासाठीं येणारा तो एक विद्यार्थी होता. त्याच्या हाकांनीं माधव भानावर आला. परंतु तो रागावला. या हाकांमुळें पुन्हा आपण प्रत्यक्ष सृष्टींत आलों म्हणून त्याला वाईट वाटलें. " कसा विचारांत रंगलों होतों; परंतु हा आला हाका मारीत " असें म्हणत माधव खालीं गेला.

" काय आहे रे ? कशाला पहांटे बोंबलत आलास ? मी विचाराच्या स्वर्गांत होतों. तूं माझी समाधि भंगलीस, तंद्री मोडलीस. जा. चालता हो. जा. आज अनध्याय. आज नको वाचन. फुकट आहे हें वाचनबिचन. कांहीं अर्थ नाहीं. " असें दारांत उभा राहून माधव म्हणाला.

शिष्य नम्रपणें म्हणाला, " आज तुम्ही उपनिषदें माझ्याबरोबर वाचणार होतेत. चला वर. रागावूं नका. तुमच्या ज्ञानसिंधूंतील एक कण तरी मला मिळूं दे. "

गुरु शिष्य वर आले. परंतु माधव कांहीं बोलेना. शिष्य तसाच तेथें पुस्तक उघडून बसला होता. बाहेर चांगला प्रकाश पडला. सूर्य नारायण वर आला. गांवांतील व्यवहार सुरू झाला. लोक हिंडूं फिरूं लागले. आज बाजाराचा दिवस होता. खेड्यापाड्यांतील लोक गाड्या घेऊन येत होते. भाजीपाल्याच्या, धान्याच्या, फळांच्या, उंसाच्या गाड्या येत होत्या.

" आज बाहेर फिरायला जाऊं. येतोस ? त्या टेकडीवर जाऊं. " माधव म्हणाला.

" मला घरीं काम आहे. आज बाजाराचा दिवस. " शिष्य म्हणाला.

" जा तर घरीं. आज मला फिरण्याची हुक्की आली आहे. आज नको वाचन. रोज आहेच वाचणें. " माधव म्हणाला.

शिष्य निघून गेला. माधव दिवाणखान्यांत हिंडत होता. तो पुन्हा विचारांत मग्न झाला. त्यानें एक कपाट उघडलें. त्यांतील एक कुपी त्यानें घेतली व ती खिशांत ठेविली. पुन्हा येरझारा सुरू झाल्या. एकदम कांहीं तरी ठरलें. लांब आंगरखा घालून माधव बाहेर पडला.

तो झपझप जात होता. किती तरी दिवसांनीं तो आज बाहेर पडला होता. लोक त्याच्या पायां पडण्यासाठीं धावले. एकच गर्दी झाली. लहानमोठ्यांची, स्त्रीपुरुषांची झुंबड उडाली. माधव चिडला. तो संतापला.

" कशाला माझ्या पायां पडतां ? " तो संतापून म्हणाला.

" वा ! असें कसें म्हणतां महाराज ! तुम्ही मागें औषध दिलेंत त्यानें माझा रोग गेला. देव आहांत तुम्ही. " एक मनुष्य म्हणाला.

" अरे, तुझा रोग बरा झाला असेल तर दुसरे दहा माझें औषध घेऊन मेले असतील. तुम्ही माणसें मोठीं विचित्र. नका रे त्रास देऊं. " तो पुन्हा दुसऱ्या लोकांस म्हणाला.

शेवटीं माधव पळत सुटला. निसटला एकदाचा. लोक मागें राहिले. बाजाराची गर्दी सुरू झाली. ते माधवाला विसरले. माधव आतां एकटाच जात होता. बाहेर ऊन होतें. परंतु त्याला भान नव्हतें. रात्रीं चंद्रप्रकाश त्याला आवडला; आतां ऊन आवडत होतें. तहान भूक सारें तो विसरला. शेंकडों विचार त्याच्या मनांत येत होते. ते विचार त्याला कोठें तरी नेत होते.

समोर टेकडी होती. तो आतां टेकडी चढूं लागला. जरा घसरला, परंतु पुन्हा सावरला. दुप्पट जोरानें चढूं लागला. टेकडी चढून तो वर आला. तेथें एक प्रचंड शिळा होती. त्या शिळेवर तो बसला. कितीतरी वेळ बसला. तिकडे बाजार संपत आला. गाड्या परत चालल्या. सूर्यनारायणहि अस्तास चालला. पश्चिमेकडे लाल लाल झालें होतें.

माधवानें खिशांतील ती कुपी काढली. तिचें बूच त्यानें काढलें. "टाकूं का पिऊन ? काय करायचें जगून ? काय मिळविलें ? सारें जीवन व्यर्थ आहे. मानवी जीवनांत अर्थ नाहीं. पडूं दे ही मातींत माती." असें तो म्हणत होता. पुन:पुन्हा ती कुपी तो तोंडाजवळ नेई. परंतु पुन्हा हात खालीं येई. "छे. जगाला कंटाळून का मरूं ? निराशेनें मरूं ? मी का भ्याड आहें ? दुनिया मला भेकड मानील. माधव भेकड नाहीं. माधव निराशेच्या आहारीं जाणार नाहीं. माधव जगांत कोणालाहि शरण जाणार नाहीं. नकोत हे मरणाचे विचार. आत्महत्येचे दुबळे विचार." त्यानें ती कुपी दूर भिरकावून दिली. त्यानें मरण भिरकावलें; पुन्हा जीवनाला मिठी मारायला तो उभा राहिला.

★

## प्रकरण चौथें

# सैतानाशीं करार

**निराशेला** खोल दरींत भिरकावून माधव तेथें बसला होता. अस्तास जातांनाहि सूर्य लाल आहे, मरतांनाहि तो झगडत आहे. मलाहि झगडूं दे. असें त्याच्या मनांत आलें. आतां जरा अंधार पडला. परंतु थोड्या वेळानें चंद्र वर आला. सुंदर चांदणें पडलें. माधव घरीं जाण्यासाठीं निघाला. इतक्यांत त्याच्या पायांशीं एक कुत्रें आलें. कोठून आलें तें कुत्रें ? एकदम कसें आलें ?


तें कुत्रें साधें नव्हतें. तें निराळें होतें. माधव त्याच्याकडे निरखून पाहूं लागला. तें कुत्रें बरोबर न्यावें असें त्याला वाटलें. "कुर, कुर कुर कुर" करीत तो त्या कुत्र्याला बोलावीत होता. कुत्रेंहि त्याच्या पाठोपाठ येत होतें. तें कुत्रें वाटेंत इकडे तिकडे गेलें नाहीं. त्याच्यावर गांवांतील कुत्रीं भुंकलीं नाहींत. मोठें चमत्कारिक कुत्रें.

माधव आपल्या दिवाणखान्यांत आला. तें कुत्रेंहि दिवाणखान्यांत आलें. तें कोपऱ्यांत बसलें. माधवानें दार लावून घेतलें. त्यानें खिडकी बंद केली. त्यानें तेलचूल पेटविली. ज्वाला निघूं लागल्या. माधव कांहीं मंत्र पुटपुटूं लागला. पिशाच्चविद्येंतील ते मंत्र होते. त्या ज्वालांतून एकदम कोणी बाहेर आलें. माधवासमोर तें उभें राहिलें.

"कोण आहेस तूं ?" माधवानें प्रश्न केला.

"मी जीवनाचा साक्षी. माणसाचें जन्म मरण मी पाहतों. सुखदु:खांच्या वाटांवर तो कसा हेलकावे खातो तें मी पाहतों." ती व्यक्ति म्हणाली.

"जीवनावर तुझी सत्ता आहे का ? माणसाला पाहिजे तें देशील का ? जी जी इच्छा उत्पन्न होईल ती ती तूं पुरवशील का ?"



" तुला ज्याची जरूर आहे तोच मी. "

"मी अकर्ता आहें. मी केवळ साक्षी आहें. देणें घेणें माझें काम नाहीं. दिवस रात्र, सुख दुख, जीवन मरण, यांचा विराट् खेळ मी पाहात असतों. एवढेंच माझें काम."

"तुझी मला जरूर नाहीं. कशाला आलास माझ्या समोर? नीघ येथून. कर काळें." रागानें माधव म्हणाला.

ती व्यक्ति अंतर्धान पावली. माधव पुन्हा कांहीं मंत्र पुटपुटूं लागला. तेलचूल त्यानें जोरानें पेटविली. हिरव्या निळ्या ज्वाळा सों सों करीत होत्या. त्या कोपऱ्यांतील कुत्र्याकडे पहा. हळुहळू त्याच्यांतून एक मनुष्य बाहेर पडत आहे. तें पहा मोठें डोकें, ते पहा हात, ती छाती, ते पाय. तो पहा लांब आंगरखा व डोक्याला रुबाबदार फेटा. ती पहा हातांत भली भक्कम काठी. ते पहा पायांत जोडे. कशी भव्य आहे आकृति. ती आकृति माधवासमोर येऊन उभी राहिली.

"कोण तूं?" माधवानें प्रश्न केला.

"तुला ज्याची जरूर आहे तोच मी."

"माझ्या सर्व इच्छा पुरवशील? मला पाहिजे तें देशील?"

"हो. तुला जें पाहिजे तें देईन. एवढेंच नव्हे तर जगांतील सारीं सुखें तुला चाखवीन. केवळ मनुष्ययोनींचींच नव्हे तर भूतयोनींतील, पिशाच्च लोकांतीलहि सुखें तुला दाखवीन. तुला सर्वत्र हिंडवीन फिरवीन. जीवनांतील मौज दाखवीन."

"परंतु याबद्दल तुला काय देऊं?"

"मला पैशाचा मोबदला नको. आपण असें ठरवूं या. बारा वर्षेंपर्यंत मी तुम्ही जें जें सांगाल तें करीन. जें जें मागाल तें देईन. बारा वर्षें मी तुमचा गुलाम आणि बारा वर्षें संपलीं, बाराव्या वर्षाच्या शेवटच्या दिवसाचे रात्रीचे बारा वाजले कीं तूं माझा गुलाम व्हायचास-कायमचा गुलाम. आहे कबूल?"

" असा कालावधीचा करार नको. तुम्ही मला सुखें देत रहा. निरनिराळे अनुभव देत रहा. ज्या वेळेस 'हा क्षण किती सुंदर, हा क्षण माझ्या जीवनांत अमर होवो' असे शब्द माझ्या तोंडून बाहेर पडतील त्या वेळेस मी तुमचा गुलाम होईन. पटलें का तुम्हांला?"

" ठीक. तूं म्हणतोस तसें का होईना! ठरलें. आजपासून मी तुझा बंदा सेवक. मला वाटेल तें सांग, मजजवळ वाटेल तें माग."

" मला जगाचा अनुभव नाहीं. तूंच मला जें जें भोग्य असेल तें देत जा. माझ्या तोंडून ते शब्द बाहेर पडतील अशी तूं खटपट कर."

" बरें तर. मी आरंभ करतों. मीट डोळे, डोळे मीट."

" परंतु आधीं तुझें नांव सांग."

" माझें नांव सैतान."

" सैतान तो का तूं? वा, छान! मिटूं डोळे? हे बघ मिटले." माधवानें डोळे मिटले. सैतान त्याला दूर घेऊन गेला.

★

प्रकरण पांचवें

# प्रेमाचा पेला

"उघड डोळे" सैतान म्हणाला.

माधवानें डोळे उघडले. कोठें आले होते ते? तेथें एक मोठा दिवाणखाना होता. तेथें खाणेंपिणें चाललें होतें. मोठी मेजवानी होती. कोणी लाडू खात होते, कोणी जिलबी खात होते; कोणी चिवड्यावर हात मारला, तर कोणी भज्यांवर खूष होते. कोणी फळांचे भोक्ते होते, ते द्राक्षांच्या घडांवर तुटून पडत होते. कांहींना संत्रीं मोसंबीं आवडलीं. हें काय? एकदम अंधारसा झाला? सैतानानें गंमत केली. दिवे विझले. लोक एकमेकांच्या हातांतील ओढूं लागले. कोणाला कांहीं दिसेना. द्राक्षें म्हणून ओढायला जात तों कोणाच्या तोंडाला हात लागे. फजीती झाली. पुन्हा प्रकाश आला. सारे हसूं लागले. पुन्हा खाण्यावर घसरले. आतां कोणी मद्याकडे वळले. दारूचे पेले रिकामे होऊं लागले. दारू पिऊन प्रेमाला भरती आली. एकमेकांच्या गळ्यांत पडूं लागले. "तूं अगदीं माझा, अगदीं माझा." असें म्हणूं लागले. परंतु प्रेमांतून कलह जन्मला. मारामारी सुरू झाली. "चप्पल बघ पायांतली. देईन एक ठेवून. बदमाश. माझें घेतो." असे शब्द सुरू झाले. परंतु शेवटीं भान नाहींसें झालें. सारे घेरी येऊन पडले. किळसवाणा प्रकार.

"अरे खा ना वाटेल तें. नुसतें बघत काय उभा राहिलास!" सैतान म्हणाला.

"मला नाहीं खाण्यांत मौज वाटत. का नुसतें खात बसायचें? हे पहा कसे लोळत पडले आहेत. मी का असा लोळूं? छे. मला दुसरीकडे ने. हीं सारीं डुकरें आहेत. खाण्यासाठीं हपापलेलीं. माधव निराळा आहे. हं. ने दुसरीकडे." माधव चिडून म्हणाला.

" मीट डोळे, मीट डोळे. " सैतान म्हणाला.

" माधवानें डोळे मिटले. हवेंतून दोघे जात होते. सैतानानें डोळे उघडायला सांगितलें. तों कोण दिसलें समोर ? पिशाच्च-लोकीं ते आले होते. जखणी, डाकिणी, समंध, भुतें सर्वांची तेथें गर्दी होती. अक्राळ-विक्राळ-भेसूर रूपें. डाकिणींचे केस सोडलेले होते. कडकड कडकड दांत खात त्या डाकिणी आल्या. त्यांचीं नखें म्हणजे जणुं सुया. त्यांनीं माधवाला मिठी मारली.

" हें काय ? बोंचल्या सुया. सोडा मला. मला मारूं नका, खाऊं नका. " माधव म्हणाला.

" दूर उभ्या रहा. " सैतानानें आज्ञा केली.

" आम्ही तुम्हांला आलिंगन देत होतों. तुम्हांला भेटत होतों. असे घाबरलेत काय ? " त्या डाकिणी विकट हसून म्हणाल्या.

" हें पहा. हे पाहुणे दमले आहेत. यांना एक पेलाभर तें पेय घेऊन या. जा. " सैतान म्हणाला.

माधव सर्वत्र पहात होता. कोणी भुतें हिरकुटासारखीं बारीक परंतु उंचच उंच होतीं. पेटलेल्या उदबत्तीसारखीं तीं दिसत. डोळे लाल लाल. कोणी पिशाच्चें विष्ठा खात होतीं, तर कोणी चिखलांत लोळत होतीं. कोणी नाचत होतीं, कोणी घोरत होतीं. माधवाला वीट आला तें सारें पाहून.

इतक्यांत एक डाकीण पेयाचा पेला घेऊन आली. तो पेला मात्र सुंदर दिसत होता. जणुं सूर्यकिरणांचा तो बनलेला होता. त्या स्वच्छ शुभ्र पेल्यांत तें पेय फारच खुलत होतें. तें पेय उसळत होतें. सुवास सुटला होता.

" घे हा पेला. पी. आणखी लागलें तरी आणूं. " सैतान म्हणाला.

" पिऊं ? धोका तर नाहीं ना ? " माधवानें विचारलें.

" मी तुझा सेवक आहें. मी कसा फसवीन? निःशंकपणें पेला रिकामा कर. मधुर सुंदर रस. देवांनाहि हा दुष्प्राप्य आहे. "

माधवानें पेला हातीं घेतला. भुतें नाचूं लागलीं, गाऊं लागलीं. भुतेरी वाद्यें वाजूं लागलीं. पाहुण्यांचें स्वागत होत होतें. माधव साशंक होता.

" पी, भल्या माणसा, पी. भित्रेपणा तुला शोभत नाहीं. "

" मी भित्रा नाहीं. हा बघ पितों. "

माधवानें पेला रिकामा केला. भुतें निघून गेलीं. माधवाची चर्या आनंदी झाली. तो रंगेल दिसूं लागला. जणुं नाचरें फुलपाखरूं.

" सैताना, चल लौकर. कोठेंतरी गंमतीच्या ठिकाणीं ने. " माधव म्हणाला.

" मग डोळे मीट. मीट डोळे. " सैतान हसून म्हणाला.

त्यानें डोळे मिटले. कोठेंतरी ते जात होते. " उघड डोळे " सैतान म्हणाला. माधवानें डोळे उघडले. ते मर्त्यलोकींच्या एका शहरांत उतरले होते.

★

प्रकरण सहावें

# मधुरीची भेट

माधव जें पेय प्यायला, त्याचा एक विशेष परिणाम होत असे. तें पेय प्यायल्यावर जी स्त्री प्रथम दिसेल तिच्यावर प्रेम जडायचें असें होत असे. माधव व सैतान जात होते. माधवच्या मनांत आज निराळ्याच भावना उचंबळत होत्या. तो आज नवीन झाला होता.

ती पहा एक मुलगी देवळांत जात आहे. हातांत पूजेचें ताट आहे. तिच्या अंगावर अलंकार नाहींत. नेसूं साधें पातळ आहे. गरिबाची आहे वाटतें ती ?

माधवनें तिला पाहिलें. त्याचें तिच्यावर प्रेम बसलें. तो वेडा झाला. तो तिच्या पाठोपाठ जाऊं लागला. ती मुलगी बावरली, घाबरली. ती लगबगीनें जाऊं लागली. माधव तिच्या पाठीशीं आहे. तिच्या हातांतील पूजेचें ताट खालीं पडलें. माधव एकदम लघळपणें खालीं वाकला. त्यानें तें ताट उचलून तिच्या हातांत दिलें. ती लाजली. ती रागावली.

"लाज नाहीं वाटत पाठोपाठ यायला ? माणसें का कुत्रीं तुम्हीं ? हा काय चावटपणा ? खबरदार पाठोपाठ याल तर. मनाची नाहीं तर निदान जनांची तरी. चाहाटळ कुठला. मला नसतें वाटतें ताट उचलतां आलें ? तुझ्यामुळें तर तें पडलें." असें ती संतापानें म्हणाली.

माधव थबकला. मुलगी निघून गेली. परंतु तिनें मागें वळून पाहिलें. पाठोपाठ येत आहे कीं काय हें का तिनें पाहिलें ? तें पाहणें प्रश्नार्थक होतें कीं इच्छार्थक होतें ? काय होता त्या पाहण्यांत अर्थ ?

"सैताना, ही मुलगी मला मिळाली पाहिजे. तिच्याशिवाय मी जगणार नाहीं. तिच्याशिवाय मला चैन पडणार नाहीं. कोणतीहि युक्ति कर. वाटेल तें कारस्थान कर; परंतु ती मला हवी." माधव म्हणाला.

"घाबरूं नकोस. तुझ्या इच्छा पुरविणारा मी परमेश्वर आहें. चल माझ्याबरोबर. तिकडे आपण गंमत करूं." सैतानानें सांगितलें.

दोघे चालूं लागले. थोड्या वेळानें एका लहानशा घराजवळ सैतान थांबला.

"कां थांबलाससा ?" माधवनें विचारिलें.

"हें तिचें घर." सैतान हसून म्हणाला.

"मग ?"

"हा मोत्यांचा कंठा या खिडकींतून आंत फेक." सैतानानें सांगितलें. तो एक सुंदर हार होता. करवंदाएवढीं मोतीं होतीं. सैतानानें तो माधवच्या हातांत दिला. माधवनें खिडकींतून तो आंत फेकला.

"पुढें काय ?" त्यानें विचारलें.

"येथेंच जरा थांबूं. काय होतें तें पाहूं." सैतान म्हणला.

दोघे बाजूला उभे राहिले. कांहीं वेळानें ती मुलगी आली. ती घरांत गेली. ती आपल्या खोलींत शिरली. तों तेथें तो मोत्यांचा हार. त्या हाराकडे ती बघत राहिली. कशीं टपोरीं मोतीं, किती पाणीदार ! तिनें हळूच तो हार उचलला. तिनें तो आपल्या गळ्यांत घातला. तिनें आरशांत पाहिलें. तिच्या गोऱ्या गोऱ्या गळ्यांत तो खुलून दिसत होता. परंतु कोठून आला तो हार ? आईला सांगितलें पाहिजे.

तिकडे त्या मुलीची आई काम करीत होती.

"आई आई, हा बघ मोत्यांचा हार. माझ्या खोलींत होता. कोणीं टाकला, कोठून आला ? मी घेऊं का तो ? हा बघ मी गळ्यांत घातला आहे. छान दिसतो नाहीं ? माझ्या गळ्यांत ना दूड ना एकदाणी. ओका ओका दिसे गळा नाहीं ? आतां कसा दिसतो बघ. बघ ना आई. तूं हातांत घेऊन बघ. पुष्कळ असेल किंमत नाहीं ?" मुलगी आनंदानें सांगत होती.

आईनें तो कंठा हातांत घेतला. नीट पाहून ती म्हणाली, "आपल्याला, नको ग बाई हा कंठा. गरिबांना असले दागिने काय कामाचे? कोणी चोरीचा आळही घ्यायचे. आपण हा हार रामाच्या देवळांत नेऊन देऊं. रामाला होईल. देवाच्या गळ्यांत शोभेल."

"देवाच्या गळ्यांत तरी तो राहील का? रामाचे दागिने वेश्यांच्या अंगावर गेले. तसा हा हारहि जाईल. रामाचा मालक नांवाचा रामाचा मालक. जें रामाला दिलें जातें, रामापुढें ठेवलें जातें, तें त्याच्या प्रियकरणीकडे जातें. त्यापेक्षां माझ्या गळ्यांत असला म्हणून काय बिघडलें?"

"तुला कळत नाहीं. आपण चोरीची वस्तु कशी वापरायची? जी वस्तु आपली नाहीं ती वापरणें म्हणजे चोरी. आपण रामाला नेऊन देऊं. तो पुजारी मालक कांहींहि करो. त्याचें पाप त्याला."

"परंतु त्याच्या पापाला आपण उत्तेजन देतों. आपणाला माहीत असून त्याच्या हातांत संपत्ति देणें म्हणजे आपणहि पापी."

"तूं फारच बोलायला शिकलीस. तुझी आई साधीभोळी आहे. आपण श्रद्धेनें करावें. आपल्यापुरतें पहावें. जा तीं धुणीं धुऊन आण. तुला काम नको. नटायला मात्र हवें. राणीच्या पोटीं कां आली नाहींस? माझ्यासारखीच्या पोटीं आलीस. आतां कर काम. रडायला काय झालें?"

ती मुलगी आपल्या खोलींत आली. ती रडत बसली. इतक्यांत सैतान व माधव तिच्या खिडकीपाशीं आले. सैतानानें आणखी एक हार माधवच्या हातीं दिला. त्यानें तो खिडकींतून आंत फेकला. त्या मुलीनें तो हार पाहिला. तिनें तो हातांत घेतला. तिनें गळ्यांत घातला. पुन्हा तिनें आरशांत पाहिलें.

"किती छान दिसतो मला? कोणाजवळ आहेत असे हार? हा हार आतां आईला नाहीं दाखवणार. लपवून ठेवीन. किती सुंदर हार!

कोणाजवळ आहेत असे हार, कोणाजवळ आहे इतकी संपत्ति? कोण फेकतें हे हार या खिडकींतून?" ती मुलगी स्वतःशीं बोलत होती.

"माझ्याजवळ आहेत असे हार. मी फेकले ते. तुझ्यासाठीं मी प्राणहि फेकीन. मग हारांचें काय? तूं माझ्यावर रागावून गेलीस. परंतु पुन्हा मागें वळून पाहिलें होतेंस. माझें तुझ्यावर प्रेम आहे. तूं माझी हो. तुला सोन्यामोत्यांनीं मढवीन. तुला सुखी करीन. खरेंच–" माधव भावनावश होऊन बोलत होता.

"तुमचें प्रेम आहे माझ्यावर?" तिनें विचारिलें.

"हो."

"खरोखर!"

"खरोखर."

"आतां जा. आई येईल. परंतु पुन्हा कोठें भेटाल?"

"गांवाबाहेरच्या बागेंत. तेथें सायंकाळीं ये. आपण बोलूं. एके ठायीं बसूं. हात हातांत घेऊं. खरेंच ये. येईन म्हण. कबूल कर."

"येईन. सायंकाळीं येईन. माझी वाट पहा. मला काम असतें तें आटोपून येईन. जरा उशीर झाला तर जाऊं नका. हिनें फसवलें असें म्हणूं नका. रागावूं नका. तुमचें प्रेम आहे ना माझ्यावर? प्रेम रागावणार नाहीं. खरें ना?"

"हो. मी वाट बघेन. तुझ्याकडे डोळे लावून बसेन."

"मी आतां जातें. धुणीं धुवायचीं आहेत."

"आम्ही जातों."

ते दोघे निघून गेले. ती मुलगी निघून गेली. धुणीं धुवायला गेली. हार लपवून ठेवून ती गेली. ती धुणीं धूत होती. तिच्या मनांत किती कल्पना येत होत्या. किती विचार उसळत होते. एकदाची झालीं धुणीं धुऊन. तीं धुणीं लोकांकडचीं होतीं. त्यांच्याकडे जाऊन तीं वाळत घालून ती घरीं आली. पुन्हा तो हार गळ्यांत घालून बसली.



गांवाबाहेरच्या बागेंत. तेथें सायंकाळीं ये.

दुपार झाली. गिरणीचा भोंगा झाला. तिचा भाऊ गिरणींत कामगार होता. तो घरीं आला. भाऊबहीण जेवायला बसलीं. आई वाढीत होती. भाऊ झटपट जेवून गेला. त्याला वेळ कोठें होता! वेळेवर गेलें पाहिजे. क्षणाचा उशीर झाला तर दंड असे, शिव्या खाव्या लागत.

"आई, भाऊचें लग्न कधीं ग होणार?" बहिणीनें विचारिलें.

"देवाला माहीत. आधीं तुझें हवें करायला. मग त्याचें. माझ्या डोळ्यांदेखत एकदा तुमचा संसार सुरू झाला म्हणजे झालें. दुसरी माझी आतां इच्छा नाहीं. मग डोळे मिटले तरी चालतील." आई म्हणाली.

जेवणें खाणें झालीं. ती मुलगी पुन्हा गळ्यांत तो हार घालून बसली. "किती सुंदर हार, कसा शोभतो माझ्या गळ्याला! त्यांचें माझ्यावर प्रेम आहे. खरेंच का प्रेम असेल? प्रेम एकदम जडतें म्हणतात. मी त्यांच्यावर रागावलें. परंतु पुन्हा मीच त्यांच्याकडे वळून पाहिलें. त्यांच्याजवळ हार असतील हें का मला माहीत होतें? परंतु पाहिलें खरें. माझें का त्यांच्यावर प्रेम आहे? गोड बोलतात, गोड दिसतात आणि श्रीमंत का आहेत ते? परंतु श्रीमंती काय करायची? प्रेमाची श्रीमंती आधीं हवी. मला एक दोन दागिने आवडतात. परंतु ते न मिळाले म्हणून काय झालें? दागिन्यांशिवायाहि मी सुंदर दिसतें. सौंदर्याचा दागिना देवानें मला दिला आहे. तेवढा पुरे. केव्हां होईल संध्याकाळ? अजून सावल्या तिथेंच आहेत. सूर्य का आज आळसावला आहे? जा रे सूर्या झपझप खालीं."

असें ती मनांत म्हणत होती. कल्पनेच्या राज्यांत, प्रेमाच्या राज्यांत गेली होती. इतक्यांत आईनें दळायला हाक मारली. ती गेली. मायलेकी दळीत होत्या. पायली दीड पायली दळण होतें. केव्हां संपणार दळण? "हे हात का धुणीं धुण्यासाठीं, दळणकांडण करण्यासाठींच जन्मले आहेत?" असें ती मुलगी मनांत म्हणत होती.

" कंटाळलीसलीस तर जा उठून. फुरंगटायला काय झालें ? तिन्ही त्रिकाळ खायला मात्र हवं. जा हो. मी एकटी दळीन. " आई म्हणाली.

" पण मी जातें ओढीत का नाहीं ? आई, तूं बोलतेस. भाऊ घरीं आला म्हणजे तो बोलतो. मी तुम्हांला नकोशी का झालें आहें ? कां सारीं मला बोलतां ? " ती स्फुंदत म्हणाली.

" नीट वागलें म्हणजे कोणी बोलणार नाहीं. आतां लहान नाहींस तूं. दोन लेकरांची आई शोभशील. तरी पोरकटपणा जात नाहीं. असल्या खुळ संतानाला कोण करून घेईल बायको ? "

" नाहीं कोणी पत्करलें तर नाहीं. मी अशीच राहीन. "

" म्हणे अशीच राहीन. लाज नाहीं वाटत ? थोबाड फोडायला हवं. "

संपलें एकदाचें दळण. सायंकाळ होत आली. ती मुलगी बाहेर पडली. ती त्या बागेंत गेली. तिनें इकडे तिकडे पाहिलें. तों दूर गुलाबांच्या ताटव्याजवळ तो उभा होता. तो तिचा श्रीमंत प्रियकर तेथें होता. ती तिकडे निघाली. ती लाजत होती, भीत होती. ती उत्सुक होती, अधीर होती. मन धावत होतें परंतु पावलें हळुहळू पडत होतीं.

सैतान दूर होता. माधव तेथें एकटाच होता. ती तेथें गेली. ती खालीं बसली. कोणी बोलेना. क्षणभर एकमेक एकमेकांकडे बघत. पुन्हा सारें शांत.

" मी तुझी वाट बघत होतों. "

" मी घरीं तुमची आठवण करीत होत्यें. "

" तुझ्यावर खरेंच माझें प्रेम आहे. "

" मला नाहीं खरें वाटत. तुम्ही श्रीमंत, मी गरीब. हे पहा माझे हात. ओबडधोबड हात. धुणीं धुऊन, भांडीं घांसून, दळणकांडण करून हे हात ताठरले आहेत. हे हात मऊ नाहींत. घट्टे पडले आहेत माझ्या हातांना. असे हे हात तुम्ही आपल्या हातांत घ्याल ? "

“ हे बघ घेतों. तुझ्या हातांसारखे सुंदर हात जगांत नाहींत. तूं माझी राणी, तूं माझी प्रेमदेवता. ”

“ हें काय तुमच्या हातांत आहे ? ”

“ गुलाबाचें फूल. ”

“ मला द्या तें. ”

“ हें घे ”

तिनें त्या फुलाच्या पाकळ्या पाकळ्या केल्या. नंतर त्या साऱ्या पाकळ्या आपल्या मुठींत धरून तिनें विचारिलें, “ एकी का बेकी ? ”

“ एकी. ” तो म्हणाला.

“ या, आपण ह्या पाकळ्या मोजूं. ” ती म्हणाली.

दोघांनीं पाकळ्या मोजल्या. त्या सम नाहीं निघाल्या. विषम निघाल्या.

“ कोठें आहे एकी ? बेकी तर निघाली ! ” ती खिन्न होऊन म्हणाली.

“ मग त्यांत काय ? ”

“ तुमचें प्रेम नाहीं म्हणून बेकी निघाली. ”

“ कांहींतरीच. तुम्ही बायका वेड्या आहांत. अशानें का प्रेम सिद्ध होतें ? ”

“ मग कशानें ? ”

“ प्रेमासाठीं केलेल्या त्यागानें. ”

“ मी आतां जातें, उशीर होईल. आई रागें भरेल. ”

“ थांब जरा. आलीस नाहीं तों निघालीस. ”

“ पुढें तुमचीच होणार आहें. जरा धीर धरा. जाऊं दे. सोडा हात. माझा ओबडधोबड हात. ”

“ तुझा फुलासारखा हात ”

“ इश्श. कांहींतरीच. रात्र झाली आतां. जाऊं दे मला. ”

ती निघून गेली. माधव तेथेंच होता. सैतान हळूच हसत तेथें आला.

" माझी आठवण तरी झाली का ? प्रेमांत अगदीं दंगच ? " सैतानानें विचारलें.

" तूं दूरच उभा रहात जा. लोकांना तुझी भीति वाटते. "

" आणि तुला ? "

" मी जगांत कोणाला भीत नाहीं. "

* * *

मधूनमधून माधव व ती मुलगी यांच्या भेटी होत. चोरून कोठेंतरी जात, बोलत बसत. प्रेमाच्या गोष्टी होत. आज पुन्हा त्या बागेंत दोघें बोलत होतीं.

" तुमच्याबरोबर तो कोण असतो ? "

" माझा मित्र. "

" त्याची संगत सोडून द्या. त्याला बघतांच हृदयांत चर्र होतें. माझी छाती धडधड करते. चांगला नाहीं तो माणूस. दुष्ट दिसतो, कपटी दिसतो. त्याचें हसणें भेसूर वाटतें. खरेंच सांगतें मी. त्याची संगत सोडा. "

" तुम्ही बायका भित्र्या. काय करणार आहे तो ? "

" मी तुम्हांला एक विचारूं ? "

" एक कां ? दहा प्रश्न विचार. "

" तुम्ही कधीं तरी देवळांत जातां का ? "

" मी कधीं देवळांत जात नाहीं. "

" कां बरें ? तुमचा देवावर विश्वास नाहीं ? "

" देवळांत जातो त्याचाच का फक्त विश्वास असतो ? तूं वेडी आहेस. मी या विश्वमंदिरांत देवाला बघतों. तो सर्वत्र आहे. ज्यानें सूर्य-चंद्र निर्माण केले, तो का फक्त देवळांतच आहे ? तो अणुरेणूंत आहे तो चराचरांत आहे. तो माझ्यांत आहे, तो तुझ्यांत आहे. तुझे व माझे डोळे भेटतात. हृदयाच्या तारा छेडल्या जातात. कोण करतो हें सारें ? हा सारा त्याचाच खेळ, त्याचीच लीला. तो परमेश्वर ओतप्रोत भरलेला

आहे. तें चैतन्य सर्वत्र विलसत आहे. त्याला राम म्हणा, रहीम म्हणा; अल्ला म्हणा, ब्रह्म म्हणा; प्रभु म्हणा; परमेश्वर म्हणा; नांव कोणतेंहि द्या. मुख्य गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे झालें."

"किती सुंदर बोलतां तुम्ही? परंतु मला आपलें वाटतें कीं देवळांत जावें. आणि तुम्ही देवाधर्मासमक्ष लग्न कधीं लावणार? आपण असेंच किती दिवस राह्यचें? तें बरें नाहीं दिसत. लोक नांवें ठेवतील. आपण लवकर लग्न लावूं असें कितीदा म्हणालेत. परंतु तुम्ही मनावर कां बरें घेत नाहीं? तो दुष्ट मनुष्य मोडता घालीत असेल. होय ना? खरेंच आपण लवकर लग्न लावूं या. म्हणजे सारें बरें होईल. होय म्हणा."

"वेडी आहेस तूं. तो पहा सूर्य अस्तास जात आहे. आकाशांत अग्नि पेटला आहे. त्या अग्नीसमोर आपण लग्न लावूं. ये. हा पहा वारा गुणगुण करतो आहे. तो वारा जणुं विवाहमंत्र म्हणत आहे. हीं पहा फुलें वरून पडत आहेत. या जणुं अक्षता. त्या लहानशा मांडवांतल्या लग्नापेक्षां विश्वाच्या विशाल मंडपांत हें लग्न अधिक पवित्र नाहीं का?"

"मला कांहीं समजत नाहीं. मी वेडी आहें. तुमचें म्हणणें गोड वाटतें, खरें वाटतें. परंतु खात्री होत नाहीं."

"जुन्या कल्पना आपल्या मानगुटीस बसलेल्या असतात. खरेंच, इतके दिवस आपण भेटत आहोंत. परंतु तुझें नांव मला माहीत नाहीं. काय तुझें नांव?"

"काय करायचें नांवाशीं?"

"नामरूप शेवटीं मिथ्या आहे. परंतु व्यवहारासाठीं त्याची जरूरी आहे. सांग, तुझें नांव सांग."

"आधीं तुमचें सांगा."

"हट्टी आहेस तूं."

"स्वभावच आहे तो आमचा. सांगा ना नांव."

"माझें नांव माधव."

" सुंदर नांव. "

" तुझें सांग. "

" मधुरी. "

" खरोखर तूं मधुर आहेस. त्रिभुवनांतील सारी गोडी तुझ्यांत ओतली गेली आहे. मधुरी, मधुरी. गोड नांव. "

" जातें आतां मी. "

" रोज जातें जातें म्हणतेस. "

" मग काय करूं ? लग्न लावा म्हणजे असें म्हणावें लागणार नाहीं. "

" मधुरी ! "

" काय ? "

" आज रात्रीं येशील ? मग घरीं परत जा. हळूच दार उघडून ये. दार उघडें राहील. येशील ? "

" भाऊ कामावरून दमून येतो. तो एकदा पडला म्हणजे मेल्यासारखा पडतो. परंतु आई म्हातारी व दमेकरीण. तिला सारखा खोकला येतो. तिला नीज लागत नाहीं. जरा दार वाजलें तरी तिला जाग येते. कसें यायचें ? "

" तुझ्या आईसाठीं मी औषध देईन. "

" त्यानें खोकला थांबेल ? झोंप लागेल ? "

" अगदीं गाढ झोंप. "

" द्या तर तें औषध. "

" उद्यां सायंकाळीं देईन. "

" जातें हं मी. उद्यां रात्रीं हं. "

मधुरी निघून गेली. सैतान विकट हास्य करीत पुढें आला.

" असा चावटपणा करशील तर बघ. हसायला काय झालें ? प्रेम का उपहासाची वस्तु ? " माधवनें रागानें विचारिलें.

" प्रेम म्हणजे विलास, प्रेम म्हणजे क्षणिक भोग. " सैतान म्हणाला

★

प्रकरण सातवें

# दुःखी मधुरी

" आईला देऊं हें औषध ? " मधुरीनें विचारिलें.

" दे. पेलाभर पाण्यांत या बाटलींतील चमचा दोन चमचे औषध घाल. गाढ झोंप लागेल. खोकला उसळणार नाहीं. तूं येशील ना रात्रीं ? "

" हो. "

मधुरी औषधाची बाटली घेऊन गेली.

" आज रात्रीं गंमत आहे एकूण ! " सैतान म्हणाला.

" चूप. खबरदार कांहीं बोलशील असें तर. " माधव चिडून बोलला.

*   *   *

रात्र झाली. मधुरीचा भाऊ घोरत होता. तिची आई खोकत होती.

" आई, तुझ्यासाठीं आज औषध आणलें आहे. विसरलें मी सांगायला, विसरलें मी द्यायला. घेतेस का ? " मधुरीनें विचारिलें.

" कोणी दिलें बाळ औषध ? "

" एका उदार माणसानें. त्या औषधानें दमा जातो, खोकला थांबतो. गाढ झोंप लागते. "

" आतां कायमचीच झोंप लागूं दे. परंतु तुझें एकदा लग्न झालें असतें म्हणजे बरें. परंतु नसेल माझ्या नशिबीं तुमचा संसार पाहण्याचें. आण औषध. घेऊं दे घोट. वाटलें बरें तर ठीक. जरा डोळा तरी लागेल. "

मधुरीनें फुलपात्र घेतलें. त्यांत तिनें दोन चमचे औषध घातलें. मग त्यांत पाणी घालून, चमच्यानें ढवळून तिनें आईच्या हातीं दिलें. आई औषध प्यायली.

" पड आतां. झोंप लागेल. " मधुरी म्हणाली.

" तूंहि पड. दिवसभर तुला काम करावें लागतें. धुणीं धुवावीं लागतात. दळण दळावें लागतें. नीज हो मधु, ये." आई प्रेमानें म्हणाली.

आईला झोंप केव्हां लागते याची वाट पहात मधुरी अंथरुणावर पडली. थोड्या वेळानें आई खरोखर घोरूं लागली. भाऊहि घोरत होता. मधुरी हळूच उठली. तिनें दाराची कडी अलगत काढली. ती बाहेर पडली. आपल्या प्रियकराला भेटायला गेली.

* * *

अद्याप कोंबडा आरवला नव्हता. कोण येत आहे तें काळोखांतून ? मधुरी. ती मधुरी आहे. ती हळूच घरांत शिरली. तिनें कडी लाविली. डोक्यावरून पांघरूण घेऊन ती निजली, परंतु तिला झोंप आली का ?

भोंगा झाला. भाऊ उठला. आई घोरत होती. आईला आज झोंप लागली आहे हें पाहून भावाला बरें वाटलें. त्यानें प्रातर्विधि केले. स्नान करून तो कामाला गेला. आतां चांगलेंच उजाडलें. घरांत उन्हें आलीं. मधुरीलाहि झोंप लागली होती. परंतु ती जागी झाली. ती उठली. आई अद्याप अंथरुणांतच होती. परंतु आतां घोरणें बंद होतें. मधुरीनें तोंडबिंड धुतलें. ती आईजवळ गेली, आईचा हात तिनें हातांत घेतला. तों तो थंडगार लागला. मधुरी घाबरली. आई, आई, तिनें हांका मारल्या. आईला शुद्ध ना बुद्ध. सारी हालचाल थांबली होती. आई का मेली ? तो विचार मधुरीच्या मनांत आला. ती दचकली. तिनें किंकाळी फोडली. शेजारचे लोक आले.

" मेली म्हातारी. मिटला खोकला. " ते म्हणाले.

" आतां आम्हांला झोंप येत जाईल. म्हातारीचा खोकला साऱ्या आळीला झोंपूं देत नसे. देवाला दया आली. " एक दुष्ट म्हणाला.

" मधुरीची आतां मजा आहे. " कोणी तरी हसून बोललें.

* * *

मधुरीच्या आईची सारी क्रिया झाली. भाऊ व बहीण दोघें राहिलीं. एके दिवशीं मधुरीचा भाऊ कामावरून येत होता. इतर कामगारांजवळ त्याचा वाद चालला होता.

" अरे जा माहीत आहे. घरोघर मातीच्याच चुली. "

" घरोघर असतील. परंतु माझें घर अपवाद आहे. माझी बहीण तशी नाहीं. ती धुतल्या तांदळासारखी आहे. "

" तूं घरीं नसतोस तिचे थेर पाहायला. तूं कामावर असतोस व ती प्रियकराला मिठ्या मारीत असते. घरीं आतां आईचीहि अडचण नाहीं. "

" तोंड सांभाळून बोल. माझ्या बहिणीची अब्रू. तिचे का धिंडवडे मांडले आहेस ? "

" तुझ्या बहिणीची मात्र अब्रू. इतर मायबहिणींवर टीका करतोस तेव्हां रे ? तेव्हां कसें तोंड चुरुचुरु चालतें तुझें ? "

असे भांडत ते जात होते. इतक्यांत सैतान व माधव तिकडून आले. बाहेर काळोख पडत होता. मधुरीचें घर जवळ होतें. सैतान माधवाला म्हणाला,

" हाच तिचा भाऊ. मार सोटा. काढ कांटा. हाण. "

" मला नाहीं धैर्य. " माधव म्हणाला.

" भितुरडा. " असें म्हणून सैतानानें मधुरीच्या भावाच्या डोक्यांत सोटा हाणला.

" अरे, हा बघ तुझ्या बहिणीचा जार. " बरोबरचा कामगार म्हणाला.

परंतु भाऊ खालीं पडला होता. सैतान व माधव अंधारांतून पसार झाले, भावाची किंकाळी मधुरीनें घरांत ऐकली. ती दिवा घेऊन आली. तों भाऊ रस्त्यांत पडलेला. डोक्यांतून भळभळ रक्त वहात होतें. ती भावाचें डोकें मांडीवर घेऊन बसली.

" येथें रस्त्यांत कोठें बसतेस ? त्याला घरीं नेऊं. " शेजारी म्हणाले.

भावाला उचलून घरीं नेण्यांत आलें. मधुरी वारा घालीत होती. डोक्याला तिनें फडकें बांधलें. " भाऊ, भाऊ " ती हांका मारीत होती. तिला रडूं आलें. बराच वेळ झाला. भावानें डोळे उघडले. जवळ बहीण होती.

" तूं दूर हो. माझ्या अंगाला हात लावूं नकोस. तूं पापी आहेस, दुष्ट आहेस. तूं व्यभिचारिणी आहेस. वेश्या आहेस. हो दूर. मरतांना तरी पापी माणसाचें दर्शन नको. तुझ्या माकडचेष्टांसाठीं आईला विष देऊन मारलेंस. तूं तुझ्या भावाच्या डोक्यांत आज सोटा मारवलास. तूं डाकीण आहेस. हो दूर. नको लावूं हात. " भाऊ त्वेषानें म्हणाला.

" भाऊ, नको रे असें बोलूं. मी नाहीं हो अपराधी, मी का वेश्या ? मी फक्त एकाला प्रेम दिलें. बघ हें हृदय फाडून. बहिणीला वाटेल तें कसें रे बोलतोस ? नाहीं आमचें अद्याप लग्न झालें. परंतु ते लावणार आहेत. त्यांचें प्रेम आहे माझ्यावर. माझें त्यांच्यावर. निर्मळ प्रेम म्हणजे का व्यभिचार ? म्हणजे का वेश्याव्यवसाय ? भाऊ, कसें रे बोलतोस असें ? कां अशी आग पाखडतोस ? कोण आहे मला ? "

"तूं दूर हो सांगितलें ना ? माझ्याजवळ प्रेमाचें वर्णन करतेस, लाज नाहीं वाटत ? लग्न म्हणे लागेल. लागल्यावर मारायच्या होत्यास मिठ्या. परंतु आधींच ? पापिणी, चांडाळणी, दूर हो. हात नको लावूं मला. धर्मबुडवी. कुळाला काळिमा लावलास. घराची अब्रू दवडलीस. मला गिरणींत मान वर करूं देत नाहींत. परंतु तुझी बाजू घेऊन मी भांडत असें. माझी बहीण निर्मळ असें म्हणत असें. परंतु तूं तर नरकांत बुड्या मारीत आहेस, उड्या मारीत आहेस. नाच आतां पोटभर त्या नरकांत. आईची अडगळ गेली. भावाची अडचणहि दूर झाली. दाही दिशा तुला मोकळ्या. दूर हो. हो दूर. "

" भाऊ, असेन मी पापी. असेन मी कुलटा. पाप्यावर प्रेम करील तोच खरा. चांगल्यावर सारेच प्रेम करतील. खरें प्रेम तें, जें पाप्यावरही

दया करील. भाऊ, सारें जग मला दूर लोटील. परंतु तूं नाहीं लोटतां कामा. तूं माझे अपराध पोटांत घातले पाहिजेस. तुझें प्रेम असें मोठें नाहीं ? तें प्रेम का संकुचित, क्षुद्र आहे ? बहिणीचीं सारीं पापें विसरून जाण्याइतकें तुझें प्रेम सहनशील नाहीं ? भाऊ, तें मोठें प्रेम मला दे. मला कोणी नाहीं."

"तुझा प्रियकर आहे. काय करायचा भाऊ, काय करायची आई ? मी आतां थोडाच वांचणार आहे. शक्ति संपत आली. झांपड आली डोळ्यावर. एकच तुझ्याजवळ मागणें. मरतांना मला हात नको लावूं. तुझा स्पर्श नको. कुळाला काडी लावणारी तूं. हो माझ्या डोळ्यांआड, हो दूर."

मधुरी दूर झाली. ती बाजूला रडत बसली. परंतु तिला आतां रडूंहि येईना. ती केवळ शून्य दृष्टीनें बघत होती. शेवटीं भावानें प्राण सोडले. मधुरी जगांत एकटी राहिली.

* * *

कांहीं दिवस मधुरी घरांतून बाहेर पडली नाहीं. विहिरीवरून पाणी आणण्यासाठीं हळूच एकटी जाई. जगाचें दर्शन नको असें तिला वाटे. घरांतच ती रडत बसे. परंतु एके दिवशीं ती विहिरीवर गेली तों तेथें बायका बोलत होत्या.

"ऐकलंत का ? ती चिमणी म्हणे पळून गेली."

"खरंच का ?"

"हो. साऱ्या गांवांत बभ्रा झाला आहे."

"का ग मधुरी, तुला आहे ना ती चिमणी माहीत ?"

"हो. आहे. ती का गेली ?"

"हो. आईबाप घरांत आहेत. त्यांच्या नांवाला काळीमा. अलीकडच्या मुली फारच हो अगोचर वागूं लागल्या एकूण."

" जें जें ऐकावें तें तें थोडेंच. "

त्या बायका गेल्या. मधुरी घागर घेऊन तेथेंच उभी होती. घागर भरलेली होती. डोळ्यांच्या घागरीहि भरून आल्या. चिमणीवर होणाऱ्या टीकेंत तिनेंहि भाग घेतला. परंतु तिला काय अधिकार ? ती चिमणी-सारखीच नव्हती का ? ती चिमणी तर ही मैना. काय होता फरक ? मधुरीचें मन तिला खात होतें. शेवटीं घागर घेऊन ती घरीं आली. दारें लावून ती रडत बसली.

मधुरीची आई गेली, भाऊ गेला. परंतु प्रियकर होता. परंतु तो बरेच दिवसांत डोकावला नाहीं. तोहि का सोडून गेला ? त्यानें का फसविलें ? प्रेम म्हणजे क्षणभर शरीराची करमणूक असें का त्याला वाटलें ? नाहीं, तो असें करणार नाहीं. येईल, तो येईल. कसा दिसे, कसा हसे. कसें त्याचें चालणें, कसें बोलणें. येईल माझा राजा, येईल माझ्या प्राणांचा प्राण.

अशा आशेनें मधुरी जगत होती. ती चरका चालवी. तोंडानें गाणें म्हणे. प्रियकराच्या वर्णनाचें गाणें. प्रियकराच्या प्रेमाचें गाणें. चरका गुं गूं करी. तिच्या गाण्याला साथ देई. " येईल. गुं गूं. येईल. प्रियकर येईल. गुं गूं. " असें जणुं तो चरखाहि बोले.

दिवसापाठीमागून दिवस चालले. मधुरी वाट पहात होती. दिवसा ती दारें लावी. रात्र झाली, मध्यरात्र झाली कीं उघडी टाकी. तो दिवसा यायला लाजत असेल. रात्रीं येईल. दारें उघडीं असूं देत. परंतु तो आला नाहीं. कोठें गेला तो ? तो का फसवील ? मला सोडून जाईल ? नाहीं. तो असें करणार नाहीं. तो माझ्याजवळ लग्न लावील. माझी अब्रू सांभाळील. मला प्रेम देईल. येईल. तो खात्रीनें येईल. दुःखीकष्टी मधुरी. किती फिक्कट दिसते, अशक्त दिसते. परंतु आशेनें आहे.

★

प्रकरण आठवें

# ती काळरात्र

सैतान व माधव हवेंतून दौडत येत होते. त्यांनीं आपली गति जरा मंदाविली. "ठक ठक" आवाज कानांवर आला. कोठून येत होता तो आवाज? ठक ठक. कोण काय ठोकीत होतें? कोण काय दुरुस्त करीत होतें? इतक्यांत माधवला दोनचार माणसें दिसलीं. तीं माणसें कांहीं तरी उभारीत होतीं.

"काय रे, काय चाललें आहे तेथें?" माधवनें विचारिलें.

"तुला काय करायचें आहे?" सैतान म्हणाला.

"ठकठक आवाज येतो आहे. कशाची तयारी? काय उभारताहेत?"

"अरे एका अभागी जीवाला उद्यां सकाळीं येथें फासावर द्यायचें आहे. त्यासाठीं ही तयारी. त्यासाठीं तो वधस्तंभ."

"कोण आहे असा अभागी जीव?"

"तुला काय करायचें आहे?"

"सांग त्याचें नांव. काय त्यानें केलें?"

"नांव सांगितलें तर तुला वाईट वाटेल."

"कां बरें? माझ्या ओळखीचा आहे तो जीव?"

"नुसत्या ओळखीचा नाहीं तर प्रेमाचा."

"प्रेमाचा? कोणावर केलें मी प्रेम? जगांत अशी कोणती वस्तु आहे, कोणती व्यक्ति आहे, कीं जेथें माझें आंतडें गुंतलें आहे? हा माधव अनासक्त आहे."

"वाहवा रे अनासक्ति!"

"सांगतोस कीं नाहीं नांव?"

“ सांगू ? ”

“ सांग.”

“ अरे तिला फाशीची शिक्षा झाली आहे.”

“ तिला म्हणजे कोणाला ? ”

“ तुम्ही माणसें फार विसराळू. अरे ती.”

“ ती म्हणजे कोण ? ”

“ जिच्याशीं तूं माकडचेष्टा केल्यास, प्रेम प्रेम करून जिला बिलगलास, मिठ्या मारल्यास....”

“ कोण मधुरी ? ”

“ हो. ”

“ तिला फाशीची शिक्षा ? ”

“ हो.”

“ कां बरें ? ”

“ तिच्यावर तीन आरोप आहेत.”

“ कोणते बा ? ”

“ आईला विष घालून मारल्याचा; प्रियकराकडून भावाला मारवल्याचा; आणि स्वतःचें मूल गुप्तपणें नदींत सोडून दिल्याचा.”

“ अरेरे ! कांहीं करतां नाहीं येणार ? ”

“ उपाय नाहीं.”

“ मधुरीला वांचवलेंच पाहिजे.”

“ ती तुरुंगांत आहे. दारें बंद आहेत. सर्वत्र पहारे आहेत.”

“ मला सबबी सांगूं नकोस. मधुरी वांचलीच पाहिजे. मृत्यूच्या दाढेंतून तिला ओढून काढलें पाहिजे. उपाय सांग, मार्ग दाखव. ”

" तुझी इच्छा पूर्ण करण्याचें मीं वचन दिलें आहे. जा. त्या तुरुंगांत जा. सारीं कुलपें गळून पडतील. पहारेकरी घोरत पडतील. तूं आंत जा. तिला आण सोडवून. पहांटेचा कोंबडा आरवण्यापूर्वी बाहेर या. कोंबडा आरवेपर्यंत माझी सत्ता. मग नाहीं. कोंबडा आरवल्यावरहि जर आंत राहिलास तर तूंहि पकडला जाशील. ध्यानांत धर. जा. लौकरच रात्र पडेल. "

बाहेर रात्र झाली. माधव तुरुंगाच्या त्या भीषण दरवाजाजवळ आला. दरवाजा आपोआप उघडला. पहारेकरी झोंपीं गेले. माधव आंत शिरला. मधुरीचा शोध करीत निघाला. फाशी जाणारे कैदी कोठें ठेवतात ? तो पाट्या वाचीत निघाला. तों " फाशी-कोठा " अशी पाटी दिसली. तो आंत आला. तों त्याला मधुरी दिसली.

दुःखी, कष्टी, निराश मधुरी. तिचें तें मधुर हास्य कोठें आहे ? आज तोंडावर प्रेतकळा आहे. ती पेंढ्यावर पडली होती. मध्येंच उठे, मध्येंच निजे. तिचे केस पाठीवर मोकळे सुटले होते. तेथें एक दिवा मिणमिण करीत होता. पाण्याचें मडकें होतें.

माधवला तें दृश्य बघवेना. परंतु तो जवळ गेला. दार मोकळें झालें. " मधुरी, चल. तुला न्यायला मी आलों आहें. चल. ऊठ मधुरी ! " असें तो भराभर बोलूं लागला. मधुरीनें त्याच्याकडे दीनवाण्या दृष्टीनें पाहिलें. ती भ्रमांत होती. जणुं वातांत होती.

" आतां न्यायला आलेत ? आतां रात्रीं देणार फाशीं ? सकाळीं ना फाशी देणार आहांत ? मग लौकरसे आलेत ? आणखी चार घटका जगूं दे. आतां नका रे नेऊं. मांगानो, दया करा. मरणार, उद्यां मी मरणार. इतक्या तरुणपणीं मरणार. हें तारुण्य मातींत जाणार. हें सौंदर्य फुकट जाणार. या सौंदर्यानें तर सारा घात केला. हें सौंदर्य नसतें तर कोणी माझ्याकडे ढुंकूनहि पाहिलें नसतें. मग या गोष्टी कां झाल्या असत्या ? कशाला मिळालें हें सौंदर्य ? फाशीं देणारें सौंदर्य. पाप. मला वाटत

होतें कीं हें पाप आहे. तरी मीं तें केलें. किती सुंदर रूप धारण करून पाप समोर उभें राहातें! हें पाप आहे असें माहीत असूनहि आपण त्याच्या मोहांत पडतों. मोहक सुंदर पाप. साप थंडगार वाटला तरी सापच तो. पाप सुंदर दिसलें तरी मानेला शेवटीं फास लावतें. परंतु सकाळीं लावा रे फास. आतां रात्रीं देणार फाशीं? अशा थंडींत? नका रे. जा माघारे. सकाळीं या. सूर्याचे किरण पडतील. थोडी ऊब मिळेल. मरतां मरतां ऊब."

मधुरी असें बडबडत होती. माधव अधीर होता.

"अग मधुरी, मला ओळखलें नाहींस का? मी माधव. तुझा मी. मी मांग नव्हे. तुझा प्रियकर माधव तो मीं. चल. लौकर ऊठ. तुला न्यायला मी आलों आहें. ऊठ. धर माझा हात."

"तुम्ही मांग नाहीं?"

"नाहीं नाहीं."

"मग कोण?"

"मी तुझा प्रियकर."

"प्रियकर?"

"हो. हो."

"पाहूं दे तुमचा हात?"

तिनें त्याचा हात आपल्या हातांत घेतला. तिनें क्षणभर डोळे मिटले.

"छे. प्रियकराचा हात असा नसतो. हा हात थंडगार आहे. यांत ऊब नाहीं, कांहीं नाहीं. गार गार हात, मेलेला हात. का मारणारा हात? बघूं? होय. हें पहा रक्त तुमच्या हातावर आहे. माझ्या आईच्या प्राणांचें, भावाच्या प्राणांचें आणि त्या चिमकुल्याच्या प्राणांचें, सर्वांचें रक्त तुमच्या हातावर. भयाण भेसुर हात. दुष्ट दुष्ट हात. हा का प्रियकराचा हात? नाहीं नाहीं."

"मधुरी!"

"काय?"

"तूं अशी भ्रमिष्टासारखी काय करतेस? वेळ नाहीं. ऊठ. माझ्याबरोबर चल. मी माधव. तूं ओळखीत नाहींस? ज्याची वाट बघत असस तो मी."

"माधव?"

"होय. ऊठ, मधुरी ऊठ. असें काय करतेस?"

"हं. ओळखलें. काल आलेत वाटतं? सर्वनाश झाल्यावर दर्शन दिलेंत."

"अजून सर्वनाश झाला नाहीं. मी आलों आहें तुला वांचवायला. ऊठ. नीघ."

"बोलण्याची आतां इच्छा नाहीं. सारा खेळ खलास. आतां कशांत राम नाहीं. परंतु आलेत, एका अर्थी बरें झालें. मी आतां सांगतें तें नीट ऐका. त्याप्रमाणें करा. नाहीं म्हणूं नका. हें बघा, उद्यां मला फांशीं देतील. मी मरेन. माझें प्रेत तुम्ही मागा आणि मला अग्नि द्या. कोठें बरें द्याल? आईला दिलेला आहे तिथेंच द्या. आईच्या अगदीं जंवळ नको. कारण मी पापी आहें. परंतु आईचा आधार असूं दे. भाऊलाहि तिथेंच दिलेला आहे. आईच्या कडेला मला अग्नि द्या. आणखी एक सांगतें. गांवाबाहेर ती नदी आहे ना? तिच्या तीरातीरानें बघत जा. कोठें तरी लव्हाळ्यांत सांपडेल. माझें बाळ सांपडेल. जन्मतांच तें मीं सोडून दिलें. नदीच्या स्वाधीन केलें. कोठें तरी सांपडेल. सांपडेल त्याचा सांगाडा. त्याला आणा. आणि माझ्या स्तनांवर त्याला ठेवा. त्याला एकदासुद्धा नाहीं हो पाजलें. स्तन भरून येत. परंतु बाळ कोठें होता? आणा हो त्याला शोधून आणि माझ्या जवळ ठेवून, माझ्या स्तनांशीं त्याला ठेवून, दोघांनाहि एकदमच अग्नि द्या. हें काय, रडायला लागलेत

वाटतें ? कर्म करतांना हसावें, मग रडावें. परंतु डोळे पुसा. ऐका नीट. कर्तव्य कठोर असतें. तें केलेंच पाहिजे. कराल ना ?"

"मधुरी, असें कां तूं म्हणतेस ? तूं मरणार नाहींस. तूं वांचशील. आपण दोघें एकत्र राहूं. सुखांत नांदूं. चल ऊठ. धर हात. वेळ नाहीं. नीघ."

"नका अशी ओढूं. मला मरूं दे. कशाला आतां जगायचें ? आणि समजा तुमच्याबरोबर आल्यें तर पुन्हा पकडतील. पुन्हा तीच शोभा. खरें ना ?"

"परंतु आपण लांब लांब जाऊं. दुसऱ्या देशांत जाऊं. तेथें कोण येईल धरायला, कोण येईल पकडायला ? ऊठ."

"दुसऱ्या देशांत या देशांतील पोलीस येणार नाहींत. त्यांचा ससेमिरा चुकेल. पण—"

"पण काय ? ऊठ."

"पण माझ्या हृदयांतील सदसद्विवेकबुद्धीचा पोलीस कसा दूर होणार ? कोठें पाताळांत गेल्यें तरी हे मनांतील विंचू दंश करीत राहणारच. नको. आतां जगणें नको. आतां मरणेंच श्रेयस्कर. पश्चात्ताप झाला आहे. मरणानें मी मुक्त होईन. प्रभु मला जवळ घेईल. मी तुमची तेथें वाट बघत बसेन. माझ्या पश्चात्तापानें तुम्हीही पवित्र होऊन याल. तेथें भेटूं."

"मधुरी, ऊठ." तो तिची बकोटी धरून म्हणाला.

"नको, खरेंच नको." ती म्हणाली.

बाहेरून सैतान हांका मारूं लागला. "लौकर या बाहेर. वेळ संपत आली. कोंबडा आरवेल. आटपा झटपट."

"चल, मधुरी ऊठ. वेळ नाहीं. ऊठ."

"नको. खरेंच नको."

"लौकर या. वेळ भरत आली. चलो झटपट. नाहींतर अडकाल."

" मधुरी ! "

" जा तुम्ही. मी वर वाट बघेन. "

" चलो. वेळ झाली. चलो."

" मधुरी ! "

" स्वर्गांत आतां मधुरी भेटेल. तेथें सारें गोड होईल. "

" चलो. कोंबडा आरवणार. एक क्षण. चलो."

" नाहीं येत तर नाहीं. मर जा." जसें म्हणून माधव झटपट बाहेर निघून गेला. पहारेकरी जागे झाले. चाराचे ठोके पडले. 'आलबेल. बराबर है' अशा गर्जना झाल्या.

" काय माधव ? "

" चल, कोठें तरी लांब ने."

सैतान हसला. माधव कांहीं बोलला नाहीं.

★

प्रकरण नववें

# राजाच्या दरबारांत

**सैतानानें** माधवाला एका दूरच्या देशांत नेलें. त्या देशाच्या राजधानींतून ते हिंडत होते. त्यांच्या मूर्ति सर्वांच्या डोळ्यांत भरतील अशा होत्या. जो तो त्या दुकलीकडे बघे. जशी भीमार्जुनांची जोडी. परंतु सरकारी अधिकाऱ्यांना त्यांचा संशय आला. पोलिसांनीं त्यांना पकडून नेलें.

राजासमोर त्या दोघांना उभें करण्यांत आलें.

"आपण कुठले?" राजानें प्रश्न केला.

"अमक्या ठिकाणचे असे आम्ही नाहीं." माधवानें उत्तर दिलें.

"तुम्ही काय करतां?"

"सारें कांहीं करतों."

"अशक्य गोष्टी शक्य कराल?"

"हो."

थोडा वेळ विचार करून राजा म्हणाला, "सध्या आम्हांला फार अडचण आहे. देशांतील चांदी सोनें सारें देशांतरीं गेलें. तिजोरी रिकामी आहे. काय करायचें अशा वेळीं? सांगा उपाय."

"सोपा उपाय." सैतान हसून म्हणाला.

"सांगा." राजा म्हणाला.

"कागदी नाणें सुरू करावें. कागदाचे तुकडे घ्यावे. त्याच्यावर शिक्का मारावा. या तुकड्याची किंमत पांच रुपये, या तुकड्याची पांचशें, असें करावें." सैतानानें सांगितलें.

"खरेंच. आमच्या डोक्यांतच आलें नाहीं. फुकट आहेत आमचे प्रधान. तुम्ही आम्हांला नेहमीं सल्ला देत जा. तुम्हांला बंगला राहायला

देतों. नोकर चाकर सेवेला देतों. जाऊं नका आम्हांला सोडून." राजा म्हणाला.

सैतान व माधव मोठ्या बंगल्यांत राहूं लागले. त्यांचा थाटमाट काय विचारतां? सारे त्यांना भीत. सारे त्यांना सलाम करीत. ते दोघे रस्त्यांतून ऐटीनें फिरत जात.

एके दिवशीं माधव राजाजवळ बसला होता. राजा म्हणाला, "माझ्या मनांत एक विचित्र इच्छा उत्पन्न झाली आहे. ती तुम्ही पुरी कराल?"

"हो." माधव म्हणाला.

"इच्छा अशी आहे कीं प्राचीन काळापासून तों आतांपर्यंत जितक्या सुस्वरूप अशा स्त्रिया या पृथ्वीवर झाल्या, त्यांचें दर्शन मला व्हावें. माझ्या डोळ्यांसमोरून त्या सर्व जाव्यात."

"ठीक. तुमची इच्छा पूर्ण करीन."

"किती दिवसांनीं?"

"चार दिवस थांबा."

"तोंपर्यंत मी प्रचंड मंडप घालायला लावतों. त्या समारंभास सारे येऊं देत. क्षणभर मौज."

माधव गेला. त्यानें सैतानाला ती गोष्ट सांगितली.

"कसें काय हें करणार?" सैतानानें विचारलें.

"तें मला माहीत कीं तुला? मी राजाला कबूल केलें आहे. तूं सारें शक्य केलें पाहिजे." माधव बेफिकीरपणें म्हणाला.

"वाटेल तें तूं कबूल करावेंस व माझ्यावर जबाबदारी टाकावीस. तुम्ही माणसें म्हणजे विचित्र प्राणी."

"तें कांहीं असो. कराराप्रमाणें वाग म्हणजे झालें. जास्त बोलण्याची जरूर नाहीं."

"तुला थोडें धाडस केलें पाहिजे."

"करीन."

" उद्यां मध्यरात्रीं येथून चार कोसांवर असलेल्या जंगलांत जा. तेथें पिशाच्चांची वस्ती आहे. तीं एकदम तुझ्या अंगावर धावतील. परंतु घाबरूं नकोस. ' सैतानाची शपथ ' असें म्हण. म्हणजे तीं गोगलगायीं-प्रमाणें होतील. तीं हात जोडून उभीं राहतील. त्यांना राजाची इच्छा सांग. इच्छा पुरी करण्याचें साधन द्या, असें म्हण. जें देतील तें घेऊन ये. "

दुसऱ्या दिवशीं मध्यरात्रीं माधव उठला. बाहेर कोल्हे ओरडत होते. अंधार होता. थंडी मी म्हणत होती. परंतु निर्भय माधव जात होता. त्या जंगलाजवळ तो आला. एकदम किंकाळ्या त्याच्या कानीं आल्या. तो चपापला. परंतु पुन्हा पुढें चालला. पिशाच्चें त्याच्या अंगावर धावलीं. ' सैतानाची शपथ ' असें तो म्हणाला. पिशाच्चें शांत झालीं.

" काय पाहिजे ? " त्यांनीं अदबीनें विचारिलें.

" राजाला प्राचीन काळापासूनच्या सर्व सुंदर स्त्रिया बघण्याची इच्छा आहे. ती इच्छा पुरी करण्याचें मीं कबूल केलें आहे. ती इच्छा पुरी करण्याचें साधन द्या. " माधवानें सांगितलें.


" ही घ्या जादूची कांडी. ' चल चल चल चल; चल चल चल चल; चलचाल चलचाल.' असें कांडी फिरवीत म्हणा. प्राचीन काळापासूनच्या सर्व सुंदर स्त्रिया एकामागून एक पडद्यावर दिसतील व नष्ट होतील. परंतु एक धोक्याची सूचना लक्षांत ठेवा. "

" कोणती ? "

" त्या स्त्रियांचीं चित्रें पडद्यावर पाहतांना तुम्हांला मोह नाहीं पडतां कामा. नाहीं तर एखाद्या सुंदर स्त्रीचें लावण्य बघाल व तुम्ही लाळ घोटूं लागाल. ' किती सुंदर, खरेंच, किती सुंदर ' वगैरे शब्द तुमच्या तोंडांतून बाहेर पडतां कामा नयेत. केवळ अलिप्त व अनासक्त रीतीनें सारें काम करा. समजलें ना ? "

" हो समजलें. जातों मी. "

" सैतानास प्रणाम सांगा. "



'काय सुंदर, ओहो ! किती खुबसुरत !'

" बरें."

माधव आला. त्यानें राजाला तयार असल्याचें कळविलें. दिवस ठरला. त्या दिवशीं रात्रीं हा प्रयोग व्हावयाचा होता. सारा मंडप भरला. उच्चासनावर राजा बसला होता. सरदार दरकदार, इनामदार, जहागीरदार बसले होते. सामान्य जनताहि बसली होती. एकीकडे स्त्रिया होत्या. सर्वांचे डोळे अधीर झाले. समोर रुपेरी पडदा होता. माधव बाजूला येऊन उभा राहिला. टाळ्यांचा कडकडाट झाला. सारें शांत झालें.

माधव कांडी फिरवूं लागला. पडद्यावर लावण्यमयी मूर्ति दिसूं लागल्या. प्रत्येकीचें नांवहि लिहिलें जाई. सीता, सावित्री, द्रौपदी, दमयंती, रुक्मिणी, मंदोदरी पडद्यावर आल्या व गेल्या. संयुक्ता व पद्मिनी चमकल्या. नूरजहान व मुम्ताजमहल दिसल्या. हेलेन दिसली. सर्व देशांतील सौंदर्य-रमणी येत होत्या व जात होत्या.

परंतु एक चित्र आलें. अति मोहक असें तें सौंदर्य होतें. माधवच्या हातांतील कांडी थांबली. तो त्या चित्राकडे पाहूं लागला. ' काय सुंदर ओहो ! किती खुबसुरत !' असे शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडले. तोंच कडाडकड्डाड असा आवाज झाला. जणुं शेंकडों बॉंब गोळेच पडले. राजा नि प्रजा, कोठें गेले सारे ? कोठें गेला तो देखावा ? कोठें गेली ती राजधानी ? कोठें गेला माधव ? कोठें आहे सैतान ? त्यांचे का तुकडे झाले ? त्यांच्या का ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या ? भयंकर आवाज !

★

प्रकरण दहावें

# पुन्हा घरीं

**माधवच्या** घरीं म्हातारा भय्या होता. तो आपल्या धन्याची रोज वाट बघत असे. तो दिवाणखाना झाडून ठेवी, अंगण झाडून ठेवी. रोजच्याप्रमाणें भय्या उठला व अंगण झाडायला गेला. तों अंगणांत कोण निजलें होतें ? तो तर धनी. माधव तेथें पडला होता. त्याला झोप लागली होती. भय्याला वाईट वाटलें. धनीसाहेब का रात्रीं आले ? त्यांनीं हांका मारल्या असतील ? मला जाग नाहीं आली. अशी कशी झोप लागली मला. खालीं जमिनीवर निजले. पांघरायला नाहीं, आंथरायला नाहीं. अरेरे. त्या भय्याला फार वाईट वाटलें. त्यानें धन्याला हलके हलके हांका मारल्या. माधवनें डोळे उघडले.

" धनीसाहेब !"

" कोठें आहें मी ? "

" आपल्या घरीं. तुम्ही रात्रीं आलेत वाटतें ? मला हांका नाहीं मारल्यात ? उठा. गारठलां असाल. दिवाणखाना स्वच्छ झाडलेला आहे. पलंगावर स्वच्छ गादी आहे. उठा."

भय्यानें हात धरून मालकाला वर नेलें. गादीवर निजविलें. माधव झोंपीं गेला. जणुं कित्येक वर्षें तो झोपला नव्हता. बऱ्याच वेळानें तो उठला. त्यानें स्नान वगैरे केलें. तो जेवला. नंतर पुन्हा झोपला. तिसरे प्रहरीं तो उठला. गच्चींत आरामखुर्चीत तो पडला होता. समोर समुद्र उचंबळत होता. तो पाहूं लागला. तो विचार करूं लागला. आपल्या गांवाला समुद्र आहे. परंतु दलदलीहि आहेत. कोण बुजवणार या दलदली ? मी बुजवीन. माझी सारी संपत्ति त्यांत खर्च करीन. आतां

नकोत पुस्तकें, नकोत नाना विद्या. आजपर्यंत त्यांत पैसा खर्च केला. आतां दलदली दूर करण्यांत खर्चूं. दलदली गेल्या तर डांस मरतील. हिंवताप हटेल. रोग जातील. दलदली आहेत तेथें बागा फुलतील. तेथें लोक फिरायला जातील. मुलें बाळें खेळतील. गांवांत आरोग्य वाढेल, आनंद वाढेल, सौंदर्य वाढेल. सर्वांना सुखी करणें यांत किती सुख आहे! सर्वांच्या तोंडावर तेज, प्रसन्नता, आनंद, समाधान फुलवण्याची खटपट करणें, किती थोर आहे तें काम? इतक्या वर्षांत असा सुंदर विचार माझ्या मनांत कां बरें आला नाहीं?

अशा विचारांत माधव रंगला होता. इतक्यांत दिवाणखान्याच्या दारावर कोणी टकटक केलें.

"कोण आहे?"

"आम्ही तिघी बहिणी."

"एकेक आंत या."

एक बहीण आंत आली. तिचें तोंड दुःखी होतें. डोळे भरलेले होते.

"काय आपलें नांव?" माधवनें प्रश्न केला.

"दुःखदेवता." ती म्हणाली.

"कां आल्यात?"

"एक प्रश्न विचारायचा आहे."

"विचारा."

"माझी सत्ता तुम्ही मान्य करितां कीं नाहीं?"

"दुःखाची सत्ता? छट्. दुःखाची सत्ता मीं कधींच मान्य केली नाहीं. दुःखें आलीं गेलीं. आकाशांत ढग येतात, जातात. आकाश पाठीमागें निळें निळें हसतें. तसें माझें. दुःखांची मी टर करायचा. दुःखें माझ्यावर कोसळलीं तर खदखदा हसायचा."

दुःखदेवता निघून गेली. दुसरी बहीण आली. ती खिन्न व उदास होती. सुसकारे सोडीत येत होती. शून्य दृष्टीनें बघत होती.

" आपलें नांव काय ? " माधवनें विचारिलें.

" निराशा."

" काय काम ? "

" एक विचारायचें आहे. "

" विचारा. "

" माझी सत्ता तुम्ही मान्य करितां कीं नाहीं ? "

" निराशेची सत्ता ? छट्. बिलकूल नाहीं. एकदा जीवनांत निराशा जरा डोकावली होती. परंतु दिली तिला खोल दरींत लोटून. निराशेच्या झिंज्या धरून तिला मी हांकलून दिलें आहे. निराशा मला ठाऊक नाहीं. "

निराशा गेली. तिसरी बहीण आली. तिचे डोळे खोल गेले होते. नाकाचा गाडा दिसत होता.

" काय आपलें नांव ? " माधवनें विचारिलें.

" चिंता. "

" काम काय ? "

" एक विचारायचें आहे. "

" विचारा. "

" माझी सत्ता मान्य करतां कीं नाहीं ? "

" चिंतेची सत्ता ? चिंता, काळजी, यांनीं कधीं मी त्रासला गेलों होतों ? मला नाहीं आठवत. मी जीवनांत निश्चितपणें वावरत आलों. ना चिंता, ना हुरहुर. छट्. तुमचीहि सत्ता मी कबूल करीत नाहीं. "

" काय ? माझी सत्ता मान्य करीत नाहींस ? अपमान करतोस माझा ? " असें चिंतादेवीनें रागानें म्हटलें. तिनें " फू फू फू फू " करीत माधवाच्या डोळ्यांत फुंकर घातली. ती निघून गेली. परंतु माधव आंधळा झाला !

माधवाची बाहेरची दृष्टि गेली. परंतु अंतर्दृष्टि कोण नेणार ? ज्ञानचक्षु कोण नष्ट करणार ? तो तसाच शांतपणें खुर्चीत होता. आतां समोरचा समुद्र दिसत नव्हता. त्याची घो घो गर्जना कानीं येत होती. ती स्वकर्तव्याचें त्याला स्मरण करून देत होती.

" कोणते बरें विचार माझ्या मनांत मघां खेळत होते ? हो, ही दलदल दूर करावी. आरोग्य निर्मावें. लोक सुखी करावे. त्यांच्या संसारांत आनंद आणावा. गांवांतील रोग जातील. लहान मुलांचीं तोंडें फुलतील. त्यांचे गाल गुबगुबीत होतील. त्यांवर गुलाबी रंग चढेल. दलदली जाऊन बागा फुलतील. बागेंत गुलाब व मानवी जीवनांत गुलाब. बाहेर गुलाब फुलतील, घरांत गुलाबी गालाचीं निरोगी मुलें हसतील. आनंद. सर्वत्र आनंद पसरणें, केवढें थोर काम. हेंच काम करूं दे. हें काम करीत मरूं दे. किती उदार व सुंदर विचार मनांत आला. किती पवित्र व धन्यतम हा क्षण. हे क्षणा, किती तूं सुंदर, किती पुण्यपावन. जाऊं नकोस. तुला पकडूं दे. तुला माझ्या जीवनांत अमर करूं दे. थांब. "

परंतु असे शब्द माधवाच्या तोंडून बाहेर पडतांच तो मरून पडला. माधवाचा आत्मा निघून गेला. कोठें गेला ? सैतानाकडे का परमेश्वराकडे ?

★

प्रकरण अकरावें

# स्वर्गांत

**माधवाचा** आत्मा नेण्यासाठीं देवाचे दूत आले व सैतानाचेहि दूत आले. देवाचे दूत व सैतानाचे दूत यांची लढाई सुरू झाली. परंतु इतक्यांत सैतान तेथें आला.


"हा आत्मा माझा आहे. करारप्रमाणें माझा आहे." सैतान म्हणाला.

"करार नीट पहा. हा क्षण सुंदर आहे, किती पवित्र आहे, हा क्षण माझ्या जीवनांत अमर होवो असें त्यानें म्हटलें खरें. परंतु ज्या विचारांत मग्न असतां हे शब्द उच्चारले गेले, ते विचार तुमचे आहेत का ? तुमच्या पोतडींत तसले विचार आहेत का ? आजपर्यंत तुम्ही या आत्म्यावर नाना प्रयोग केलेत. परंतु 'हा क्षण अमर होवो. हें खरें सुख' असे शब्द त्याच्या तोंडून तुम्हांला काढतां आले का ? खरें सांगा. जो क्षण अमर होवो असें या आत्म्यानें म्हटलें तो क्षण दैवी होता. तो क्षण देवाचा होता, सैतानानें दिलेला नव्हता. म्हणून हा आत्मा देवाचा आहे." देवदूतांचा नायक म्हणाला.

"खरें आहे तुमचें म्हणणें. न्या त्याला." सैतान म्हणाला.

सैतानाचे दूत निघून गेले. देवदूतांनीं माधवाच्या आत्म्याला सुंदर शरीर दिलें. सुंदर वस्त्रें दिलीं. वाजतगाजत त्यांनीं त्याला नेलें. एका लढाईतील जणुं तो विजयी वीर होता. शेवटीं देवाचा झेंडा त्यानें उंच केला.

माधवाचें स्वागत करायला मधुरी तेथें उभी होती. किती पवित्र, प्रसन्न व मधुर असें हास्य तिच्या तोंडावर होतें ! दोघें भेटलीं. दोघें प्रभूच्या पायां पडलीं. प्रभूनें दोघांना जवळ घेतलें. त्यानें त्यांच्या पाठीवरून, डोक्यावरून मंगल हात फिरविला.



‘ मनुष्य शेवटीं चांगला होतो. मी हरलों. प्रभु, तूं जिंकलेंस. ’

# हेतुनिवेदन

एक समग्र छोटी कादंबरी, पांच मोठ्या गोष्टी, चार लघुकथा, एक चिमुकला प्रबन्ध व दोन गद्य काव्यें, अशी थोडी विविधता साधून निर्माण केलेला हा संग्रह, मी दीपावलीच्या मंगल प्रसंगी वाचकांच्या सेवेंत सादर करीत आहे. त्यायोगें त्यांच्या आनंदांत अंशत: भर पडेल अशी मला आशा वाटते.

आबालवृद्ध स्त्रीपुरुष वाचकांचें मनोरंजन व्हावें, संसारांतील आपदांनीं गांजल्यामुळें निरुत्साह झालेल्या त्यांच्या मनाला नवा उत्साह प्राप्त व्हावा आणि दुर्धर परिस्थितीच्या गोंधळांतून पलीकडे जाण्यास त्यांना एखादा निश्चित मार्ग सापडावा, अशा तिहेरी हेतूनें **आराम-विरामाची** रचना करण्यांत आलेली आहे.

या ग्रंथाचें नांव कांहीं वाचकांना फारसें अन्वर्थक व मनोवेधक वाटणार नाहीं तर कांहींना तें मोठें अभिनव व मोहक वाटण्याचा संभव आहे. या उभय विध वाचकांना माझें एवढेंच सांगणें आहे कीं, नांवांत विशेष काय आहे ? —जे कांहीं गुणदोष या स्थानीं आढळतील त्यांचा योग्य तो परामर्श घ्या म्हणजे झालें.

प्रस्तुत संग्रहांत परस्परांहून अगदीं स्वतंत्र असे लहान मोठे लेख आहेत. अर्थात वाचनास कोठूनही प्रारंभ केला तरी चालण्यासारखें आहे. पण ज्यांना सुरुवातीपासूनच ग्रंथवाचनाची आवड किंवा सवय आहे त्यांना असें सुचवावेसें वाटतें कीं, त्यांनी या

संग्रहांतील पहिली गोष्ट—**पुस्तकाचें पिशाच्च** ही कथा पहिल्यांदाच न वाचल्यास बरें. ही गोष्ट निबंधवजा असल्यामुळें थोडीशी पाल्हाळिक व बेचव आहे. तेव्हां पहिल्याच घासाला वाचकांचें तोंड वाईट होऊं नये, व तेवढ्यानें सबंध ग्रंथाविषयीं प्रतिकूल मत बनूं नये, अशी अपेक्षा आहे.

वाचक म्हणतील——मग अशी बेचव गोष्ट या संग्रहांत आणि तीही प्रथमारंभींच घेण्याचें स्वारस्य काय ? उत्तर असें कीं, पुस्तकाचा इतर भाग वाचून मग **पुस्तकाच्य पिशाच्चाकडे** त्यांनीं लक्ष द्यावें म्हणजे दाराशींच उभें असलेल्या या भुताचें औचित्य त्यांना उमगून येईल. असो

वर सुचविल्याप्रमाणें पहिली कथा वगळून पुस्तक वाचणें झाल्यास, वाचकांनी '**ऐरणीवरील हिरा**' या छोट्या कादंबरी-कडे आधी लक्ष द्यावें, असें मी म्हणेन. प्रस्तुत कादंबरी अत्यंत मनोवेधक किंवा हृदय हालवून सोडणारी आहे, अशांतला भाग नाहीं. सन्मार्गानें चालण्याची प्रतिज्ञा केलेल्या एका पतित तरुणाची ती एक करुणकथा आहे. पण ती अशी रंगविण्यांत आली आहे कीं पहिल्या प्रकरणापासून निघालेली वाचकाची उत्कंठित दृष्टि, समाप्तीपर्यंत एक टाक धावत जाईल. मधून मधून ती थांबेल पण केवळ उचंबळून आलेले अश्रु टिपले जाई पर्यंतच. कथेचा नायक विना-यक याच्या संरक्षणार्थ इंदूताईनें केलेला स्वार्थत्याग, त्याचा झालेला विपर्यास व त्या भयंकर दिव्यांतून पार पडतांना विनायकानें केलेले धैर्यशील वर्तन इत्यादि भाग वाचतांना वाचकांचें हृदय जितकें खालवर होईल—तितकेंच त्याचा संबंध भाईसाहेब गडबोल्यासारख्या देशभक्ताशीं आलेला पाहून संतप्तही होईल. तात्पर्य, सबंध कथानक केव्हांच वाचून संपेल; पण त्यांतील पात्रांची स्मृति मात्र दीर्घकाल टिकून राहील.

**ऐरणीवरील हिऱ्याचें** मोल ठरल्यानंतर मग वाचकांनीं वाटेल ती गोष्ट किंवा प्रबंध पुढें घ्यावा. **वत्सलतेचा स्पर्श, चपलावन्संची दंडनीती** आणि **वसंतोत्सव** या गोष्टी खास स्त्री वाचकांकरितां आहेत. **प्राणांचा नैवेद्य, वैदिक, म्हारणीचा कुणगा** या सत्यकथा तरुणांच्या करितां आहेत. **टपालांतून कळलेलें रहस्य** संसारांत असुखी असलेल्या धनिकाकरितां आहे. **मृगेंद्र वनमाली,** ही गोष्ट **अंड्रोक्लिज आणि सिंह** या प्रसिद्ध गोष्टीचें एक नवें रूपांतर आहे. **गोडवाणी** चा संबंध प्रत्येक वाचकाशीं आहे. **सावधान** व **माळरानाचें हास्य** हें दोन चुटके चिंतन करून स्वतःशींच प्रसन्न होण्याकरितां आहेत.

तात्पर्य या संग्रहांतील प्रत्येक लेख मनामध्यें कांहीं विशिष्ट ध्येय ठेवून लिहिण्यांत आला असून त्यांच्या वाचनानंतर वाचकांच्या मनावर कांहीं विशेष संस्कार व्हावे, असा प्रयत्न आहे.

कांहीं हेतु मनांत बाळगून लिहिलेलें कथावाङ्मय पुष्कळदां कलाहीन अतएव बेचव उतरतें, असा प्रवाद आहे व तो अगदींच निरर्थक आहे असें नाहीं. पण मला वाटतें, एखाद्या करड्या पंतोजी प्रमाणें उपदेशाची छडी घेऊन वाचकांच्या मागें लागणें जसें बरोबर नाहीं, तसेंच केवळ गारुडी बनून वाचकांच्या बुद्धीला क्षणभर भुरळ पावणेंही बरोबर नाहीं. कथालेखक हा वाचकांचा सन्मित्र असावा व त्यानें त्या भूमिकेस अनुरुप असें वाङ्मय कलात्मक परंतु भरीव निर्माण करून त्यांचा लोभ संपादन करावा. हें मत काय चूक ठरेल?

माझा प्रयत्न त्या दिशेनें सतत चालू आहे व महाराष्ट्रांतील हजारें वाचकांना तो मान्य आहे, अशा भरंवशानें हा नवा कथा संग्रह मी वाचकांच्या पुढें आणीत आहे.

आपलें राष्ट्र अत्यंत विपन्नावस्थेंत आहे. युरोप अमेरिकेप्रमाणें तें धनकनक संपन्न किंवा स्वतंत्र नाहीं. अर्थात् त्यांची व आमची

ध्येयें किंवा आशा आकांक्षा एक असणें प्रायः अशक्य आहे. ही गोष्ट महाराष्ट्रांतील प्रत्येक स्त्रीपुरुषानें मनाशीं बाळगणें आवश्यक आहे. राष्ट्र या नात्यानें आपणास पुनरुत्थित व्हावयाचें आहे. अशा वेळीं आमची केवळ भोगैकदृष्टि असतां कामा नये. विलासी आचार विचार मनाला दुबळेपणा आणितात. संयम व सदाचार आणि कर्तव्य निष्ठा व सच्छीलता यांनीच मनुष्यामध्यें तेजास्विता व शौर्य धैर्य बाणतें. आम्हाला असें तप करणें आहे व म्हणूनच त्यास योग्य असें पथ्य आम्ही अट्टाहासानें पाळलें पाहिजे. ज्यांना ही विचार प्रणालि मान्य आहे किंवा असेल, त्यांना हा कथासंग्रह आवडल्यावांचून राहणार नाही अशी माझी अटकळ आहे.

आपल्या लेखनकौशल्यानें वाचकांचीं मनें पूर्णपणें ताब्यांत घेऊन समाजांत क्रांति करण्याइतकें अचाट सामर्थ्य माझ्या लेखणींत आहे, असा अहंकार मला पूर्वीं कधीं झाला नव्हता आजही नाहीं. तशा दृष्टीनें माझा प्रयत्न अल्पच आहे, हें मी जाणतों. पण आपला देश, धर्म, समाज व संस्कृति यांची दुर्दशा पाहून व भविष्यकाल कसा आहे, कोणास माहीत? या संदेहानें भांबाऊन जाऊन मनांत जे कढ उठतात, ते बाहेर टाकल्यावांचून राहवत नाही म्हणून ही धडपड. ज्यांना ती पटेल त्यांनी सहानुभूतीनें तिचा विचार करावा.

यापेक्षां मी विशेष काय सांगू शकणार?

वाचकांचा नम्रसेवक,

कोरेगांव
कोजागिरी
१८५६